# स्मरणिका २०२३

# महाराष्ट्र फाउंडेशन
## अमेरिका
# पुरस्कार २०२२

Invest in future
of
those with no future...
so
they can
REINVEST

। साहित्य पुरस्कार । । समाजकार्य पुरस्कार ।

**महाराष्ट्र फाउंडेशन** (अमेरिका)
यांच्यासाठी
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
व **साधना ट्रस्ट** (पुणे)
यांनी
साहित्य आणि समाजकार्य
पुरस्कारांच्या (२०२२) निमित्ताने
या स्मरणिकेचे प्रकाशन जानेवारी २०२३ मध्ये केले आहे.
*(फक्त खाजगी वितरणासाठी)*

□

संपादक
**मुकुंद टाकसाळे**
mukund.taksale@gmail.com / 9850817210

अंकनिर्मिती
**प्रदीप चंपानेरकर**

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे**

अक्षरजुळणी
**मुग्धा दांडेकर,** श्रीडी ग्राफिक्स, पुणे

मुद्रितशोधन
**विजय जोशी**

मुद्रक
**रोहन प्रकाशन,** ४३० शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

# पुरस्कारांचे मानकरी आणि स्वरूप

| साहित्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| ■ दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार<br>**रंगनाथ पठारे** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ विशेष पुरस्कार (साहित्य)<br>**सोनाली नवांगुळ** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ वाङ्मय प्रकार पुरस्कार (कथा-कादंबरी)<br>**राजन गवस** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (ललित)<br>**अनिल साबळे** (‘पिवळा पिवळा पाचोळा’ – कथासंग्रह) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक)<br>**शरद बाविस्कर** (‘भुरा’ आत्मकथन) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार<br>**संदेश कुलकर्णी** (‘पुनश्च हनिमून’) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

| समाजकार्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| ■ डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार<br>**ऑल इंडिया पिपल्स सायन्स नेटवर्क (AIPSN)** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ समाजकार्य विशेष पुरस्कार<br>**शांताराम पंदेरे**<br>(दलित व भूमिहिनांच्या हक्कासाठी केलेल्या कार्याबद्दल) | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ विशेष पुरस्कार (प्रबोधन)<br>**प्रमोद झिंजाडे**<br>(विधवा प्रथा निर्मूलन कार्याबद्दल) | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)<br>**कुमारीबाई जमकातन** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)<br>**नंदिनी जाधव** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

# अंतरंग


- संपादकीय / ७
- अध्यक्षांचे मनोगत : राजीव भालेराव / ९
- मनोगत : शोभा चित्रे / ११
- 'मासूमीयत' : डॉ. मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी / १५
- पुरस्कारप्राप्त मान्यवरांविषयी...
  - रंगनाथ पठारे : विश्वव्यापी मूल्यांचा आग्रह – श्रीकांत सा. देशमुख / १६
  - AIPSN : वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सार्वत्रिकीकरण – डॉ. विवेक माँटेरो - गीता महाशब्दे / २४
  - राजन गवस : कृषी संस्कृतीमधील संवेदनशीलता – प्रा. अशोक बाबर / ३०
  - शांताराम पंदेरे : आमच्या पिढीचा आद्य 'कूल गाय' – संजीव चांदोरकर / ३६
  - सोनाली नवांगुळ : नवनव्या अनुभवांच्या शोधात... – परिमला प्रभुदेसाई / ४२
  - प्रमोद झिंजाडे : 'विधवा प्रथा निर्मूलन अभियाना'चे प्रेरक नेतृत्व – प्रशांत कोठडिया / ५०
  - नंदिनी जाधव : जटनिर्मूलनवाली नंदिनीताई – दीपक जाधव / ५६
  - शरद बाविस्कर : 'भुरा' आत्मकथन : रावेर ते जेएनयू – दिलीप चव्हाण / ६४
  - कुमारीबाई जमकातन : संघर्षाची विविध रूपे... – सुनीता बागल / ७०
  - संदेश कुलकर्णी : माणूस आणि रंगकर्मी – मनस्विनी लता रवींद्र / ७६
  - अनिल साबळे : 'पिवळा पिवळा पाचोळा' : मुलाच्या नजरेतून आदिवासी विश्व – रणधीर शिंदे / ८४
- निवड समिती / ९१
- महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था / ९२
- पुरस्कार निवडीचे निकष / १०१
- 'महाराष्ट्र फाउंडेशन'विषयी / १०३
- सुनील देशमुख आदरांजली पुरवणी / १०५
- कुमार केतकर यांच्या भाषणातील अंश / ११६

## संपादकीय



**परिवर्तवादी चळवळींचा पाठीराखा**

सुनील देशमुखांवाचून साजरा होणारा महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांचा हा पहिलाच समारंभ आहे. दोन वर्षं करोना महामारीमुळे हा समारंभ झाला नाही. या वर्षी तो होणार म्हटल्यावर देशमुखांनीही समारंभाला येण्याचे ठरवले होते. त्या दृष्टीने त्यांचे फोनही यायचे. त्यांना आजार होते तरी ते असे बळावतील याची कल्पना नव्हती. चार जानेवारीला ते गेले. त्यांचा व्यासपीठावरील आणि व्यासपीठाबाहेरील उत्साही, आनंदी, प्रेरणादायक, आश्वासक वावर आता यापुढे दिसणार नाही, याची खंत आहेच. परंतु 'आपण सर्वार्थाने 'समृद्ध' आयुष्य जगलेलो आहोत, तेव्हा या जगण्याचा आनंद सोहळाच साजरा केला जावा, अशी त्यांची इच्छा होती, तिचाही आपण मान राखू या.

गेल्या अठ्ठावीस वर्षांतील 'महाराष्ट्र फाउंडेशन' समारंभामधील त्यांचा वावर किती प्रसन्न होता याची साक्ष देणारी एक विशेष (छायाचित्र) पुरवणी या स्मरणिकेच्या अंकात अंतर्भूत केली आहे.

या निमित्ताने नव्या पिढीला त्यांचा परिचय करून देणे योग्य ठरेल. देशमुख मूळचे सांगलीचे. बुद्धीने एकदम तेजतर्रार. मॅट्रिकला बोर्डात चौथा आलेले. त्याचे मामा खोपकर हे पुरोगामी चळवळीतले कार्यकर्ते. त्याची आई सुधारक विचारांची होती. लहानपणी त्यांनी साने गुरुजींचे वाङ्मय वाचले होते. युक्रांदच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. कुमार सप्तर्षी, अनिल अवचट आणि सांगलीचे क्रांती शहा यांचाही त्यांच्या जगण्यावर प्रभाव होता. पुढे ते शिक्षणासाठी मुंबईला युडीसीटीला म्हणजे युनिव्हर्सिटी डिपार्टमेन्ट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीला (सध्याची आयसीटी – इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीला) गेले. तिथून त्यांनी केमिकल इंजिनियरिंगची पदवी घेतली. मुंबईत पोर्तुगीज चर्चच्या जवळ भरणाऱ्या स्टडी सर्कलला ते नियमितपणे हजेरी लावू लागले. तिथंच कुमार केतकर यांच्याशी त्यांची मैत्री झाली आणि पुढे ती कायम टिकली.

सत्तरच्या दशकात जगभरच्या तरुणांना 'आपण जग बदलू शकू' असा आत्मविश्वास वाटत होता. भारतात तो काळ युक्रांद, दलित पॅन्थर, विषमता निर्मूलन अशा चळवळी बहारात असण्याचा काळ होता. भारतातून समतावादी मूल्ये घेऊन सत्तरच्या दशकात देशमुख अमेरिकेत गेले. त्यावेळी तिथे स्टुडन्ट फॉर डेमोक्रॅटिक सोसायटी (एसडीएस) सारख्या विद्यार्थी चळवळी जोरात होत्या. प्रेम आणि शांतीचा संदेश देणाऱ्या 'इमॅजिन देअर इज नो कंट्रीज' सारख्या जॉन लेननच्या प्रेरकगीतातला आशय जगभरच्या तरुणांना 'आपला' वाटत होता. व्हिएतनामच्या युद्धाला या तरुणांचा विरोध होता. प्रस्थापितांना विरोध करणारी तरुणाई अमेरिकेतही होती. त्यामुळे भारतातून जी मूल्ये घेऊन देशमुख अमेरिकेत गेले, तिथे त्या मूल्यभानाला साजेसेच वातावरण त्यावेळी होते. तरुण सुनीलसाठी तो कायमच भारावलेला कालखंड राहिला.

पुढे त्यांनी अमेरिकेत केमिकल इंजिनियरिंगमधील मास्टर्स डिग्री घेतली. लॉचे शिक्षण घेतले.

एम.बी.ए. केले. त्यांचे हे शिक्षण त्यांना वरदान ठरले. वॉल स्ट्रीटवर मोठ्या पगाराची, मोठ्या पदाची नोकरी त्यांनी स्वीकारली. त्यांच्या म्हणण्यानुसार वॉल स्ट्रीटवर तेलाच्या वायदेबाजारात फक्त पाच वर्षांत आयुष्यभराची कमाई त्यांनी केली. यशाच्या अत्युच्च शिखरावर असताना त्यांनी अधिक पैसा मिळवण्याचा ध्यास न धरता वॉल स्ट्रीट सोडले आणि समाजासाठी, आपल्या महाराष्ट्रातल्या लोकांसाठी काही तरी करायचे ठरवले. आपण ज्या समाजातून घडलो, त्या समाजाचे आपण देणे लागतो, ही कृतज्ञतेची भावना त्यामागे होती.

त्यातून १९९४ साली स्वतःच्या एक कोटीच्या निधीतून त्यांनी 'साहित्य पुरस्कार योजना' महाराष्ट्रात सुरू केली. त्यानंतर दोनच वर्षांनी म्हणजे १९९६ साली त्यांनी आणखी एक कोटीची भर घालून सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी 'समाजकार्य पुरस्कार योजना' जाहीर केली. स्वत:च्या नावाचा आग्रह न धरता ही योजना त्यांनी अगोदरच स्थापन झालेल्या अमेरिकेच्या 'महाराष्ट्र फाउंडेशन'तर्फे कार्यान्वित केली. ही योजना राबवण्यासाठी महाराष्ट्रातल्या संस्थांची मदत घेणे स्वाभाविकच होते. महाराष्ट्रात त्यांच्याबरोबर त्यावेळी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'च्या मृणालताई गोरे होत्या. त्यांचे कार्यकर्ते होते. 'लोकवाङ्मय गृहा'चे प्रकाश विश्वासराव, सतीश काळसेकर ही मंडळी होती. 'अभिनव शिक्षण प्रसारक मंडळा'चे प्रा. दिगंबर पाध्ये आणि चंद्रकांत केळकर यांचाही ही योजना कार्यान्वित करण्यात सक्रिय सहभाग होता.

त्या काळात दोन कोटी ही रक्कम बरीच मोठी होती. त्यामुळे पुरस्कारही मोठ्या रकमेचे होते. सुरुवातीच्या काही वर्षांत काही अभ्यासवृत्तीही देण्यात आल्या होत्या. साहित्य संमेलनाला मिळावा तसा प्रतिसाद त्याच्या कार्यक्रमांना मिळत असे. नारायण सुर्वे, बाबुराव बागुल, मे. पुं. रेगे, विजय तेंडुलकर, य.दि. फडके, विंदा करंदीकर, मालतीबाई बेडेकर, दिलीप चित्रे, भाऊ पाध्ये, अनिल अवचट, वसंत आबाजी डहाके अशी किती नावं घ्यावीत. श्रेष्ठ साहित्यिकांची मांदियाळीच या निमित्तानं पाहायला मिळायची. साहित्य पुरस्कार सुरू होऊन आता २८ वर्षं झालेली आहेत. सामाजिक कार्यकर्त्यांचे पुरस्कार सुरू होऊन २६ वर्षं. साहित्यिक पुरस्कारांप्रमाणेच सामाजिक पुरस्कारही परिवर्तनाच्या चळवळीतील कानाकोपऱ्यांतल्या कार्यकर्त्यांचा शोध घेऊन असेच प्रदान करण्यात आलेले आहेत. पुरस्कारांचे निकषही सुरुवातीलाच ठरवण्यात आलेले होते. भारतातील निवड समिती निवड करून अमेरिकेतील निवड समितीला तीन नावांची शिफारस करते, त्यांची माहिती कळवते, त्यांची पुस्तके पाठवते आणि तेथील समिती त्यातून एक नाव निवडते. ही निवडीची पारदर्शक, लोकशाही पद्धत आजतागायत अवलंबली जाते. त्यामुळे पुरस्कार उदंड झालेल्या आजच्या महाराष्ट्रात आजही 'महाराष्ट्र फाउंडेशन'चे हे पुरस्कार आपलं महत्त्व टिकवून आहेत, आपली शान टिकवून आहेत. पुरस्काराचे हे काम तसे वर्षभर चालू असते.

पुरस्कार मिळालेल्यांची नावे जाहीर झाल्यानंतर मागील वर्षापर्यंत देशमुख प्रत्येक पुरस्कार-प्राप्त व्यक्तीला अमेरिकेतून फोन करायचे. हा फोन औपचारिक नसायचा. प्रत्येकाशी ते जिव्हाळ्याने, प्रेमाने बोलायचे. त्यामुळे प्रत्येकाला आपला मित्रच बोलतो आहे, असे वाटायचे. पुरस्काराच्या सोहळ्यातला त्याचा आनंदी वावर कार्यकर्त्यांची उमेद वाढवणारा, त्यांना ऊर्जा देणारा असायचा.

गेल्या वर्षाचा ‘सामाजिक कार्यकर्ता (संघर्ष)’ पुरस्कार मिळालेल्या फासेपारधी जमातीतील सुनीता जाधव आठवण सांगत होत्या, ‘‘देशमुख माझ्याशी अर्धा तास फोनवर बोलत होते. मला म्हणाले, ‘मी भारतात आल्यावर तुमचं कार्य पाहायला मुद्दाम तुमच्या पालावर येईन.’ ’’ देशमुख हे तोंडदेखलं बोलायचे नाहीत. असे कार्य पाहण्यासाठी प्रत्यक्ष तिथे जायचेसुद्धा! आजवर ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने साहित्यिक आणि सामाजिक मिळून ३५० पुरस्कार दिलेले आहेत. महाराष्ट्राच्या नकाशावर सर्व भागात – अगदी कानाकोपऱ्यातही – हे पुरस्कार मिळालेले साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते आपल्याला आढळतील. २००६ साली सामाजिक पुरस्कारांना दहा वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यांनी ‘अंधश्रद्धा निर्मूलना’चं कार्य करणाऱ्या नरेंद्र दाभोलकरांना अमेरिकेत बोलावून दहा लाखाचा ‘दशकातला सर्वोत्तम कार्यकर्ता’ हा पुरस्कार देऊन गौरवलेलं होतं.

२००८ साली पुरस्काराचे केंद्र मुंबईतून पुण्यातून मुंबईत हलवण्यात आले. दहा वर्षे ‘साधना ट्रस्ट’च्या सहयोगाने पुरस्कार दिले गेले. आणि आता ‘महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)’च्या सहयोगाने या पुरस्कार योजनेची कार्यवाही होते. अर्थात ‘साधना ट्रस्ट’चा त्यात सहभाग आहेच.

सुनील देशमुखांनी अमेरिकेत पर्यावरणाच्या क्षेत्रातही अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष अल् गोर यांच्याबरोबर कार्य केलेले आहे. अमेरिकेतल्या पर्यावरणक्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्वात जुन्या ‘सियारा क्लब’चे ते सक्रिय सभासद होते. त्यांनी केलेल्या कार्यास ‘टाइम्स स्क्वेअर’मध्ये हिलरी क्लिंटन यांच्यासमवेत ‘फुल वीक सॅल्यूट’चा बहुमान लाभला. पर्यावरण क्षेत्रात भारतात काम करणाऱ्या उत्कृष्ट संस्थेस एक लाख डॉलर्सचा पुरस्कार ‘सियारा क्लब’तर्फे देण्याची योजना त्यांचीच. आपल्या संपत्तीपैकी बराच भाग समाजाला परत देणारे वॉरन बफे, बिल गेटस्, जॉर्ज सोरॉस यांच्यासारखे अमेरिकेतले उद्योगपती हे देशमुखांचे आदर्श होते.

‘महाराष्ट्र फाउंडेशन’च्या संकेतस्थळाची निर्मिती अलीकडेच करण्यात आली. त्या संकेतस्थळाचाच एक भाग म्हणून नेहमीच काळाच्या पुढे असणाऱ्या र.धो. कर्वे यांचीही वेबसाइट गेल्याच वर्षी सुरू करण्यात आली. तीवर र.धों.चे ‘समाजस्वास्थ्य’चे सर्व अंक, ‘रिझन’चे अंक, त्यांचे इंग्रजी साहित्य आणि उपलब्ध झालेली त्यांची पुस्तके हे सारे वाचकांना आणि विशेषत: अभ्यासकांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. र.धों.च्या बुद्धिप्रामाण्याशी ‘महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार योजने’चं जवळचं नातं आहे, असा देशमुखांचा ठाम विश्वास होता.

आजचा काळ फारच वेगळा आहे. ‘पुरोगामी’ तर सोडा, पण ‘उदारमतवादी’ या शब्दाचा वापरसुद्धा शिवीसारखा केला जातो. अशा काळात सुनील देशमुखांचं कार्य पुढे नेण्याची कधी नव्हे एवढी आवश्यकता आज निर्माण झालेली आहे. ते तसे पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरू शकते.

**मुकुंद टाकसाळे**
संपादक
mukund.taksale@gmail.com / ९८५०८१७२१०

## अध्यक्षांचे मनोगत



सर्वप्रथम मी ज्यांना पुरस्कार मिळालेले आहेत त्यांचे महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे अभिनंदन करतो. आजकाल स्टार्ट अप काढणाऱ्या उद्योजकांच्या वाट्याला विशेष गौरव येतो. त्यांना विशेष प्रसिद्धी मिळते. परंतु पुरस्कार मिळालेली मंडळी त्यांच्याहून कोणत्याही अर्थाने कमी नाहीत. They have followed their passions, made sacrifices, taken risk, worked very hard and in their own way helped change the world. त्यांनी तसाच ध्यास घेतलेला असतो, त्यांच्या पद्धतीने खूप कष्ट घेतलेले असतात. जग बदलण्याच्या प्रयत्नात त्यांचा वाटा नक्कीच असतो. फरक एवढाच आहे की प्रचलित अर्थव्यवस्थेत त्यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होत नाही. ही खंत काही प्रमाणात – फूल ना फुलाची पाकळी स्वरूपात – दूर व्हावी म्हणून महाराष्ट्र फाउंडेशनचे सुनील देशमुख पुढाकार घेतात आणि या वार्षिक पुरस्कारांचे आयोजन करतात. हे कार्य गेली अनेक वर्षे ते सातत्याने, अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत तेवढ्याच उत्साहात करत आहेत. मी, सुनील देशमुख आणि त्यांची टीम – शोभा चित्रे, मनी, आणि रमेश अवस्थी, मुकुंद टाकसाळे, विनोद शिरसाठ यांचे आभार मानतो.

महाराष्ट्र फाउंडेशन ही मोठी संस्था आहे. तिचे इतर काही महत्त्वाचे प्रकल्प आहेत. त्यांच्याविषयी इथे सांगणे उचित ठरेल.

अर्धा भारत हा खेडेगावात राहतो. गावाच्या विकासासाठी सरकारी योजनाही आहेत. पण त्यांचा लाभ सर्व गावकऱ्यांपर्यंत पोहोचतोच असे नाही. कुठे सकस अन्नाचा अभाव आणि दूषित पाण्यामुळे निर्माण झालेल्या समस्या आहेत. कुठे शिक्षणाच्या दर्जाबाबत असमाधान आहे तर कुठे बेरोजगारीचा प्रश्न आहे. आपल्या समस्या कशा सोडवाव्यात याचे गावकऱ्यांना प्रशिक्षण नाही. त्याबाबत मार्गदर्शन करणारे कुणी नाही, कुठली यंत्रणा नाही. समस्यांचा सामना करणाऱ्या महाराष्ट्रातील अशा अनेक गावांसाठी महाराष्ट्र फाउंडेशनने ‘पंचम’ हा प्रकल्प सुरू केलेला आहे. सध्या सातारा जिल्ह्यातील कुसुंबी आणि गडचिरोलीतील मुतनूर भागात आमचे कार्य चालू आहे. यांत RSCD, AWARD आणि RUDYA या सेवाभावी संस्थांची आम्हाला साथ आहे. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र फाउंडेशन गावातील शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्त्री सबलीकरण आणि गरिबी निर्मूलन यांबाबत प्रशिक्षणाची सोय करते आणि गावांतल्या सामूहिक प्रकल्पासाठी आर्थिक मदत करते. भविष्यात या प्रकल्पात महाराष्ट्रातील आणखीही काही गावांचा समावेश करण्याचा महाराष्ट्र फाउंडेशनचा विचार आहे.

महाराष्ट्रातल्या गावांना सतत दुष्काळाचा प्रश्न भेडसावत आहे. आपण अलीकडे पाहतो, फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही गावेच्या गावे ही अतिवृष्टी, पुराने जनजीवन उद्ध्वस्त होणे अशा नैसर्गिक आपत्तींमुळे हतबल झालेली आढळतात. यामागे पर्यावरणात झालेले बदल हेच कारण आहे. पर्यावरणावर चर्चा करण्याची वेळ निघून गेलेली आहे आणि आता ठोस कृती करण्याची आवश्यकता आहे. विज्ञानाचा आधार घेऊन – वैज्ञानिक दृष्टीचा अंगीकार करून – पर्यावरणामध्ये सकारात्मक बदल करणे ही आपली सगळ्यांची जबाबदारी आहे. वैयक्तिक पातळीवर आणि संस्थेच्या पातळीवरही समस्या नीट समजून घ्यायला हवी आहे. 'कार्बन उत्सर्जन' (Carbon emissions) हे कसे कमी करता येईल, या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. या समस्येचे निवारण करण्यासाठी आपल्यालाच नाही तर पुढच्या पिढीलाही सजग राहावे लागेल. त्या दृष्टीने महाराष्ट्र फाउंडेशनने अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अल् गोर यांच्या 'क्लायमेट रियालिटी प्रॉजेक्ट' या संस्थेच्या सहकार्याने रयत शिक्षण संस्थेबरोबर काम सुरू केले आहे. आत्तापर्यंत ५० शाळांमधील १,००० शिक्षकांसाठी पर्यावरण जागरूकतेचे अभ्यासवर्ग घेतले गेले आणि पाच शाळांचे green campus (हरित परिसरामध्ये) मध्ये रूपांतर केले आहे. या प्रकल्पात दोनशे शाळांचे green Campus (हरित परिसर) करण्याचे महाराष्ट्र फाउंडेशनचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेत दर वर्षी आम्ही फंड उभारण्यासाठी आमच्या देणगीदारांना साद घालत असतो. आमच्या फंड रेजर कार्यक्रमाचे नाव 'साद' असेच आहे. या वर्षी देणगीदारांचा उत्तम प्रतिसाद होता. त्यांच्याच पाठबळाच्या जोरावर महाराष्ट्र फाउंडेशन आपले समाजकार्याचे उपक्रम पुढे नेत आहे.

**राजीव भालेराव**
अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन, (अमेरिका)
president@maharashtrafoundation.org/rajivpost@gmail.com/7324047408

# मनोगत



नमस्कार,

सर्वप्रथम पुरस्कारप्राप्त साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे मनापासून अभिनंदन. समाजाला पुढे नेण्यासाठी प्रगत विचारांचा वैचारिक वारसा आपल्या साहित्यातून मांडणारे साहित्यिक आणि समाजकार्य करून प्रबोधनातून, रचनात्मक कार्यातून आणि संघर्षात्मक लढ्यांमधून सामाजिक सुधारणा घडवून आणणारे सामाजिक कार्यकर्ते हे तर आपल्या महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल.

भारताबाहेर असणाऱ्या आम्हां मराठी बांधवांना या महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेचा, सामाजिक सेवेचा अभिमान वाटतो. म्हणूनच अंधश्रद्धा, कालबाह्य रूढी-परंपरा, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक या सर्वांविरुद्ध समाजाचा रोष पत्करूनही ठामपणे उभे राहून वर्षानुवर्षे कार्य करत राहणारे कार्यकर्ते आणि आपल्या लेखणीतून काळाची पावले ओळखून समाजाला सावध करणारे साहित्यिक, सामान्यांच्या नजरेपलीकडील जीवन उलगडून दाखवणारे साहित्यिक आपल्या विचारातून, प्रेरणादायी प्रवासातून तरुण पिढीला मार्गदर्शन करणारे साहित्यिक आम्ही महत्त्वाचे मानतो. यातूनच १९९४ सालापासून साहित्य पुरस्कार आणि १९९६पासून समाजकार्य पुरस्कार ही योजना पुढे आली.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांना धरून ठेवणारा व्यापक मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून आम्ही दर वर्षी त्या त्या व्यक्तींची वा संस्थांची पुरस्कारांसाठी निवड करत असतो.

या पुरस्कारांचे वैशिष्ट्य असे की यांसाठी कोणालाही, कुठेही, कसलाही अर्ज करावा लागत नाही. निवडीच्या या प्रक्रियेत महाराष्ट्रातले आणि अमेरिकेतील निवड समितीचे सदस्य सहभागी असतात. इथे साहित्य पुरस्कार आणि समाजकार्य पुरस्कार अशा दोन समित्या असतात. त्यावर वेगवेगळे सदस्य काम करत असतात. त्यांचा कालावधीही ठराविक असतो. महाराष्ट्रातील निवड समिती त्या त्या क्षेत्रातल्या दोनशे ते अडीचशे जाणकार व्यक्तींकडून अगोदर शिफारशी मागवते. त्या नावांचाही इथली निवड समिती विचार करते. इथल्या समितीने सुचवलेली लेखकांची नावे, त्यांची माहिती, आणि त्यांची सर्व पुस्तके आमच्या हाती येतात. त्यामुळे प्रत्येक पुस्तकावर सविस्तर चर्चा होऊन आम्ही निर्णय घेतो. याच पद्धतीने जी इथली समाजकार्य निवड समिती असते तिच्याकडून समाजकार्य करणाऱ्या व्यक्तीची सविस्तर माहिती आमच्याकडे पोहोचते. इथल्या सदस्यांनी केलेल्या तीन तीन शिफारशींमधून आम्ही एका नावाचा विचार करतो. ही प्रक्रिया जास्तीत जास्त पारदर्शक व्हावी, त्यात कुठलेही साचलेपण येऊ नये म्हणून आम्ही कायम प्रयत्नशील राहत असतो.

आज जग तंत्रज्ञानाने पुढे जात असले तरी आचार-विचारांनी मागे मागे चालले आहे. बरेच देश

एका बाजूला झुकत आहेत, हे घाबरवणारे आहे. लोकशाही उलथून टाकण्यासाठी विषारी प्रवृत्तीला खतपाणी पुरवले जाते आहे. त्याच वेळी स्त्रियांचे साधे साधे प्रश्न जटिल करण्यात येत आहेत. तिच्या शरीरासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकारही तिच्याकडून काढून घेतले जात आहेत. तर कुठे लहान लहान गोष्टींत, तिच्या साजशृंगारापासून ते कपडेलत्त्यापर्यंत तिच्यावर दवाब आणला जात आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की स्त्रीला मागे रेटण्यात मानसिक स्वास्थ्य गमावलेल्या पुरुषांचा पुढाकार आहे आणि या पुरुषांना पाठिंबा देणाऱ्याही परत सुशिक्षित स्त्रियाच आहेत.

एकंदर काळ कठीण आलेला आहे. जीवनाची गती भोवळ यावी इतकी वाढलेली आहे. त्यामुळेही असेल, पण समाजमाध्यमांवर जे सांगितले जाते, दाखवले जाते, पसरवले जाते, तेच अंतिम सत्य अशी सामान्यांची मानसिकता तयार होत चाललेली आहे. सत्य पडताळून पाहणे, हाती आलेल्या बातमीची शहानिशा करणे या गोष्टींना वेळच नसतो. तशी गरजही जनसामान्यांना वाटत नाही. त्यामुळे असत्याचा प्रवास वेगाने आहे. माझा विश्वास आहे की असत्य कितीही सशाच्या वेगाने धावत पुढे गेले तरी अंतिम विजय हा कासवाच्या गतीने जाणाऱ्या सत्याचाच होणार आहे.

काळोखाला भय असते एका दिवलीचे. आपण सगळेच एका दिवलीच्या सोबतीने प्रकाशाकडे वाटचाल करू या. उद्याचे जग अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करू या. या कार्यात एकमेकांना बळ देणाऱ्या सर्वांनाच शुभेच्छा.

**शोभा चित्रे**

साहित्य व सामाजिक निवड समितीच्या अध्यक्ष (अमेरिकेतील)

# 'मासूमीयत'





प्रिय सर्व,

अतिशय जड अंत:करणाने या वर्षीचे महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कारांचे कामकाज पार पाडत आहोत. ध्येयवादी, समविचारी, समाज परिवर्तनाच्या ध्यासाने झपाटलेला, महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुरस्कारांचा प्रवर्तक असलेला आपला प्रेमळ स्नेही सुनील देशमुख आज आपल्यामध्ये नाही हे वास्तव स्वीकारणे फार कठीण होत आहे. मात्र ठरल्याप्रमाणे पुरस्कार वितरण सोहळा होणे गरजेचे आहे. सुनील देशमुखांचा हाच आग्रह राहिला असता.

या वर्षीच्या 'मासूम'च्या या मनोगतामध्ये महिलांच्या संपत्तीवरच्या अधिकाराबद्दल लिहीत आहोत. पितृसत्तेमध्ये कोणत्याही संसाधनांवर हक्क किंवा मालकी नसल्याकारणाने 'दोन्ही घरचा पाहुणा उपाशी' अशी बाईची परिस्थिती होऊन जाते. ज्या ठिकाणी जन्मजात हक्काची संपत्ती मिळाली पाहिजे त्या माहेरी लहानपणापासूनच 'घर, शेत आणि इतर मालमत्ता तुझ्या भावाचीच आहे' ही गोष्ट मनात ठासून बिंबवली जाते. अगदी खेळत असताना भांडण झाले तरी भाऊ पटकन 'हे माझं घर आहे, तू तुझ्या घरी जाणार आहेस' असे सहजपणे बोलून जातो.

माहेरच्या संपत्तीत भावाच्या बरोबर समान वाटा न मिळाल्यामुळे खरे तर महिलेला लग्न करण्यापलीकडे दुसरा पर्याय उरत नाही. आई-वडिलांनी ठरवून दिलेल्या स्वजातीय विवाहास मुलीने मान्यता दिली तर एक दिवसाची चंगळवादी पार्टी तिला मिळते, अंगावर घालण्यापुरते का होईना स्त्रीधन मिळते; मात्र तिला तिच्या हक्काची असलेली वाटणी न देता हुंड्याच्या रूपाने तिच्या नवऱ्याला संपत्ती दिली जाते. एकदा 'सालंकृत कन्यादान' केले की तिने कोणत्याही परिस्थितीत नवऱ्या सोबत नांदले पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते. गावात अगदी स्पष्टपणे 'सासरी उभ्याने जायचे आणि आडव्याने बाहेर यायचे' असे म्हटले जाते. मध्यमवर्गात तसे बोलले नाही तरीही गोड शब्दात तिने कायम सासरीच राहावे यासाठी तिची समजूत घातली जाते.

स्त्रीने आर्थिक व्यवहारात लक्ष देऊ नये, ती पुरुषाची जबाबदारी आहे असे मानले जाते. मध्यमवर्गातल्या महिलासुद्धा अनेकदा नवऱ्यावर आर्थिक व्यवहारांसाठी अवलंबून असतात. 'मला नाही घराबाहेर पडावं लागत. ते सगळं हातात आणून देतात' असे विधान कौतुकाने केले जाते. बँकेत आपला जॉइंट अकाउंट आहे का, नवऱ्याने कोणाकडून कर्ज घेतले आहे का, कोणाला पैसे उधार दिले आहेत का, याची माहिती बायकोला असतेच असे नाही. मग नवरा गेल्यानंतर एखाद्याकडून पाच हजार रुपये घेतले असले तर दहा हजार द्या असे म्हणायला घेणेकरी मागेपुढे बघत नाहीत, आणि

ज्यांनी नवऱ्याकडून पैसे घेतलेले असतात ते क्वचित पैसे परत करायला येतात. बघता बघता आईला ओलांडून कागदोपत्री मुलगा कुटुंबप्रमुख होतो, घर आणि इतर संपत्ती मुलग्यांकडे जाते, आणि मग स्वत:च्या घरात राहत असूनसुद्धा 'आई आमच्याकडे राहते बरं का' असे तिच्यादेखत म्हटले जाते.

ज्याच्याकडे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सत्ता असेल त्यांचे उतरंडीमध्ये दुय्यम असलेल्या व्यक्ती आणि समूहांवर आधिपत्य आणि वर्चस्व प्रस्थापित होणार यात शंका नाही. कुटुंबाच्या अंतर्गत महिला आणि लहान मुले यांच्यावर कारभारी असलेल्या पुरुषांची सत्ता आणि नियंत्रण असल्याकारणाने त्यांची एकाधिकारशाही आणि धाक-हिंसा असा व्यवहार राजरोसपणे सुरू असतो. पितृसत्तेला टक्का द्यायचा असेल तर घराच्या आतील साधन संपत्तीचे समान वाटप होणे गरजेचे आहे. 'हुंडा नको, संपत्तीत समान हक्क हवा' असे ठामपणे मांडणे आवश्यक आहे.

२००६ साली राहत्या घराची मालकी नवरा आणि बायको यांच्या संयुक्त नामे व्हावी असा महाराष्ट्र सरकारचा एक अधिनियम निघाला होता. अनेक महिने पिच्छा पुरवल्यानंतर हा कागद स्थानिक सरकार-दरबारी मिळाला. त्यातील तरतुदीनुसार 'मासूम'ने पुरंदर तालुक्यामधील जवळपास बारा हजार घरे पती-पत्नीच्या संयुक्त नावाने केली. पुढील वर्षी ग्रामपंचायतीत असलेला महिलांसाठीचा निधी वापरून दोघांच्या नावाच्या पाट्या तयार करून दारावर लावल्या गेल्या. या वेळेला आलेले अनुभव खूप हृदयस्पर्शी होते. या अभियानात मासूम उतरणारच आहे असे लक्षात आल्यानंतर सरकारी यंत्रणेने बरीच मदत केली. ग्रामसेवकांच्या कचेरीबाहेर रोज सकाळी रांग लागायची. त्यात अनेक वृद्ध पुरुष असायचे. 'मी गेल्यानंतर माझ्या बायकोला मुलं बघतील याची खात्री नाही, म्हणून किमान घर तरी तिच्या नावावर असावं' असे म्हणायचे. ग्रामसेवकांच्या ऑफिसमध्ये जाऊन महिला आणि पुरुष आवर्जून आणि एकत्रितरीत्या संयुक्त नावाची नोंदणी करायचे. या अभियानानंतर महिलांनी दिलेला प्रतिसाद खूप महत्त्वाचा होता. 'आता नवरा मला रात्री अपरात्री 'हो घराबाहेर' अशी धमकी देऊ शकणार नाही' असं म्हणायच्या. पाहुणेरावळ्यांना अभिमानाने घरावर असलेले आपले नाव दाखवायच्या. त्यांनी कौतुक केले की गहिवरून जायच्या. हा अधिनियम केवळ विवाहित असलेल्या महिलांसाठी होता ही यातील कमतरता होतीच. मात्र तरीसुद्धा यानिमित्ताने मासूमच्या कार्यक्षेत्रामध्ये महिलांच्या संपत्तीच्या अधिकाराबद्दल चर्चा जोमाने सुरू झाली. त्याचबरोबर मुलीला आपल्या माहेरच्या घरी हक्काचा हिस्सा हवा अशी मांडणी करणे सोपे होऊन गेले.

एकदा लग्न करून दिले की माहेरचे सर्व जबाबदाऱ्यांतून अंग काढून घेतात. कौटुंबिक हिंसाचार झाला तरीसुद्धा थोडीफार सहानुभूती दाखवून लवकरात लवकर ती नवऱ्याच्या घरी परत कशी जाईल त्यासाठी माहेरचे नियोजन करू लागतात. फार दिवस बहीण तिच्या मुलांसकट माहेरी राहिली तर कुटुंबाची इभ्रत जाते, अशी मानसिकता तर असतेच, परंतु त्याचबरोबर 'उद्या तिला आपल्या घराचा छोटासा का होईना हिस्सा द्यावा लागेल' ही भीती भावांच्या मनात सलत राहते. 'कशाला पाळायची सापाची पिल्ले' अशा शब्दात भाऊ बोलू लागतात. माहेराहून सासरी आणि सासरहून माहेरी अशी महिलेची फरफट वर्षानुवर्षे होत असते. सुनेचा दात दुखला किंवा हृदयाला छिद्र आहे असे कळले तर 'हे अवयव तर तू माहेरूनच घेऊन आली होतीस' असे म्हणत तिला माहेरून खर्च आणायला

लावलेले आम्ही पाहिले आहे. बाईचे श्रम कुचकामी ठरवणारे आजार झाले तर या ना त्या कारणाने तिची रवानगी माहेरी केली जाते. नवरा गेल्यानंतर तर अक्षरश: काहीच दिवसांत तिला आणि तिच्या मुलांना (विशेषत: मुलींना) संपत्तीमधून बेदखल करायचे जणू काही खलबतच सुरू होते. यामुळे बाई ही केवळ घरची 'लक्ष्मी' न राहता स्वामिनी होणे अत्यावश्यक आहे.

'घर दोघांचे' या अभियानाचे यश पाहिल्यानंतर मासूमने 'शेत दोघांचे' हा उपक्रम गेल्या तीन वर्षांपासून हाती घेतला आहे. शेतावर स्त्रीची मालकी नसल्याकारणाने तिला शेतकरी हा दर्जा प्राप्त होत नाही. उत्पन्नाच्या साधनावर केवळ पुरुषाचे नाव असल्यामुळे नैसर्गिक किंवा मानव निर्मित आपत्तीच्या काळात नुकसान भरपाई स्त्रीला मिळत नाही. गाय, म्हैस सांभाळताना बाईंनी सर्व शेण-गोठा केला असला तरीसुद्धा दूध विक्री संघाचा सदस्य घरातला पुरुष असतो. बँकेतून तारण घेता येत नाही, पुरुष व्यसनापायी जमीन किंवा घर गहाण ठेवत असेल तर कायदेशीर प्रतिकार करता येत नाही. अगदी लहानपणापासून मुलीने कुटुंबावर अवलंबलेले आयुष्य जगले पाहिजे असे मानले जाते, मात्र नवऱ्याचे काही बरे-वाईट झाले, किंवा काही कारणास्तव संसार मोडला तर क्षणार्धात संपूर्ण घराची आर्थिक जबाबदारी तिने एकटीने सांभाळावी अशी समाजाची अपेक्षा असते. पुरुषाप्रमाणे ती सहजरीत्या दुसरा विवाह करू शकत नाही. कमी पगार, असमान वेतन आणि खुंटलेले शिक्षण असल्यामुळे महिलेचे खच्चीकरण होते.

सरकारी नियमाप्रमाणे बहिणींना शेतीमध्ये हिस्सा मिळाला पाहिजे, असे असले तरीसुद्धा शेत विकताना बहिणींच्या सह्या मिळवण्यापुरता थोडाफार पैसा त्यांचा हातावर ठेवला जातो. आपल्या बायकोला तिच्या माहेरून संपत्तीत वाटा मिळाला पाहिजे असे म्हणणारा पुरुष बहिणीला मात्र समान हिस्सा देत नाही. लग्न झालेल्या महिला, विशेषत: आई-वडील वारल्यानंतर आपला अधिकार न मागता केवळ चोळी-बांगडी आणि माहेरची वाट चालू राहावी म्हणून गप्प बसतात. सासरच्या जमिनीचे खाते वाटप झालेले नसणे, कागदपत्र उपलब्ध नसणे, महिलांच्या नावावर जमीन व्हावी यासाठी समाज फारसा उत्सुक नसणे, किंवा अधिकचे काम हाती घेणे सरकारी कर्मचाऱ्यांना शक्य नसणे अशी अडथळ्यांची शर्यत पार पाडून, महिलेचे नाव नवऱ्यासोबत सातबाऱ्यावर यावे यासाठी मासूमचे कार्यकर्ते चाळीसहून अधिक खेड्यांमध्ये अहोरात्र मेहनत करत आहेत. या अभियानाची माहिती जसजशी लोकांपर्यंत पोहोचत आहे तसे अनेक पुरुष स्वत:हून कागदपत्रे घेऊन मासूमच्या सहकाऱ्यांच्या मदतीने तलाठी ऑफिस, तहसील कार्यालयात जात आहेत ही गोष्ट अतिशय समाधानकारक आहे, समाजात होणाऱ्या सकारात्मक बदलाची सुरुवात खऱ्या अर्थाने होत असल्याचे लक्षण आहे.

अर्थात केवळ आर्थिक परिस्थिती सुधारून चालत नाही. घरात राबणाऱ्या व्यक्तीच्या मार्फतच जर कर्ज मिळाले, किंवा तिला मिळालेल्या अनुदानातून घराचे उत्पन्न वाढले तर ते कोणत्या कुटुंबास नकोसे वाटणार आहे? सर्वांगीण दृष्टीने बाईचे सबलीकरण होणे तितकेच महत्त्वाचे ठरते. जिथे सरपंच बाईचा नवरा राजरोसपणे सरपंच म्हणून मिरवत असतो, तिथे बायकोच्या नावाचा बोर्ड तिच्या दुकानावरती लावलेला नवऱ्याला खपू नये यात काही आश्चर्य नाही. म्हणूनच, एखादा व्यवसाय हाती घेतला तर किती कर्ज हवे, भांडवलाचे आणि उत्पादनाचे नियोजन कसे करायचे इथपासून ते बाजारपेठेत कसे

टिकून राहायचे, आणि स्वत:च्या नावावर पैसा बाजूला कसा ठेवायचा इथपर्यंत महिलांचे सबलीकरण करावे लागते. आजच्या डिजिटल युगामध्ये पैशांचे व्यवहार स्वत: कसे करायचे याचे प्रशिक्षण द्यावे लागते. एवढेच नव्हे तर गावाच्या पातळीवर महिलांना सहकारी सोसायटीमध्ये सदस्य करून घेणे, ग्रामसभेमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे असते. आणि त्यापलीकडे जाऊन, जर आपण आपल्या मुला-मुलींना संपत्तीत समान हिस्सा द्यायचा आहे अशी कुटुंबाची आणि आर्थिकदृष्ट्या सबल झालेल्या महिलेची मानसिकता घडली गेली नाही तर एका पिढीतच 'जैसे थे' अशी परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागत नाही.

'माझ्या आयुष्यातील घडामोडींबाबत निर्णयप्रक्रिया माझ्या हाती असायला हवी' ही जाणीव महिलांना पदोपदी असणे गरजेचे आहे. तसेच, वाढत्या वयातील मुलांच्या मनात महिलांच्या समान संपत्तीच्या हक्काबाबत आणि घरात-घराबाहेर सर्व व्यक्ती-समूहांना समान दर्जा आणि वागणूक मिळण्याबाबतची बांधिलकी दृढ करण्यासाठी आपल्यासारख्या परिवर्तनवादी संस्थांना आदर्शवादी पर्याय उभे करणे आवश्यक असते.

या वर्षीच्या सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्तींना सन्मानित करताना आम्हाला अतिशय समाधान होत आहे. महाराष्ट्रात समाजकार्याची आणि साहित्याची पुरोगामी परंपरा सुरू ठेवणे ही खऱ्या अर्थाने सुनील देशमुख यांना आदरांजली होय. वर्षभर चालत असलेल्या या कामात संयोजन समितीचे सर्व सहकारी, मासूम संस्थेचे आणि साधना ट्रस्टचे साथी, आणि साहित्य तसेच समाजकार्य निवड समितीच्या सर्व सदस्यांनी केलेले सहकार्य मोलाचे ठरलेले आहे. गेल्या चार वर्षांपासून 'मासूम'कडे महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कारांची असलेली जबाबदारी सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे पार पाडणे शक्य होत असते, आणि म्हणूनच सर्वांचे 'मासूम'तर्फे मनापासून आभार.

'मासूम'कडून सर्वांना सबरंगी सलाम!

**डॉ. मनीषा गुप्ते व डॉ. रमेश अवस्थी**
संस्थापक आणि सहसमन्वयक
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM – मासूम)
masumpune.mfa@gmail.com

**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM - मासूम)**
४२ - बी१, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११ ०२८
दूरध्वनी : ०२०-२६९९५६२५/२६९९५६३३

दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार

# रंगनाथ पठारे
## विश्वव्यापी मूल्यांचा आग्रह

□

श्रीकांत सा. देशमुख



*मराठीतील भक्कम लेखक. कथा-कादंबरीच्या क्षेत्रात त्यांनी लक्षणीय आणि विपुल कामगिरी बजावलेली आहे. जगण्याच्या अनेक शक्यतांचा ते सतत शोध घेत असतात. 'रथ' ते 'सातपाटील कुलवृत्तांत' हा त्यांचा प्रवास मनोज्ञ आहे. रंगनाथ पठारेंसारखा लेखक मराठी भाषेत असावा ही बाब अतिशय देखणी वाटावी, मनाला आल्हाद देणारी वाटावी अशीच आहे.*

**काही लेखक** हे एखाद्या दुर्गम अवघड घाटासारखे असतात. चढायला अवघड असतात, पण एकदा उतार लागला की त्या घाटाच्या नसानसातून वाहणारे पाणी, झाडांच्या पाना-फांद्यांतून ठिबकणारे पाखरांचे आवाज, मध्येच कुठेतरी एखाद्या उंच शिखरावर स्थिरावलेले आकाश आणि या निर्जन एकांतातला एक निखळ आदिम आवाज आपल्या मनाला भिडू लागतो. अशा वेळी आपण तो अवघड चढ, लागलेली धाप विसरून जातो आणि एका कित्येक वर्षांपासून शोधत असणाऱ्या पवित्र एकांतात हरवून जातो. रंगनाथ पठारे हा लेखक वाचताना कोणत्याही शुद्ध वाचकाला येणारा अनुभव हा सर्वसाधारणपणे असा असू शकतो.

'दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे सगळी कामे केली. सकाळी अभ्यास केला. लेक्चर्सची तयारी केली. ठरल्या वेळी ठरल्यासारखा बोललो. वर्षानुवर्षे हे सगळे करीत आलो असल्याने काहीशा यांत्रिकपणे सगळेच व्यवस्थित झाले. त्यात अडचण काही आली नाही. पण हे सगळे चालू असताना दुसऱ्या एका पातळीवर सारखा 'तुमच्याकडे लक्ष आहे'चा विचार करीत होतो. त्या आवाजाची आठवण सारखी जाणवत होती, छळत होती, आणि त्यामुळे मनावरील भीतीची सावली अधिक दाटत चालली होती. 'कोण? का? कशाला? या आणि अशा प्रश्नांमुळे विशेष अस्वस्थता वाटत होती. कुणाशी बोलण्यासारखा विषय नसल्यामुळेही आणखी पंचाईत झाली होती.'

'दिवे गेलेले दिवस,' या रंगनाथ पठारे यांच्या १९८२ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीतील हा अगदी सुरुवातीचा प्रसंग. निनावी फोन आणि त्यावरून दिली जाणारी धमकी, 'तुमच्यावर लक्ष आहे'. नायकाचे सतत अस्वस्थ असणे. कोण? कशासाठी आपल्यावर लक्ष ठेवतोय? काय हवे आहे त्याला? नेमकी एक प्रकारचे सतत भय वाढवणारी ही अवस्था. एका बाजूने निरागस नायक आणि तरी त्याच्यावर लक्ष आहे म्हणणारा 'कोणीतरी'. तब्बल चाळीस वर्षांनंतर पठाऱ्यांची ही कादंबरी वरील संदर्भाचा विचार करता आज लिहिलेली का वाटावी?

दिवे गेलेले दिवस, (१९८२) ते सातपाटील कुलवृत्तांत, (२०१९) असा एकूण चौदा कादंबऱ्यांतून मराठी कादंबरी लेखनाचा बहुस्तरीय अवकाश व्यापणारा हा लेखक. या लेखनात केवळ

सातत्य दिसते किंवा वाचकाला दमवणारी कथन शैली असेच मानता येईल का? पठारे हे वाचकाला दमवणारे, छळणारे लेखक आहेत यात वाद नाही, पण या छळवादाचे स्वरूप नेमके कसे आहे, याचा विचार केला तर, हा कादंबरीकार, कथाकार लेखन करताना जसा निर्घृणपणे स्वत:ला खोदत जातो, तसाच वाचकालाही. अशा प्रकारची दुर्दम्यता असणारे फारच मोजके लेखक मराठी भाषेत आहेत. लेखन ही जीवननिष्ठा मानणारे फार कमी लेखक असतात. लेखकाने लिहिणे, चित्रकाराने चित्र काढणे, किंवा कुठल्यातरी कला माध्यमातून, कोणीतरी व्यक्त होणे, ही बाब केवळ तात्कालिक महत्त्व असणारी नसते. मुळात ही जाणीव व्यक्त होणाऱ्यापाशीही असणे गरजेचे असते. कलावंताची कलेच्या बाजूने जाणारी हरेक कृती हा एक प्रकारचा समकाळात केलेला सांस्कृतिक हस्तक्षेप असतो. तो तसा वाटणे, ही एक प्रकारची 'स्थिती' असते, अवस्था असते. याचे भान ठेवणारे जे लेखक असतात, तेच आपल्या लेखनाला, व्यक्त होण्याला सार्वकालिक श्रेष्ठत्व देऊ शकतात. रंगनाथ पठारे हे मराठी भाषेतील या संदर्भात अनेक पातळ्यांवर अपवादात्मक लेखक आहेत. कोणत्याही भाषेत तिची उंची वाढवणारी, काळ आणि प्रदेशाच्या सीमा ओलांडून स्वीकृतीच्या अनेक पातळ्यांवर पोहोचवणारी फार कमी माणसे असतात. अशा माणसांचे व्यक्त होणे त्या त्या भाषा-समाज-संस्कृतीला सार्वकालिक निरपेक्ष श्रेष्ठत्व बहाल करणारे असते. मराठी भाषेतील रंगनाथ पठारे या लेखकाचा एकूण लेखन प्रवास, त्या लेखनाची खोली आणि अवकाश, सांस्कृतिक प्रकटन आणि जबाबदारीचे भान या बाबी लक्षात घेतल्या तर या लेखकाचे असाधारणत्व लक्षात येऊ शकते.

रंगनाथ गबाजी पठारे, यांचे लौकिक चरित्र पाहिले तर काही गमतीशीर बाबी दिसतात. जवळे या नगर जिल्ह्यातील, पारनेर तालुक्यातील गावी १९५० साली जन्मलेला हा लेखक. दुसऱ्या महायुद्धात लढलेल्या एका कुणब्याचा मुलगा आहे. खरे म्हणजे लढाई, युद्ध, तलवार यांचे आणि इथल्या मातीत राबणाऱ्या जातींचे नाते पूर्वापार आहे. शिवाजी राजांच्या काळात ते अधिक ठळक झाले आणि त्याला अनेक संदर्भ असलेले नैतिक सखोल परिमाण प्राप्त झाले. पठारे यांच्या कुटुंबाकडे तशी फारशी शेतीवाडी नसावी असे दिसते किंवा असली तरी 'शेतकऱ्यांचे एकुणात काही खरे नसणे' हेही ओघानेच येणारे. पठारे हे विज्ञानाचे विद्यार्थी, अध्यापक. जवळे, नगर, पुणे, संगमनेर असा एकूण शिक्षण आणि वास्तव्याचा त्यांचा प्रवास. माझा आणि रंगनाथ पठारे यांचा काही दशकांचा बऱ्यापैकी जवळचा,









स्नेहाचा म्हणावा असा परिचय असताना अशा काही गोष्टी शिवाय मला फारसे काही ठाऊक नाही. त्यांच्याशी होणाऱ्या संभाषणातूनही कधी मोकळेपणाने ते स्वत:विषयी बोलताना दिसत नाहीत. त्यांच्या मांडणीत व्यक्तीपरतापेक्षा समूहपरताच अधिक असते. यातून त्यांचा एकूण 'जाणीव' नावाच्या गोष्टीकडे बघण्याचा दृष्टिकोन सहजपणे दिसून येतो.

पठारे हा लेखक मी तसा जवळून पाहिलाय. कणखर अशी प्रतिमा, नेमाडेंसारख्या दादा वाटाव्यात अशा भरघोस वाढलेल्या मिश्या. बोलतानाचा एक थेट आतून यावा असा रुबाब, सरंजामी वाटावा असा. चालतानाची एक विशिष्ट ढब. मी पाहिलेय या माणसाला जवळून, दुरून. तरी तो मला माझ्या मातीतला वाटला. त्याच्या वरवर राकट, लष्करी असण्याच्या आतात एक खूप देखणा, कोमल, इतरांची काळजी घेणारा कुणबी मी खूपदा पहिलाय, अनुभवलाय. या वरवर डोंगरासारख्या खडबडीत वाटणाऱ्या प्रचंड लेखकाचे दिसणे हे त्याचे आहे, या पहाडातून द्रवणारे कोमल मूलद्रव्य आपले आहे. त्याचे दृश्यरूप म्हणजे त्याचे कालातीत लेखन.

एक प्रसंग मला आठवतो. काही वर्षांपूर्वी रंगनाथ पठारे माझ्याकडे आले होते. एका भिंतीवर आई आणि बापूचे फोटो मी लावलेले. अगदी निखळ कुणबीपणात जन्मलेले आणि जगणारे माझे आई-वडील. भिंतीवरील आईबापूच्या फोटोकडे पठारे सर खूप वेळ अतिशय मन:पूर्वक पाहताना मला दिसले. ते नेमके या फोटोतून कशाचा शोध घेत असावेत, याचा मी बराच वेळ काही न बोलता विचार करीत होतो. माझ्या मायबापाकडे एवढ्या स्थिरपणे खोलवर पाहणारा अन्य कोणी अजून मला आढळला नाही. ही घटना केवळ एक सहज घडून गेलेली घटना म्हणून मी बघत नाही. पठारेंसारखा लेखक ज्या वेळी असे काही बघत असतो, त्या वेळी तो बरेच काही अदृश्य असणारे समजून घेत असतो. तो एक प्रकारे काळाचा ठाव असतो. काळाचे एक मोठे दीर्घ प्रवाही संवेदन कवेत घेणे असते. काळ आणि वर्तमानाच्या औपचारिक परिचयापलीकडे जाऊन काळाच्या गोठलेल्या प्रतिकृती पुन्हा जिवंत करण्यासारखे असते ते.

'सातपाटील कुलवृत्तांत'सारखी कादंबरी यासाठीच आपल्या पूर्वजांचा शोध घेतानाच विश्वभानाची आणि आत्मभानाची गोष्ट होऊन जाते ती यामुळेच. अशी कलाकृती लिहिणे हीच मुळात काही शतकांची वाटावी अशी 'समाधी अवस्था' असते. या अवस्थेतून लेखकाला जावे लागणे आणि नंतर









व्यक्त होणे हेच खरे तर एक थोर असे मिथक असते. पठारेंसारखा लेखक दरेक कादंबरीतून ते सातत्याने करीत आलेला असल्यामुळे तो अपवादातलाही अपवाद मानावा लागतो. काळाच्या स्थिती-गतीचा शोध घेणे, त्याच्या अधीन असणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचा शोध घेणे, ही तशी असाधारण अशी घटना असते. कथा असो की कादंबरी, की वैचारिक लेखन, पठारेंनी आंतरप्रवाही पद्धतीने काळाच्या स्थिती-गतीला कायमच आव्हान केले आहे. हे समजून घेणे म्हणजे त्या लेखकाचे लेखक म्हणून असणारे अस्तित्व समजून घेणे.

कोणताही समंजस लेखक आपल्या लेखनातून जगण्याचा एक सबंध आकृतिबंध मांडत असतो. खूपदा ही न ठरवताच केलेली गोष्ट असते. तिला असणारी अनौपचारिकता हेच तिचे खरे बळ असते. पठारे यांच्या कादंबरी, कथा लेखनातून एका प्रदीर्घ अशा अस्तित्वावस्थेचे अढळ असे स्थान दिसते. त्यांचे लेखन खूपदा परंपरावादी वाटावे इतके परंपरेच्या जवळ जाताना दिसते, पण त्यातून अगदी स्वयंभू, वेगळी, सार्वभौम वाटावी अशी आधुनिकताच समोर येते. याचे साधे उदाहरण म्हणून लेखकाचा स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती वेगळा आहे, हे दाखवणारी त्यांची कादंबरी. 'दु:खाचे श्वापद', 'नामुष्कीचे स्वगत', 'चोषक फलोद्यान', 'हारण', 'चक्रव्यूह' अशा कादंबऱ्यांमध्ये आपल्या परंपरांनी निर्माण केलेले जगण्याचे सुमार आदर्श लेखकाने ढवळून काढले आहेत. खरे म्हणजे महानुभाव साहित्य, भक्ती परंपरेचे साहित्य, सुफी साहित्य यांनी स्त्रियांच्या जगण्याकडे पाहण्याचा जो उदारभाव निर्माण केला होता, तो आत्मसात करणे आधुनिक लेखनाच्या पातळीवर फारसे कोणाला करता आले नाही. जे करायला गेले, ते एक तर खूप रंजक किंवा उथळ देहभाव निर्माण करणारे किंवा अकारण करुणाभावी असे होते. पठारे यांच्या साहित्यातील सर्वच स्त्रिया आत्मबळ घेऊन जगणाऱ्या आहेत. त्यांना समजून घेताना वाचक म्हणून कोणताही उन्माद मनात न येता, आपण त्या स्त्री-भावाशी, पर्यायाने एका मूल्याशी समरूप होतो. 'दु:खाचे श्वापद'ची नायिका अशीच आपल्या आतात शिरत जाते, वाचन संपल्यानंतर आपण पुन्हा तिचा शोध घेऊ लागतो.

एखाद्या टिपणाच्या बारीकशा भागात सामावणारा हा लेखक नाही. पठारेंसारखा लेखक समजून घेणे म्हणजे, एका प्रदीर्घ काळाला समजून घेण्यासारखे असते. श्वास-नि:श्वासांसह काही दशका-शतकांचा पसारा अंगावर पांघरून जेव्हा 'ताम्रपट', 'सातपाटील..' पुढ्यात येतात तेव्हा गांगरून जायला











*१९९४ साली महाराष्ट्र फाउंडेशनचे पुरस्कार सुरू झाले. पहिल्याच वर्षी रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट'ला पुरस्कार मिळाला. त्यावेळचं त्यांचं 'संवादिनी'तील छायाचित्र.*

होते. वर्तमानात सतत इतिहास हुंदडत जाताना दिसतो. इतिहासात रमताना वर्तमानाचे टोकदारपण कधी बोथट होत नाही. या लेखकाचे आणखी वेगळे महत्त्व असे की, हा लेखक अनेकांना 'आपला लेखक' वाटतो. खरे म्हणजे एका बाजूने हे तथाकथित पॉप्युलर असण्याचे लक्षण आहे. पण त्या अर्थाने पठारे हे लोकप्रिय लेखक नाहीत. नवखा वाचक त्यांच्या कादंबऱ्यांना हात लावताना खूपदा दचकतो. पठारे या लेखकावर मनापासून प्रेम करणारे आज जे कोणी बरेच वाचक, समीक्षक आहेत, त्यांचीही सुरुवातीची अवस्था यापेक्षा वेगळी नव्हती. त्यामुळे खूपदा असे वाटून जाते की, पठाऱ्यांच्या साहित्यावरील समीक्षा ही मुळात उत्तम असणाऱ्या वाचकांनी केली आहे. या लेखकाचा पराभव करावा किंवा त्याला थोर म्हणावे, या हेतूने केलेली ही समीक्षा नाही. याचा अर्थ पठारे वाचकांचा अनुनय करतात का? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' हेच आहे. पठारे वाचकांचा अनुनय करणे तर सोडाच पण स्वत:चाही अनुनय कधी करत नाहीत. हा लेखक स्वत:सह वाचकांशीही कठोरपणे वागणारा लेखक आहे, तरी वाचकांना तो आवडतो, यातच त्याचे श्रेष्ठत्व आहे. स्वत:ला लेखक म्हणून कायम अपडेट, नित्यनूतन करत राहणे या लेखकाला आवडते. वाचक आपल्या लेखनात गुंतून राहावा, याची कोणतेही ट्रीक न करता आपल्या लेखनातील एकटेपणाला जपणे ही साधी गोष्ट नसते. अगदी सुरुवातीपासूनच पठारेंच्या लेखनात असे एकांताचे खूपसे प्रहर सर्वदूर पसरलेले दिसतात. त्यात बाया-पुरुष आहेत, गर्दी, काळाचे अवशेष आहेत, धावता काळ आहे. रंजकतेच्या आहारी जाऊन लेखक काही तात्कालिक

वरवरचे सांगू लागतोय की काय, असे वाटत असतानाच लगेच लागून येणारे खोल गहन असे खूप काही पठाऱ्यांच्या लेखनात आहे.

पठाऱ्यांच्या लेखनाचा अवकाश हा घडवलेला असला तरी तो कृत्रिम नाही. याचे महत्त्वाचे कारण, त्यांच्या पात्रांचे निसर्गासारखे जगणे हे मलपृष्ठावरून ओघळून जाणार नाही, तर एक प्रकारचे अपरिहार्य असे चिवटपण त्याला जन्मजात चिकटल्यासारखे असते. तोच त्या पात्रांचा प्रकृतीधर्म असतो. त्यांच्या कादंबऱ्यांतले प्राध्यापक, लेखक, स्त्रिया, बलुतेदार सदृश कष्टकरी लोक, राजकीय कार्यकर्ते सगळेच कसे अनौपचारिक सुष्ट-दुष्टता सोबत घेऊन येतात. त्यांची स्वत:ची अशी एक भाषा आहे, जी उद्दाम, कोमल अशी सांगता आली तरी ती खास 'पठारी भाषा' आहे. राजन खान या लेखकाने केलेला हा उल्लेख मला विशेष महत्त्वाचा वाटतो. बोलीभाषेच्या अकारण अट्टहासातून बरेच महत्त्वाचे लेखक प्रादेशिक बनून जातात. न ठरवता पठारे हा धोका सहज टाळतात, याचे कारण त्यांच्या लेखनातून व्यक्त होणारा भाव हा विश्वव्यापी मूल्यांचा आग्रह धरणारा असतो. रंगनाथ पठारे हे आपल्या भाषेविषयी प्रचंड अ-कृत्रिम माया असणारे लेखक आहेत. 'माझ्या भाषेत अलौकिक वाटावे असे श्रेष्ठ वाङ्मय कित्येक शतकांपासून निर्माण होत आले आहे', ही त्यांची भूमिका. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हा आग्रह त्यांचा यासाठीच असतो, एवढेच नाही तर, ही भाषा कायम कष्टकऱ्यांच्या शब्दातून बोलत आलेली आहे, त्यांनीच ती घडवली आहे, या अर्थानेही ती अभिजात आहे, ही पठारेंची भूमिका आहे.

पठाऱ्यांच्या कादंबऱ्या, कथा वाचताना खूपदा वाटून जाते या लेखकाला कविता लिहायची आहे. कुठलाही पूर्णविराम न घेता तो पानेच्या पाने बोलत जातो तेव्हा नकळत वाटून जाते, हे महावाक्य महाकाव्याकडे नेणारे आहे. कितीतरी आदर्शांची फेरपालट हा लेखक सहज करत जातो. काळ आणि कालबाह्यता तपासतो, सतत प्रश्न विचारत जातो, ते प्रश्न जगण्याचा बहुपेडी तळ ढवळणारे असतात. त्यांना लौकिक पद्धतीने नाही मांडता येत. जगण्याचा परिपाठ असावा तसे सलग चार दशकांपेक्षा






अधिक काळ असे काही करत राहणे ही भयंकर वाटावी अशी गोष्ट आहे. पठारे यांचे 'सत्त्वाची भाषा' सारखे वैचारिक लेखन हेदेखील त्यांचे कथा-कादंबरीकार असण्याचा वैचारिक कणा वाटावे, इतके ते महत्त्वाचे आहे. सर्जनशील लेखकाने कसा विचार करावा हे कथन करणारे त्यांचे सगळेच वैचारिक लेखन आहे.

रंगनाथ पठारे मुळात विज्ञानाचे अध्यापक, विद्यार्थी. त्यांचे तसे असण्याचा प्रचंड म्हणावा असा लाभ मराठी कादंबरीला झाला आहे. कादंबरी लेखनाचे अनौपचारिक विज्ञान या लेखकाने निर्माण केले. महाराष्ट्राच्या भक्तिपरंपरेवर असाधारण श्रद्धा असणारा ('वैकुंठीची माती' आणि 'चोखोबाच्या पाठी' या कथा यासाठीच नीटपणाने समजून घ्याव्यात अशा आहेत), कृषी संस्कृतीवर समंजस प्रेम करणारा, मराठी संस्कृती असो की एकूण जगण्याच्या प्रागतिक विचारांवर अव्यभिचारी निष्ठा असणारा हा लेखक आहे. आपल्या भूमीतून पोषणमूल्ये घेत, विश्वव्यापी होत जाणे हे श्रेष्ठ लेखकाचे वैशिष्ट्य असते. पठारेंसारखा लेखक आपल्या माणसांचा द्वेष न करता, आपल्या परंपरांचा, भाषा-रूढी-प्रथांचा जेव्हा आधुनिक पद्धतीने शोध घेऊ लागतो, तेव्हा या लेखकाचे पहाडासारखे असणे कळायला लागते. पठारेंच्या शैलीच्या प्रयोगाबाबत 'नामुष्कीचे स्वगत' या कादंबरीचे उदाहरण देता येईल. प्रख्यात समीक्षक म. सु. पाटील म्हणतात, 'ही शैली सामान्य लेखकाला सहज पेलणारी नाही. तिच्या मागे माणसाबद्दल आणि जीवनाबद्दल एक प्रगाढ सहानुभूती आणि समज असलेले मन आहे. पठारे यांची शैली ही सहज अनुकरण करता येईल अशी नाही. त्यामागील मेहनत दिसत नसली तरी ती परिश्रमपूर्वक घडवलेली शैली आहे; आपल्या परिसरातील बोलभाषा आणि प्रमाणभाषा याच्या बेमालूम मिश्रणातून ती साकार झालेली आहे. तेव्हा बोलभाषेने संस्कारित अशी जी आपली भाषा आहे ती आपल्या अभिव्यक्तीचे सहज माध्यम म्हणून वापरताना कोणतीही दडपणे मानण्याची गरज नाही, असा आत्मविश्वास पठारे यांची ही शैली नव्या लेखकांच्या मनात जागवणारी ठरेल.'

पठारे फक्त शैलीच्या पातळीवरच अनेक शक्यतांशी खेळतात, असे मात्र मानता येणार नाही, जगण्याच्याही अनेक शक्यतांचा शोध ते सतत घेत असतात.. हेच त्यांचे एका परीने 'मोठे असणे' आहे. जुन्यांचे अकारण गौरवीकरण न करता, त्यातल्या सामर्थ्याचाही शोध घेऊन सर्वंकष आधुनिकतेचा मार्ग प्रशस्त करणारा, रंगनाथ पठारेंसारखा लेखक मराठी भाषेत असावा ही बाब अतिशय देखणी वाटावी, मनाला आल्हाद देणारी वाटावी अशीच आहे.

**श्रीकांत सा. देशमुख**
९४२२४३६७६९

# वैज्ञानिक दृष्टिकोनाचे सार्वत्रिकीकरण

□

डॉ. विवेक माँटेरो – गीता महाशब्दे

# ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क

(AIPSN)

*वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण खरंच शक्य आहे का? अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य केल्याचा, प्रत्यक्षात आणल्याचा अनुभव आपल्याकडे आहे. देवी, पोलिओ यासारख्या भयानक रोगांचा आपण सार्वत्रिक लसीकरणाद्वारे संपूर्ण नायनाट केला आहे. अनेक देशांनी सार्वत्रिक साक्षरता साधलेली आहे. सर्व जातीधर्मातील जवळपास प्रत्येक मुलगा आणि मुलगी आज शाळेच्या पटापर्यंततरी पोहोचलेले आहेत. शाळेत प्रवेश घेणे सार्वत्रिक होण्याच्या टप्पात आले आहे. त्यामुळे वरील प्रश्नाचं उत्तर 'होय, सार्वत्रिकीकरण शक्य आहे!' असं आहे.*

**आयसॉन धूमकेतूच्या** निमित्ताने एक राष्ट्रीय विज्ञान मोहीम आखली जात होती. बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्समध्ये त्याची कार्यशाळा चालू होती. 'ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क'चे देशभरातले विज्ञानकर्मी तिथे एकत्र जमले होते. दिवस होता २० ऑगस्ट २०१३. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या निर्घृण हत्येची धक्कादायक बातमी त्या विज्ञान संमेलनात येऊन थडकली. त्या दिवशी एकीकडे पुण्यात डॉ. दाभोलकरांचे पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवलं होतं, 'आम्ही सारे दाभोलकर'चे नारे दिले जात होते, आणि दुसरीकडे बंगलोरच्या AIPSN च्या संमेलनात पुढील ठराव पारित केला जात होता -

'डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन त्यांचे कार्य आणि ध्येय पुढे नेण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत. सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांना, दिशाभूलीला आणि धर्मांध दहशतवादाला विरोध करणं आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं हे कार्य आम्ही नेटाने आणि जोमाने पुढे नेऊ. आपल्या देशाच्या अनेक भागांमध्ये आज धर्मांध दहशतवादी कारवाया चालू आहेत. त्यामागे असलेल्या शक्तींना विरोध करण्याचा आम्ही निर्धार करीत आहोत. भारतीय राज्यघटनेतील वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्षता, समानता आणि लोकशाही मूल्ये मजबूत करून आपल्या देशातील प्रत्येक शाळेपर्यंत, गावा-खेड्यापर्यंत नेण्यासाठी आम्ही कार्यरत राहू.

ज्यांनी गांधीजींचा खून केला ते गांधीजींची तत्त्वे आणि विचार थोपवू शकले नाहीत. त्याचप्रमाणे डॉ. दाभोलकरांच्या या भ्याड खुनाने त्यांची मूल्ये आणि विचार थांबवता येणार नाहीत. लोकविज्ञान चळवळीत कार्यरत असलेले आम्ही सर्वजण जास्त निग्रहाने आणि जोमाने विज्ञान आणि वैज्ञानिक विचारपद्धतीचा प्रसार करू. चळवळ जास्त व्यापक करून, जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचून आम्ही प्रतिगामी सांप्रदायिक शक्तींना हरवू आणि ही विचारांची लढाई जिंकू.'

त्यानंतर दोन वर्षांनी एप्रिल २०१५ मध्ये बंगलोरला AIPSN चं अधिवेशन होतं. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं आणि त्याचं सार्वत्रिकीकरण करणं यांतील फरकावर त्यात सखोल चर्चा झाली.

देशाच्या राज्यघटनेत वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्पष्ट उल्लेख असलेला कदाचित भारत हा एकमेव देश असावा. घटनेच्या कलम ५१ अ मध्ये भारतीय नागरिकांची कर्तव्यं दिलेली आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणं हे एक कर्तव्य म्हणून त्यात नोंदलेलं आहे. या कलमासाठी न्यायालयात जाण्याची तरतूद नसली तरीही कलम २१ अ ने गुणवत्तापूर्ण शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क म्हणून दिलेला आहे. त्यानुसार गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणाचं, म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण कायद्याने बंधनकारक झालेलं आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण हे आता केवळ नागरिकांचं कर्तव्य नाही, तर ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांचा म्हणजे जवळपास २० कोटी भारतीय नागरिकांचा तो मूलभूत अधिकार झालेला आहे. म्हणजे आता ते अनिवार्य आहे.

परंतु सार्वत्रिकीकरण खरंच शक्य आहे का? ते शक्य केल्याचा, प्रत्यक्षात आणल्याचा अनुभव आपल्याकडे आहे. देवी, पोलिओ यांसारख्या भयानक रोगांचा आपण सार्वत्रिक लसीकरणाद्वारे संपूर्ण नायनाट केला आहे. अनेक देशांनी सार्वत्रिक साक्षरता साधलेली आहे. सर्व जातीधर्मांतील जवळपास प्रत्येक मुलगा आणि मुलगी आज शाळेच्या पटापर्यंत तरी पोहोचलेले आहेत. शाळेत प्रवेश घेणं सार्वत्रिक होण्याच्या टप्पात आलं आहे. त्यामुळे वरील प्रश्नाचं उत्तर 'होय, सार्वत्रिकीकरण शक्य आहे!' असं आहे. परंतु, वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण शक्य आहे का?

त्यासाठी घटनेतलं वैज्ञानिक दृष्टिकोनाचं कलम आणि शिक्षण हक्काचं कलम एकत्रितपणे पाहणं आवश्यक आहे. शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ हे शिक्षण हक्कासंबंधीचे कायदेशीर दस्तावेज आहेत. यानुसार 'प्रत्येक बालकाचं आठवीपर्यंतचं गुणवत्तापूर्ण शिक्षण पूर्ण होणं आणि मुलांना केवळ संधी नाही तर निष्पत्तीची समानता मिळणं' याची शासनावर कायदेशीर सक्ती आहे. शाळेत प्रवेश घेण्याच्या फार पुढची आणि दमदार अपेक्षा आहे ही. या



**या संस्थेविषयी...**

१९८७ च्या भारत जनविज्ञान जथ्यानंतर भारतभरातील विज्ञान कार्यकर्ते एकमेकांच्या जास्त संपर्कात राहून काम करू लागले आणि ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्कचा जन्म झाला. साक्षरता मोहिमेत एआयपीएसएनचं जाळं वाढत गेलं. सूर्यग्रहणं, शुक्राचं अधिक्रमण, कॉमेट आयसॉन, शून्य सावलीचा दिवस यासारख्या खगोलीय घटनांच्या वेळी भारतभर आपण कार्यक्रम करतो. शिक्षण, आरोग्य, आत्मनिर्भर विकास, उपजीविका, समता, शेती, पर्यावरण व सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये AIPSN काम करते.

*सविस्तर माहितीसाठी वेबसाईट व सोशल मीडिया हँडल्स पुढीलप्रमाणे :*
Websites : www.aipsn.net, www.aipsn.in
Twitter- @gsaipsn
Facebook- https://www.facebook.com/theAIPSN
YouTube- AIPSN Media, @aipsnmedia841
Instagram- https://www.instagram.com/aipsnmedia/

उद्दिष्टापासून आपण अजून कोसो दूर आहोत. तरीही सध्याच्या शासनाने घड्याळाचे काटे उलटे फिरवलेले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिक निष्पत्तीची भाषा सोडून देऊन २०२० चं नवं शैक्षणिक धोरण केवळ प्रवेशाच्या संधीची भाषा बोलत आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण राष्ट्रीय अजेंड्यावर आणण्यासाठी 'ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क' आणि 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ने मिळून डॉ. दाभोलकरांचा शहीददिन हा 'राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. 'विचारा, का?' (Ask Why) हे या मोहिमेचं घोषवाक्य आहे. आता अनेक संस्था, संघटना, शाळा, राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस साजरा करतात. त्यांच्या जाळ्यांद्वारे बहुतांश राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचे हजारो कार्यक्रम शाळांमध्ये, संस्थांमध्ये, गावांमध्ये, वस्त्यांमध्ये होतात. लाखो लोक यात सहभागी होतात.

'ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क' हे भारतभरातील लोकविज्ञान संघटनांचं नेटवर्क आहे. भारतातील लोकविज्ञान चळवळीचा पाया घातलेली केरळ शास्त्र साहित्य परिषद, प्रत्येक जिल्ह्यात कार्यकर्त्यांचं जाळं असलेल्या लाखोंची सदस्यसंख्या असलेल्या विज्ञान संघटना, अनेक राज्यांमध्ये असलेलं भारत ज्ञानविज्ञान समितीचं जाळं, काही नमुन्यादाखल नावं घ्यायची तर, पश्चिम बंगाल विग्यान मंच, तामिळनाडू सायन्स फोरम, आंध्र प्रदेश आणि तेलंगाणामधील जनविग्यान वेदिका, कर्नाटक राज्य विज्ञान परिषद, महाराष्ट्रातील नवनिर्मिती गट, पाँडिचेरी सायन्स फोरम, मध्य प्रदेश विग्यान सभा, छत्तिसगड विग्यान सभा, हिमाचलमधील ग्यानविग्यान समिती, बिहार, ओरिसा, राजस्थान, मणिपूर आणि नागालँडमधील भारत ज्ञानविज्ञान समुदाय, हरयाणा विग्यान मंच, दिल्ली सायन्स फोरम, त्रिपुरा विग्यान मंच, आसाम साहित्य सभा आणि एलोरा विग्यान मंच,... ही AIPSN

च्या सदस्य संघटनांची फक्त काहीच नावं आहेत.

डॉ. दाभोलकरांचा शहीददिन ‘राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस’ म्हणून निवडणं हे अगदीच आपसूक आणि समर्पक होतं. निसर्गविज्ञान शिकताना जरी आपण विज्ञानाची पद्धत शिकत असलो, तरीही वैज्ञानिक दृष्टिकोन हा केवळ निसर्गविज्ञानापुरता मर्यादित नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणं म्हणजे आपलं आयुष्य अधिक चांगलं जगण्यासाठी आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात विज्ञानाची पद्धत लागू करणं. मानवी आणि सामाजिक प्रश्नांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणं महत्त्वाचं. सामान्य जनतेबरोबर व्यापक स्तरावर काम करणं त्यासाठी आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण करण्यासाठी कशा प्रकारे काम करायला हवं याचं जिवंत आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोलकर. ‘जेवढा पुरावा, तेवढा विश्वास’, ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची त्यांनी केलेली चार शब्दांची व्याख्या. इतकी संक्षिप्त, नेमकी आणि प्रभावी व्याख्या दुसरी नसेल.

डॉ. दाभोलकरांची वैज्ञानिक दृष्टिकोनावरची दोन व्याख्यानं AIPSN ने इंग्रजीत भाषांतरित केली. २०१८ मध्ये पत्रकं किंवा पुस्तिका रूपात ही व्याख्यानं मल्याळम, तामिळ, तेलुगु, हिंदी, बंगाली, असामी अशा अनेक भाषांमध्ये वितरित केली गेली. डॉ. दाभोलकरांचे इंग्रजी, हिंदी आणि इतर भाषांमध्ये डब केलेले व्हिडिओ पण वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जातात.

भारताच्या बहुतांश राज्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस साजरा होणं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. पण सार्वत्रिकीकरणाच्या कार्याच्या मानाने ते एक लहानसं पाऊल आहे.





17वीं अखिल भारतीय

ये सब की बात है, दो-चार-दस की बात नहीं।

# जन विज्ञान कांग्रेस

www.17thaipsc.com भोपाल, 6 से 9 जून 2022 कुल 4 पेज निःशुल्क

9 जून : आज के कार्यक्रम

अखिल भारतीय जन विज्ञान कांग्रेस में सोना झारिया मिंज का व्याख्यान

## हमें चाहिए प्रोग्रेसिव स्कूल, जहां मिले बेहतर शिक्षा और समान अवसर

- पर्यावरण को बचाने के लिए बड़ी योजनाएं पर लगे पूर्ण प्रतिबंध : ओपी भूरेटा
- कृषि की निजी कंपनियां लूट रही है किसानों को : एन. रघुराम
- ग्रामीण आजीविका के लिए गैर कृषि क्षेत्रों में बढ़ाने होंगे अवसर : डी. रघुनंदन

भोपाल। 17वीं अखिल भारतीय जन विज्ञान कांग्रेस में पर्यावरण, कृषि, आजीविका, लैंगिक समानता जैसे विषयों पर आज सेमिनार एवं कार्यशालाओं का आयोजन किया गया। सेमिनार में देश के विभिन्न राज्यों से आए शिक्षाविद, पर्यावरणविद और वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ताओं ने विश्लेषणात्मक वक्तव्य दिए।

'विचारा, का?' या घोषवाक्याचा वापर करून या मोहिमेद्वारे वास्तवाबाबतचे प्रश्न विचारायला नागरिकांना प्रोत्साहित केलं जातं. विद्यार्थ्यांमधील उपजत जिज्ञासेला खतपाणी घातलं जातं. वैज्ञानिक दृष्टिकोन हा विज्ञानाच्या पद्धतीवर आधारलेला आहे आणि प्रश्न विचारणं हा त्याचा गाभा आहे. आजच्या विषारी राजकीय वातावरणात शासनाच्या धोरणांबाबत प्रश्न विचारणं नाउमेद करणारं आहे, प्रश्न विचारणाऱ्याला देशद्रोही म्हटलं जात आहे. या विपर्यासाला AIPSN कृतिशील ठाम उत्तर देत आहे. आपण देशभक्त असणं म्हणजे काय? तर नागरिकांसाठी आपल्या घटनेने घालून दिलेली कर्तव्यं पार पाडणं. कलम ५१अ नुसार नागरिक म्हणून आपलं कर्तव्य पार पाडायचं असेल तर प्रश्न विचारले पाहिजेत. हीच खरी देशभक्ती आहे. आपल्या देशातली लोकशाही वाचवण्यात आणि ती बळकट करण्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचं सार्वत्रिकीकरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणं हा चांगल्या विज्ञान शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण विज्ञान शिक्षणात यशस्वी होणं ही वैज्ञानिक दृष्टिकोनाची पायाभरणी ठरेल. परंतु शिक्षण हक्क कायद्याला दहा वर्षं होऊन गेली तरीही देशात कोठेही शिक्षणातल्या गुणवत्तापूर्ण निष्पत्तीकडे लक्ष दिलं गेलेलं नाही.

आजच्या काळात शिक्षण हक्क कायद्याची आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी पार पाडणं आणि पुढे नेणं हे वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक आहे. भारताच्या राज्यघटनेतील मूल्यांशी बांधिलकी मानणाऱ्या शाळा आणि त्यांच्या व्यवस्थापनांच्या सहकार्याशिवाय हे घडवणं अवघड आहे. या शाळांचं सहकार्य असेल तर वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या बाबतीत मोठी प्रगती साधता येईल. स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात आपण राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी म्हणून हे काम पुढे नेऊया.

**डॉ. विवेक माँटेरो**
९८६९३६१६०२
**गीता महाशब्दे**
९८२२६१४६८२

वाङ्‌मयप्रकार पुरस्कार (कथा-कादंबरी)

# राजन गवस
# कृषी संस्कृतीमधील संवेदनशीलता

□

प्रा. अशोक बाबर



*राजन गवस यांचे समग्र साहित्य हे कृषी संस्कृतीत असणाऱ्या समष्टीकेंद्री जीवनदृष्टीने प्रभावित आहे. आजूबाजूच्या चिंतनशील सामाजिक चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यांच्या लेखनाला वैचारिक, सामाजिक, चिंतनशील, मानवतावादी असे अनेक आयाम आहेत. कर्नाटकाच्या सीमेलगतच्या प्रदेशातील त्यांचं साहित्य फक्त 'प्रादेशिक' न राहता साऱ्या सीमा ओलांडून सर्वच भारतीयांना ते 'आपलं' वाटत आलेलं आहे. हे त्यांचे कर्तृत्त्व पाहता त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे कानडी, इंग्रजी, आसामी, गुजराथी, हिंदी असा भारतीय भाषेत अनुवाद झालेले आहेत याचं आश्चर्य वाटत नाही.*

**राजन गवस** हे १९८० च्या दशकातले एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून प्रस्थापित झाले असले तरी त्यांचा मूळ पिंड हा एक संवेदनशील कवी आणि गोष्टी सांगणाऱ्या एका कहाणीकाराचा आहे. ही संवेदनशीलता कोकणशी लगटून असलेल्या गडहिंग्लज, आजरा, गारगोटी आणि कर्नाटकच्या सीमेलगतच्या प्रदेशातील कृषी संस्कृतीमधील लोकजीवनातील दु:खद् जीवन कहाण्यांमधून निर्माण झालेली आहे. या कृषी संस्कृतीमधील संवेदनशीलतेमधून निर्माण झालेली त्यांची लेखनावरची श्रद्धा साहित्याच्या एका विस्तृत समाजशास्त्रीय चिंतनशीलतेशी जोडलेली आहे. त्यांचे समग्र साहित्य: कविता, कथा, ललित गद्य, संशोधन आणि कादंबरी, हे कृषी संस्कृतीत असणाऱ्या समष्टीकेंद्री जीवन्‌दृष्टीने जरी प्रभावित असलं तरी त्यांनी आजूबाजूच्या चिंतनशील सामाजिक चळवळीमधून आपल्या वैचारिक वाढीसाठी सामाजिक, सांस्कृतिक असणारे तत्कालीन स्रोत स्वत:मध्ये जिरवून सशक्त केलेले आहेत. गरिबीचे चटके सोसणाऱ्या तरुणांमध्ये असणारं मार्क्सवादाबद्दलचं आकर्षण आणि समाजवादी चळवळीशी लगटसुद्धा गवस यांच्या जडणघडणीत कारणीभूत ठरली. पण या चळवळीचं नातं त्यांनी आपल्या साहित्यिक प्रेरणेसाठी म्हणून सांधून घेतलं. अशाच एका वेगात त्यांची 'उचकी' ही एक अप्रतिम कथा सत्यकथेमध्ये प्रसिद्ध झाली आणि गवस यांचा साहित्यिक प्रवासाचा आत्मविश्वास वाढू लागला.

डॉ. जे. पी. नाईक यांची गांधी प्रणित देशी विचारधारा त्यांनी गारगोटी येथील त्यांच्या शिक्षक ट्रेनिंगमध्येच रिचवली होती. म्हणून त्यांना स्त्रियांच्याबद्दल प्रचंड कळवळा तर आहेच पण त्याबरोबर प्रत्येक शोषितांबद्दल त्यांना प्रमाणाबाहेर कणव आहे. त्यांच्या साहित्याची तुलनाच करायची झाली तर ती यु. आर. अनंतमूर्तींच्या कथा आणि कादंबऱ्यांशी करता येईल. यु. आर. अनंतमूर्ती हे स्त्री दु:खाच्या कहाण्या परसदारातल्या स्त्रियांच्या कथनातून शोधतात. गवस यांच्या कथांचं मूळ असंच शोधता येईल. त्यांच्या समग्र साहित्यात कृषी साहित्य संस्कृतीचं चित्रण ढोबळ किंवा भाबडेपणाने मुळीच येत नाही. त्याच संस्कृतीमधून निर्माण झालेल्या दुष्ट प्रथा, रूढी आणि अन्यायाचा विध्वंस हेही त्यांच्या कथांमधून प्रभावीपणे येत राहतं.. हा विध्वंस घडविण्यासाठी त्यांनी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांची कमालीची

विद्रोही परंपरा आत्मसात केलेली दिसते.

कृषी संस्कृती आणि फुलेप्रणित आयडियालॉजीमधून साकारलेली गवस यांची जीवनदृष्टी त्यांच्या कविता, कथा, कादंबरी आणि अन्य निबंधांतून सलगपणे आणि एकाच सूत्ररूपाने येते. 'हुंदका' या कवितेतील आशय त्यांच्या कथेत येतो आणि तोच आशय कादंबरीत विस्तारतो आणि निबंधांमध्ये सुद्धा झिरपतो, असं हे त्यांच्या साहित्यात सलग सूत्र आहे. 'चौंडकं' आणि 'भंडारभोग' या केवळ जोगता आणि जोगतिणी यांचंच चित्रण करणाऱ्या नसून त्या कादंबऱ्यासुद्धा 'धिंगाणा' आणि 'कळप' या कादंबऱ्यांच्या आशय सूत्राशी लगटून आहेत. देवदासी चळवळीमधल्या त्यांच्या सहभागामध्ये त्यांना देवदासीची जट सोडवताना जो उग्र वास येत होता तो वास त्यांच्या नाकातून थेट त्यांच्या मस्तकात भिनलेला आहे. त्याचं प्रत्यंतर त्यांच्या अन्य कथा-कादंबऱ्यांमधूनसुद्धा येत राहतं. किंवा 'ढव्ह आणि लख्ख ऊन' ही कथा 'ब, बळीचा' या कादंबरीत विस्तारली जाऊन 'ब, बळीचा अन् भ, भ्रष्टाचाराचा' या बहुजन बाराखडीत रूपांतरित झाल्याचं आढळतं. 'ब, बळीचा' हा सुद्धा गवस यांचा 'हुंदका'च आहे.

गवस यांच्या साहित्यकृती स्वतंत्र तरीही एकरूप आणि एकसूत्री आहेत. ही एकरूपता आणि एकसूत्रीपणा त्यांच्या प्रखर जीवनदृष्टीतून आणि ठोस आयडियालॉजीमधून येतो. गवस 'यमुना पर्यटन' परंपरेचा स्रोत मानतात आणि ही परंपरा आशयाच्या अनुषंगाने पुढे नेताना स्वत:ची अशी खास शैली अंगीकारतात. 'हुंदका' हा अगदी छोटेखानी काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला पण प्रकाशकाबरोबर झालेल्या वादावादीमुळे असेल कदाचित पुन्हा त्यांनी कविता छापण्याचे कटाक्षाने टाळले. कविता लिहून ठेवल्या आहेत. त्या प्रकाशित झाल्यावर त्यांच्या जीवनदृष्टीचा आणखी ठोसपणे धांडोळा घेता येईल. त्यांच्या सुरुवातीच्या काळातल्या कविता कृषी परंपरेतला रोमँटिकपणा सिद्ध करतात. त्यांची, 'रानात आलीस तेव्हापासून पाखरं कशी खुळावली.../ पानासकट ऊस हसला, पेरात काकवी डचमळली...' ही कविता त्या काळात फारच दाद देत राहिली आणि गाजलीसुद्धा. तरीही कृषी संस्कृतीमधील दु:खद जाणिवा, त्यात होणारी स्त्रियांची आबाळ असा आशय व्यक्त करणाऱ्या त्यांच्या कविता श्रेष्ठ दर्जाच्याच आहेत.

गवस यांचे 'रिवणावायली मुंगी' आणि 'आपण माणसात जमा नाही' हे दोन स्वतंत्र आणि रणधीर शिंदे यांनी संपादित केलेले 'निवडक राजन गवस' असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले असले तरी ते









सातत्याने कथालेखन करत असतात. गवस यांच्या बहुतांश कथा ह्या भारतीय स्त्रीवादी आहेत, असं विधान केलं तरी ते वावगं ठरणार नाही, इतक्या त्या स्त्रीकेंद्री जाणिवा स्पष्ट करणाऱ्या आहेत. कृषी संस्कृतीमधील स्त्रियांचं जगणं, त्यांचे प्रश्न, समस्या, कुटुंब व्यवस्थेतील त्यांचं स्थान, याबद्दल या सर्व कथा बोलत राहतात. भारतीय साहित्य खऱ्या अर्थाने परसदारातच लिहिलं गेलं पाहिजे असं वाटणाऱ्या 'घुसमट', 'हुंदका', 'तळ' इत्यादींसारख्या कथा स्त्रीवादी दृष्टीचं महत्त्व अधोरेखित करतात. भारतीय कृषी संस्कृतीमध्ये या स्त्रिया करारी, धाडसी आणि स्वाभिमानी आहेत. गवस त्यांची साने गुरुजीप्रणित माणुसकीची स्त्रीविषयक दृष्टी कथावकाशातून साकार करतात. 'खांडूक'सारखी कथा पुढे 'भंडारभोग' या कादंबरीत विस्तारते. गवस यांना 'छळणाऱ्या गोष्टी' साहित्यविषयक जीवनदृष्टी देतात, आणि 'छळणाऱ्या गोष्टी' कादंबरीत विस्तारतात आणि पुढे संशोधन प्रकल्पसुद्धा त्यांना याच छळणाऱ्या गोष्टींचा शोध घेण्यास भाग पाडतात आणि अशाच प्रकारचे शोध प्रकल्प त्यांनी हाती घेतले आणि संशोधन करत राहिले.

एखादी छळणारी गोष्ट जशी गवस यांच्या डोक्यात भिनभिनत असते, तशीच एखादी समस्या त्यांच्या डोक्यात सतत सलत राहिलेली असते. ती समस्या म्हणजे 'देवदासींची समस्या'. या देवदासींच्या प्रश्नावर प्रचंड पायपीट करून, खूप मेहनत घेऊन देवदासी चळवळ पुढे नेण्यासाठी गवस यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा होता. या चळवळीत अहोरात्र काम करत राहिल्याने त्यांच्या डोक्यात देवदासीचा आशय इतका खचाखच भरला होता की तो 'चौंडकं' या कादंबरीत केवळ एक महिन्यामध्ये शब्दबद्ध केला. पुढे याच कादंबरीचा पुढचा भाग म्हणून 'भंडारभोग' ही कादंबरी अत्यंत महत्त्वाची (magnum opus) ठरली. 'चौंडकं'मधील 'सुली' आणि 'भंडारभोग' मधील 'तायाप्पा' हे आता जोगतीण आणि जोगता यांची मिथक् सृष्टी निर्माण करणारी ठरली आहेत, इतक्या प्रभावीपणे गवस यांनी त्यांची रचना केलेली आहे. रणधीर शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, 'गवस यांनी या कादंबऱ्यांतून समस्याप्रधानतेबरोबरच एक विचारविश्वही उभं केलं आहे'.







('चौंडकं' - कन्नड)



'धिंगाणा' ही कादंबरी वाचताना बऱ्याच वेळा भाऊ पाध्ये यांच्या 'वासू नाका' या कादंबरीशी तुलना करण्याचा वाचकांना मोह होतो. त्याचं कारण गवस यांनी भाऊ पाध्ये यांच्या साहित्यावर केलेलं संशोधन हेच असावं; पण 'वासू नाका' आणि 'धिंगाणा' या दोन्ही कादंबऱ्यांची आणि कादंबरीकारांचीसुद्धा संवेदनशीलता या तुलनेस बाधा आणते. ही संवेदनशीलता केवळ ग्रामीण आणि नागर अवकाशापुरती नसून जीवनविषयक आणि जगण्या-मरण्याच्या धडपडीतून निर्माण झालेली आहे. 'धिंगाणा' मधील तरुण पदवीधर सभोवतालच्या वास्तवाला शह देण्यासाठी सगळे उपद्व्याप करतो पण त्यातून तो निराश होतो. परंतु भाऊ पाध्यांच्या 'वासू नाका'मध्ये पोरवयात बकाल वस्तीतले बकाल आयुष्य जगत असताना बिघडलेल्या अतृप्त लैंगिक वासना चित्रित झालेल्या दिसतात. तरीही भाऊ पाध्ये आणि गवस दोघेही कादंबरीकार नवनैतिकतावादी देशी परंपराच नेहमी पुढे नेण्याचा प्रयत्न करतात; ग्रामीण किंवा नागर अशी विभागणी इथे अप्रस्तुत ठरते.

त्याच पद्धतीने 'कळप' या कादंबरीतील रघु चिलमी याची कहाणी 'साठात जन्मलेल्या आणि ऐंशीत चेहरा हरवलेल्या तरुणाचं' सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेशी असलेलं नातं अधोरेखित करतं. काहीतरी अर्थपूर्ण शोधणाऱ्या तरुणांच्या हाती शेवटी निराशा येते; त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्षेत्रातील ढोंगीपणा आणि अशा ढोंगी लोकांचे 'कळप' जे साहित्य विश्वालासुद्धा मोकळे सोडत नाहीत. गवस यांची 'तणकट' ही कादंबरी साहित्य अकादमीच्या मानाच्या पुरस्कारास पात्र ठरली. या कादंबरीने 'दलित साहित्य' या संकल्पनेलाच छेद दिला. ही कादंबरी लिहिताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेषत: 'कास्ट इन इंडिया', 'एनहिलेशन ऑफ कास्ट', 'मुक्ती कोण पथे', मातंग तरुणाचं आंबेडकरांना लिहिलेलं पत्र आणि आंबेडकरांनी त्याला दिलेलं उत्तर, हे सगळं पार्श्वभूमीला ठेवून गावगाड्याची कहाणी गवस यांनी साकार केली आहे. कबीर कांबळे आणि मोहन बल्लाळ ही नायकाची जोडी आंबेडकरप्रणित देशी जाणिवा जागृत







('तणकट' - कन्नड)



- कानडी भाषेत राजन गवस यांच्या १३ कथा अनुवादित झाल्या आहेत.
- इंग्रजी भाषेत राजन गवस यांच्या सहा कथा अनुवादित झाल्या आहेत.
- 'ब-बळीचा' ही कादंबरी इंग्रजी भाषेत अनुवादित झाली आहे.
- 'भंडारभोग' ही कादंबरी इंग्रजी भाषेत अनुवादित झाली आहे.
- 'चौंडकं' (कानडी भाषेत)
- 'तणकट' (आसामी, कानडी, इंग्रजी, गुजराथी, हिंदी भाषांत)
- 'भंडारभोग' (कानडी, हिंदी आणि इंग्रजी)
- 'रिवणावायली मुंगी' (कथासंग्रह, कानडी भाषा)

करते पण बाळू शेडबाळेच्या रूपाने 'तणकट' पेरलं जातं आणि मूळच्या आंबेडकरी पिकाचा नाश करतं. अशा प्रकारची कादंबरी मराठीत क्वचितच लिहिली गेली असावी; परंतु जातीयवादी वाचन या कादंबरीच्या मौलिकतेस बाधा आणते.

'ब, बळीचा' ही गवस यांची अत्यंत महत्त्वाची, एक उत्कृष्ट नमुना (master piece) ठरावी अशी कादंबरी. या कादंबरीची रचना करताना गवस यांनी कथानकामध्ये उच्च प्रतीची सर्जनशील ऊर्जा भरून त्या ऊर्जेची तीव्रता वाढवत वाढवत कथानक गतिमान केलं आहे. या कादंबरीतील प्रमुख पात्र कल्लप्पा कोणकेरी याच्या गायब होण्याचं गूढ हे अनेक उपकथांच्या साहाय्याने, विविध साहित्य प्रकारांच्या साह्याने, एकाच कोंदणात ठेवलं आहे. ही सर्व उपकथानकं गुंफताना त्यांनी एकोणिसाव्या, विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील समांतर आणि विरोधी असणाऱ्या प्रश्नातून निर्माण होणारी खरी आणि खोटी नैतिकता, वास्तव आणि काल्पनिक आशयघनता, बहुजन आणि अभिजनांची नैतिकता, एकमेकांसमोर ठेवल्या आहेत. 'ब बळीचा' ही ज्योतिराव फुले, गांधी आणि आंबेडकरप्रणित भारताची संस्कृती समीक्षा आहे. ती भारताच्या विचार प्रणालीच्या संघर्षाची कहाणी आहे. ही कथा उलगडताना गवस यांनी आंबेडकरांचा अनुकरणाचा संसर्ग हा महत्त्वाचा सिद्धांत मानून 'ब, बळीचा' हा एक 'बळी ते वामन' हा प्रवास 'ब, बळीचा अन् भ, भ्रष्टाचाराचा' या सांस्कृतिक बहुजन बाराखडीत मांडला आहे. भारतीय लेखकाला भारतीय वास्तववादी परंपरेचं विस्तारशील रणांगण असल्यामुळे श्रेष्ठ प्रतीची कादंबरी लिहिता येते हे गवस यांनी सिद्ध करून दाखविलं आहे.

**अशोक बाबर**
९४२०३३९०९२

समाजकार्य – विशेष पुरस्कार (दलित व भूमिहिनांचे हक्क)

# शांताराम पंदेरे
## आमच्या पिढीचा आद्य ‘कूल गाय’

□

संजीव चांदोरकर



*तरुणपणी युक्रांदसारख्या चळवळीशी जोडलेला हा सामाजिक कार्यकर्ता कायमच 'कार्यकर्ता' या भूमिकेत राहिलेला आहे. या लेखातले नुसते फोटो पाहिले तरी ते ग्रामीण जीवनात, तिथल्या लोकांच्या सुखदु:खात किती सहभागी झाले आहेत, याची साक्ष पटते. दलित आणि भूमीहिनांची लढाई ते आयुष्यभर लढले. शांतारामसारखे कार्यकर्ते तांत्रिकदृष्ट्या एखाद्या पक्षाचे/संघटनेचे असले तरी ते खऱ्या अर्थाने संपूर्ण परिवर्तनवादी चळवळीचे असतात.*

**सध्याचे मिल्लेनियल्स** फक्त एखाद्या शब्दातून एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करू शकतात; जसे की 'कूल गाय'. नेहमी रिलॅक्सड, कधीही एक्साईट न होणारा, फालतू चिंता न करणारा तो 'कूल गाय'.

शांताराम पंदेरे आमच्या पिढीतील आद्य 'कूल गाय' आहेत. गेल्या ४५ वर्षांच्या आमच्या दोस्तान्यात मी शांतारामला कधीही भावनिक झालेला बघितलेला नाही. अपवाद एकच. २०१४ मध्ये अर्धांगवायूचा ॲटॅक आल्यानंतर, आजाराचं गांभीर्य कळल्यानंतर, हॉस्पिटलमधील बेडवर एखाद्या मित्राचा हात हातात घेऊन, नि:शब्द रडणारा शांताराम.

ध्यानीमनी नसताना आलेल्या झटक्यामुळे, अक्षरश: पायाला चाके लावून भारतभर फिरणाऱ्या शांतारामचा दिनक्रमच पार बदलून गेला खरा. पण, चिकाटीने, आपल्यातील सारा 'कूलनेस' पणाला लावत, मंगल-धरती आणि मित्र / सहकाऱ्यांच्या मदतीने, गेल्या आठ वर्षांत, पुन्हा एकदा उभा राहिला आमचा 'कूल' दोस्त / कॉम्रेड. महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी / पक्ष / संघटनातील हजारो कार्यकर्त्यांचे, सामान्य नागरिकांचे 'बापू' आणि जवळच्या मित्रांचा 'शांतू'; मंगल-शांतारामची बायको, मात्र न चुकता त्याला नेहमीच पूर्ण नांवाने संबोधते : शांताराम!

१९५४ सालात रत्नागिरीतील लांज्याजवळ केळवलीमध्ये जन्मलेल्या शांतारामची पहिली काही वर्षे गावात गेली. त्या काळात हजारो कोकण्यांप्रमाणे शांतारामचे वडील बुधाजी, चाकरमानी बनून दादरच्या कोहिनूर मिलमध्ये भरती होत, बायको मुलांसह मुंबईत स्थायिक झाले. कोहिनूर मिल चाळीत राहताना, नायगावच्या शाळेत शिकतांना वारकरी वडिलांकडून आणि कुटुंबासाठी अहोरात्र राबणाऱ्या आई-बहिणींचे संस्कार घेत शांताराम रुइया कॉलेजमध्ये दाखल झाला.

मागच्या शतकातील साठी-सत्तरीची दशके, संवेदनशील आणि विचारी मन असणाऱ्या, थोडे बहुत वाचन असणाऱ्या तरुणांची मने ढवळून टाकणारी होती. एखादा मोर्चा किंवा आंदोलन, एखादे भाषण नाहीतर पुस्तक, अशा तरुणांना 'ॲक्टिव्हिजम'कडे खेचून घ्यायला पुरेसे ठरत असे. जसे कॉ. गोदूताई परुळेकरांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो'ने शांतारामला खेचले. मग असे भारावलेले तरुण स्वत:च एकाच वेळी संघर्ष आणि नवनिर्माण करू पाहणाऱ्या एखाद्या परिवर्तनवादी संघटना /

पक्षाला शोधत जायचे. कम्युनिस्ट, समाजवादी पक्षाच्या विद्यार्थी / युवक संघटना, दलित पॅन्थर, संघर्ष वाहिनी, युवक क्रांती दल (युक्रांद) अशा कितीतरी संघटना तरुणाईच्या विद्रोह आणि काहीतरी नवीन घडवण्याच्या ईर्ष्येने रसरसलेल्या होत्या.

रुइया आधीच युक्रांदच्या विद्यार्थी संघटनेत खेचला गेलेला शांताराम, विद्यार्थ्यांचे नियतकालिक काढणे, विविध आंदोलनातील सहभाग, अभ्यासवर्ग, शिबिरात गुंतत जात असतांना आणीबाणी जाहीर झाली. मराठवाड्यात युक्रांदचे बरेच काम होते. तेथील संघटनात्मक जबाबदाऱ्यांत हातभार लावण्यासाठी शांताराम मराठवाड्यात दाखल झाला. परभणी, औरंगाबाद करत शांताराम वैजापूर तालुक्यात वीरगाव, पाराळा भागात स्थिरावला. आणि तेथेच युक्रांदचा पूर्णवेळ सामाजिक-राजकीय कार्यकर्ता म्हणून काम करण्याचा निर्णय त्याने घेतला. त्यानंतर पुढच्या अनेक दशकांत युक्रांद-लोकसमिती, भारिप बहुजन महासंघ, वंचित बहुजन आघाडी अशा राजकीय संघटना / पक्षात शांताराम राजकीय कार्य करत राहिला आहे. त्या सर्वांतील सामायिक धागा एकच: प्रस्थापित सामाजिक-आर्थिक-राजकीय शोषणकारी व्यवस्था बदलण्यासाठी फुले-आंबेडकरी, साम्यवादी-समाजवादी विचारधारेची कास धरणे. विविध वर्तमानपत्रे, नियतकालिकांत लेख लिहिण्याच्या जोडीला नव्वदीमध्ये एक पुस्तक लिहून 'भगवा: तुकोबाचा की वैदिक हिंदुत्वाचा' असा रोखठोक प्रश्न विचारणारा शांताराम होता.

वाचन, मनन, चिंतन, अनेक नेते, विचारवंतांच्या सहवासामुळे शांतारामचा सामाजिक-राजकीय कॅनव्हास व्यापक बनत गेला. फक्त आपल्या कार्यक्षेत्रापुरते, फक्त आपण निवडलेल्या समाजघटकांच्या ताबडतोबीच्या प्रश्नांपुरते त्याचे 'कार्यकर्ता'पण मर्यादित राहणे अशक्य होते. भूमिहीन, आदिवासी,



वन हक्क कायदा २००६ चर्चा

गायरान जमिनी, जाती निर्मूलन, महिलांचे अधिकार, हमाल/ मापाडी / शेतमजुरांचे प्रश्न, रोजगार हमी... महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेच्या जवळपास प्रत्येक ज्वलंत प्रश्नावर शांतारामने राजकीय-वैचारिक भूमिका घेत, राजकीय व्यासपीठावरून संघर्ष आणि संघटनात्मक काम केले आहे. अशा प्रश्नांवर महाराष्ट्रात झालेल्या पक्ष / संघटनांच्या आंदोलन / आघाड्यांचे शांतारामने नेतृत्व केले आहे. याचाच एक भाग म्हणून 'भारतीय लोक व पर्यावरण विकास संस्था (लोकपर्याय)' ही विकासात्मक कामे आणि कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारी संस्था शांताराम आणि मंगल गेली २० वर्षे चालवत आहेत.

शांतारामच्या राजकीय आणि संघटनात्मक कामाचे महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीतील योगदान मोजता येणारे नाही. पण त्याच्या कार्यक्षेत्रातील उपलब्धीची छोटी झलक : सुमारे १,१०० कुटुंबांना १,५०० एकर गायरान जमीन आणि ३७५ भूमिहीन आदिवासी कुटुंबांना ८०० एकर वनजमीन मिळवून दिली, ज्यात बायकोचे नाव सातबाऱ्यावर आहे. त्याशिवाय सुमारे ३५,००० भिल्ल-ठाकर-पारधी आदिवासींना जात प्रमाणपत्रे मिळवून दिली आहेत.

आणीबाणीच्या काळातच मराठवाड्यात पूर्णवेळ काम करताना शांतारामची मैत्री अहमदनगर जिल्ह्यातील राशीनला जैन-मारवाडी कुटुंबात वाढलेल्या कार्यकर्तीशी, मंगल खिंवसराशी झाली. शांताराम तर स्वत:ची मुळे तोडून आलेला. पण मुलगी असल्यामुळे मंगलचे तसे नव्हते. घरच्यांचा प्रचंड विरोध पत्करून मंगलने शांतारामला जीवनभर साथ देण्याचे ठरवले. गेली ४५ वर्षे जीवनाच्या खाचखळग्यांच्या रस्त्यावरून दोघांनी एकमेकांना जिवाभावाची साथ दिली आहे. पण ही काही त्या दोघांची पर्सनल ट्रीप नव्हती; औरंगाबादेतील मंगल / शांतारामचे प्रत्येक घर चळवळीतील कार्यकर्त्यांचे



आपले अधिकार यावर चर्चा



शांताराम



शांताराम

हक्काचे घर राहिले आहे. त्या काळात मंगल-शांतारामचे लग्न आणि त्यांचे एकमेकांना साथ देणे एक आख्यायिका झाले होते; आणि नंतरच्या काळात त्याच आख्यायिकेने भिन्न जाती-धर्माच्या, एकमेकांच्या प्रेमात पडून लग्नाचा विचार करणाऱ्या अनेक तरुण-तरुणींना ताकद दिली आहे.

मंगल-शांतारामने आपली मुलगी 'धरती' स्वतंत्र प्रज्ञेची एक प्रौढ स्त्री बनेल हे कसोशीने पाहिले. धरतीने आपल्या आई-वडिलांचा तिच्यावरील विश्वास सार्थ ठरवला. शालेय जीवनापासून जीवशास्त्रात / बायोलॉजीत प्रचंड रस दाखवत, शिष्यवृत्त्या मिळवत, तिने स्वत:च्या हिमतीवर देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थांतून पदवी / पदव्युत्तर शिक्षण घेतले. सध्या ती अमेरिकेतील ओहियो विश्वविद्यालयात जीव-वैद्यकीय क्षेत्रात संशोधन आणि त्याच वेळी पीएच.डी. करत आहे.

पण शांतारामच्या भावनिक आयुष्याचा कॅनव्हास खूप मोठा आहे. अलीकडे तो त्याच्या फेसबुकवर 'आठवणीचा खकाना' सिरीज चालवत आहे. त्यात कोकणातल्या घरातील, शेतातील आठवणीपासून कोहिनूर चाळीतील आयुष्य, तंबाखू-पानाच्या गाद्या, तेथील राडे यांची वर्णने, फोटो तो शेअर करत असतो.

शांतारामच्या व्यक्तिमत्त्वात 'लेयर्स' कमी आहेत. हा एकजिनसीपणा त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे; तुमच्या राजकीय वैचारिक भूमिका, सार्वजनिक आणि व्यक्तिगत आयुष्य यांना ओवणारा एकच एक धागा असला पाहिजे असा त्याचा आग्रह राहिला आहे. याच आरस्पानी व्यक्तिमत्त्वामुळे दिल्लीतील एखाद्या थिंकटॅन्कच्या बैठकीपासून, एखाद्या कार्यकर्त्याच्या घरातील किचनपर्यंत तो लीलया वावरू शकतो, प्रा. गं. बा. सरदारांसारख्या ऋषितुल्य विचारवंताबरोबर आणि पाराळ्यातील आदिवासी स्त्रीबरोबर सहज-संवाद साधू शकतो आणि रुइया कॉलेज समोरील पायऱ्यांपासून मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयातील पुस्तकात तेवढाच रममाण होऊ शकतो.

वेळेच्या व्यवस्थापनापासून सर्वच बाबतींतील शांताराममध्ये असणारा 'व्यवस्थापक' अचंबित करणारा आहे. अगदी साध्या दोघांमधील चर्चेमध्येदेखील स्वत:च्या पॅडमध्ये छोट्या नोंदी करणारा;



शांताराम मोरे आईसोबत




भिल्ल ठाकर आदिवासी जात प्रमाणपत्र वाटप

लेखांकन पद्धतीतील जमाखर्च आणि ताळेबंद यातील ट्रस्टमधील कायदेशीर तरतुदी चिकाटीने समजून घेणारा; प्रत्येक खर्च झालेला रुपया टिपून ठेवणारा; कॉम्प्युटर, स्मार्टफोन, इंटरनेट शिकून त्याचा वापर करणारा; मोजके खाणारा, उशिरा रात्रीपर्यंत चर्चा झाल्यावर दोन-तीन तास झोप घेऊन सकाळी फ्रेश असणारा शांताराम.

शांतारामसारखे नेते / कार्यकर्ते तांत्रिकदृष्ट्या एखाद्या पक्ष/ संघटनेचे असले तरी ते खऱ्या अर्थाने संपूर्ण परिवर्तनवादी चळवळीचे असतात. गेली अनेक दशके मिळतील तेथून असंख्य पॅम्प्लेट्स, पुस्तिका, पुस्तके भरभरून शांतारामने औरंगाबादला घरी नेली आहेत. महाराष्ट्रातील अगणित अभ्यासवर्ग, बैठकांच्या त्या त्या वेळी काढलेल्या टिपणांच्या असंख्य पॅड्स / वह्यांनी त्याचे घर ओसंडून वाहत आहे. शांताराम महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीचा गेल्या अर्धशतकाचा चालता बोलता संदर्भग्रंथ आहे. घरातून पूर्वीसारखे बाहेर पडता न येण्याच्या आपत्तीचे शांतारामने संधीत रूपांतर केले आहे. पाच दशकांत मिळवलेल्या सामाजिक-राजकीय अंतर्दृष्टीचा वापर करत शांतारामने लिखाणाचे / दस्तावेजीकरणाचे अनेक प्रकल्प राबवायला घेतले आहेत, ज्याची आज नितांत गरज आहे.

‘आवड आणि आनंद वाटणारे काम, कधीच थकवा नाही’ ही टॅगलाईन आहे शांताराम पंदेरे यांच्या फेसबुक पेजची. त्याला नेहमी त्याच्या आवडीचे, आनंदाचे काम मिळो आणि कधीच थकवा न येवो अशी मित्र म्हणून कामना करूयात!

**संजीव चांदोरकर**
९९२०२८००३६

विशेष पुरस्कार (साहित्य)

# सोनाली नवांगुळ
# नवनव्या अनुभवांच्या शोधात...

□

परिमला प्रभुदेसाई



*सोनालीचा जगण्याचा, लढण्याचा, लिहिण्याचा उत्साह पाहिला की आपल्यालाच आपण 'अपंग' तर नाही ना, अशी शंका मनात येते. ती तिच्या तब्येतीशी जुळवून घेता घेता समस्त मानवजातीशीच जुळवून घेण्याची मनीषा मनात बाळगून असते. तिचे लेखन, तिचे अनुवाद, तिच्या अनुवादाला साहित्य अकादमीचा मिळालेला पुरस्कार हे सारे तिच्या उत्कट जगण्याचेच विविधरंगी आविष्कार आहेत. नवनव्या अनुभवांना सामोरे जाण्याचा आनंद सतत तिला लुटायचा असतो.*

**सोनाली नवांगुळ** आणि माझ्या ओळखीला आता जवळपास २० वर्षं झाली. आम्ही दोघी अगदी भिन्न पार्श्वभूमी असणाऱ्या. कधीकाळी एका सामाजिक कार्यात भाग घेण्याच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो. आमची आश्चर्यकारकरीत्या भेट झाली आणि गाठी जुळल्या त्या कायमच्याच. आमची अगदीच किशोरवयात भेट झाल्यामुळे सोनालीचा अगदी सुरुवातीपासूनचा प्रवास मला ठाऊक आहे. सुरवातीला एका सामाजिक संस्थेमध्ये तिनं नोकरी करण्यापासून ते पॅराप्लेजिक असूनही स्वबळावर संस्थेतून बाहेर पडून कोल्हापुरात स्वतंत्रपणे घर घेऊन राहण्यापर्यंतचा. पत्रकारितेतून तिला लिखाणाची वाट सापडली तेव्हापासून तिची स्वत:ची आणि अनुवादाची अशी मिळून तिची एकूण आठ पुस्तकं आजमितीला प्रकाशित झाली तिथपर्यंतचा. या साऱ्या प्रवासाची मी जवळची साक्षीदार आहे.

आम्ही कुठल्याही कार्यक्रमाला गेलो की नेहमीच घडणारे हे प्रसंग! - तिच्या मनमोकळ्या आणि थेट ओळखीचं बोलण्याने नवखा माणूस तिचं दृश्य अपंगत्व विसरून तिच्या थेट प्रेमातच पडतो, हे मी बरेचदा, नव्हे, प्रत्येक वेळी होताना पाहिलं आहे. नव्याने भेटलेल्या व्यक्तीला तिच्याशी बोलताना आधी अवघडल्यासारखं होतं, हे तिला नेमकं माहीत आहे. मग ती अशा काही मोकळ्या गप्पा सुरू करते, विनोद करते, सोबतच्या मित्र-मैत्रिणींची ओळख करून देते, प्रसंगी त्यांची खिल्लीही उडवते आणि नव्या व्यक्तीला हसायला नि मोकळेपणाने बोलायला भाग पाडते. विशेषत: लहान मुलांमध्ये तर ती इतकी रमते, की ती त्यांच्यासोबत त्यांच्या इतकीच कितीही वेळ असंबद्ध बडबड करू शकते! मुलंही मग तिच्या व्हीलचेअरला हात लावून पाहतात. तिला बिनदिक्कतपणे विचारतात, की 'तुला चालता येत नाही तर मग तू शू करायला कशी जातेस?' अशा थेट, निरागस पण अवघड प्रश्नांना सोनाली मुलांना समजेल अशी छान उत्तरं, न लाजता, देते. खरं तर प्रत्येक नव्या संवादाच्या सुरुवातीला लहान-मोठ्या प्रत्येकाची अवघडलेपणाची नि तिच्या अवस्थेबाबतीतील अनभिज्ञतेची भिंत पाडणं सोपं नसतं. पण ही धडपड ती प्रत्येक नव्या व्यक्तीला भेटल्यावर न थकता करते. त्यामुळेच ती नवनव्या माणसांशी जोडली जाते नि मुख्य प्रवाहात सहज सामावून जाते. हा अनुभव नव्या व्यक्तीसाठी प्रेरणादायी वगैरे असला तरी मला तिच्या त्या धडपडीमध्ये नव्या माणसांशी जोडलं जाण्याची, विचारांचं आदानप्रदान होण्याची भूक दिसते.

ही तिची भूक मला केवळ अशा भेटीगाठींच्या बाबतीतच नव्हे तर तिच्या संपूर्ण जगण्यामध्ये जाणवते. पॅराप्लेजियातून उठून स्वयंपूर्ण होण्याआधी, कोवळ्या वयातली जवळपास ११ वर्षं सोनालीने घरातल्या चार भिंतींमध्ये राहून बाहेरच्या जगाची केवळ कल्पना केली होती. त्यामुळे नंतर स्वतंत्रपणे राहायचं ठरवल्यावर नव्या संधी घेत, नव्या वाटा चोखाळत, नव्या अनुभवांनी पल्लवित असं ती जगली तर त्याचं आश्चर्य वाटू नये. ती नवख्या गावा-शहरा-देशामध्ये मनसोक्त भटकंती करते. गोव्यात घेतलेल्या पहिल्या 'स्पा'च्या अनुभवानं शहारते. मॉलमध्ये विंडो शॉपिंग करते. स्विमिंग पूलमध्ये पोहून बघते. उत्तम सिनेमे, वेबसिरीज आणि कार्यक्रम आसुसून पाहते. आलेला प्रत्येक अनुभव हा छानच असतो असं नाही, कधी काही प्रयोग फसतातही. पण चांगल्या-वाईट परिणामांची संपूर्ण जबाबदारी घेऊन, उमेद न हरता, तिच्या जगण्यातून तिने वेचलेले उत्तम क्षण तिला पुढचे बरेच दिवस रोमांच देत राहतात. सतत भेडसावणाऱ्या शारीरिक प्रतिकूलतेतून सावरण्यासाठी मानसिक उभारी देतात. जगण्यासाठीचं तिचं हे लहान मुलागत असलेलं आसुसलेपण तिच्यासाठी जाणिवांच्या नव्या खिडक्या उघडतं, तिच्या विचारी मनाला सकारात्मक मंथन करायला भाग पाडतं आणि पराकोटीच्या अपंगत्वातून येणाऱ्या नैराश्यात बुडून जाण्यापासून वाचवतं. या तिच्या जगण्याच्या प्रक्रियेतूनच आज 'जितकी संकटं,





साहित्य अकादमी पुरस्कार (अनुवाद) प्राप्त पुस्तक

अडचणी किंवा विरोध अधिक- तितका त्या परिस्थितीतून जास्त झळाळून उठण्याचा' तिचा लढवय्या स्वभाव तयार झाला आहे. हाती-पायी धड असणाऱ्या माझ्यासारख्या अनेकांना खूप काही शिकवून जाणाऱ्या तिच्या या वैयक्तिक प्रगतीपुढे, मला वाटतं, तिने आजवर केलेली विशेष उल्लेखनीय साहित्यिक-सामाजिक प्रगती ही केवळ तिच्या अशा पद्धतीने जगण्यातून जन्माला आलेली आनुषंगिक निष्पत्ती आहे.



चित्र : शुभा गोखले

सोनालीचा साहित्यिक प्रवास आणि आयुष्याचा प्रवास हे एकमेकांहून फारसे वेगळे नाहीत. घरात बसून काढलेल्या लहानपणात पुस्तकंच तिची अखंड सोबती होती. त्यामुळे उत्तम वाचन, मनावर असलेले कवितांचे संस्कार, आल्या-गेल्याला वाचलेल्या गोष्टींचं कथन करण्यातून आपसूक आलेलं भाषेवरचं प्रभुत्व नि ओघवतं वक्तृत्व हे सारे गुण तिच्यात होते. पुढे त्याला जोड मिळाली ती मनाच्या सताड उघड्या खिडक्यांतून अनुभवलेल्या व्यक्तींची-प्रसंगांची-प्रवासांची आणि जागतिक सिनेमांची! शारीरिक-मानसिक अडचणी असणाऱ्यांशी सर्वांनीच सर्वसमावेशकपणे, समानतेने पण संवेदनशीलतेने वागले पाहिजे, असा तिचा आग्रह असतो. त्यामुळे रोजच्या आयुष्यातल्या लहान-मोठ्या प्रसंगाकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन इतरांपेक्षा निराळा, अधिक डोळस आणि प्रगल्भ आहे. तिच्या या दृष्टिकोनात केवळ बाह्य प्रसंग नसून त्यांच्या साक्षीतून निर्माण होणारी शरीर आणि मनाच्या परस्पर-संबंधांची, उलाघालींची एक विलक्षण अंतस्थ गुंफणही आहे. ती वाचणाऱ्याला विचार करण्याकरिता प्रवृत्त केल्याशिवाय राहत नाही.

तिचे लिखाणाचे विषय तरी किती वैविध्यपूर्ण! - कधी कुठल्याशा समुद्रातल्या डॉल्फिन माशांची संख्या कमी होण्याविषयी, कधी जगावेगळ्या विषयांवर काम करणाऱ्यांचे व्यक्ती-विशेष किंवा मुलाखती, कधी लहानांसाठी तर कधी मोठ्यांच्या कथा, कधी तिच्या शारीरिक अडचणींविषयी, कधी आपल्या विचारांना कलाटणी देणाऱ्या विलक्षण सिनेमांविषयी, तर कधी अपंगांच्या समाजाने दुर्लक्ष केलेल्या लैंगिकतेविषयी! तिचे हे वैविध्यपूर्ण विषयांवरचे लेख वाचताना वाटायचं की, ही घरात राहून इतक्या निरनिराळ्या विषयांवर इतकं अभ्यासपूर्ण लिहिते तरी कशी!

लिखाणाचं काम ती गंभीरपणाने, अत्यंत उत्कटतेने आणि समरस होऊन करते. त्यामुळेच ऑस्कर पिस्टोरिअसचं 'ड्रीमरनर' हे आत्मचरित्र असो किंवा सलमाची 'अवर पास्ट मिडनाईट' सारखी

# मैत्र
## (सोनाली नवांगुळसाठी)

दलदलीतल्या स्वप्नांना
बाहेर काढणं सोपं तर नव्हतंच
तुझं धाडस असं
की तू त्यांना चाकं लावलीस

तळपायांखाली एकवटलेलं
दुःखाचं जडत्व झुगारून
चाकांसकट तू आकाशात घेतलेली भरारी अन् तू
आयुष्यातल्या हजार रंगांकडे
तुझं झेपावण
मला जगण्याचं बळ देतं

लाघव तर असं
जिथं पाऊल टाकलंस
ते माहेर होऊन गेलं कायमचं

सहानुभूतीचा हात जवळ येतोय
अशी चाहूल लागता क्षणीच
वीज होऊन कडाडणं
सोपं तर नाहीच सखी
या दुनियेशी व्यवहार करणं

आपले पंख आपलं आकाश
आपलं रान आपलं झाड शोधताना आलेला थकवा
कुठे दडवतेस
कसा सांभाळतेस
गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेत येऊ न देता
डोळ्यातल्या डोळ्यात अश्रू

तर धाडसाच्या पडद्याआड
कधी कधी भयभीत होणाऱ्या
तुझ्यातल्या सशासाठी

माझ्या तळहातावर कायम
असेल ताजं गवत
एवढं लक्षात असू दे

फार झगमगीनंतर येणारी उदासी
फार जीवघेणी असते
तिथे आपण एकमेकांना सांभाळू
चिडायचं नाही जगावर
क्षमा मागायची
नात्यात ठेच लागून
दूर गेलेल्या सगळ्यांची
चढू द्यायचा नाही
अहंकाराचा पारा
आणि आटू द्यायचं नाही
आपल्यातलं करुणेचं तळं

निसटत नाही जिवाची कुडी तोवर
फुरसत कुठंय आपल्याला
खूप लिहायचंय स्पर्शज्ञानमधून अंध मित्रांसाठी
आरंभ मधल्या गतिमंद मुलांच्या गलक्यात
गाणं म्हणत रहायचंय
चित्रं पहायचीत डोळे भरून
संगीत ऐकायचंय मन भरून
आपण नेहमी अर्थाच्या शोधात राहू....
तू उलगडून दाखव मला
अभिजात चित्रपटांचा अर्थ
मी वाचून दाखवीन तुला
जगातल्या सर्वोत्तम कविता

**श्रीधर नांदेडकर**

कादंबरी असो, तिला त्यात नमूद केलेल्या धडपडीतली आणि तिच्या जगण्यातली साम्यस्थळं दिसू लागतात. ती त्या मूळ लिखाणाच्या गाभ्यात आधी पूर्णत: विरघळून जाते आणि त्या अंतरंगाचा भाग होऊनच अनुवाद करते. 'अवर पास्ट मिडनाईट' या कादंबरीचा अनुवाद तर त्यातल्या लैंगिक भावभावनांच्या जटिलतेसह तिच्याकरिता अनेक बाबतींत पायरीपायरीवर प्रश्नचिन्ह उभी करणारा होता. परंतु तरीही, त्या अनुवाद-मालिकेच्या संपादक कविता महाजनांनी तिच्यावर ठेवलेल्या विश्वासाला सार्थ ठरवत, त्यानंतरचे जवळपास नऊ महिने ध्यास घेतल्याप्रमाणे कादंबरीच्या संपूर्ण सामाजिक-प्रादेशिक आणि धार्मिक बाजाला जराही धक्का न लावता तिनं तिचं अनुवादाचं काम चोख केलं. इतकं की २०२० मध्ये साहित्य अकादमीनंही त्या कामाची नोंद घेतली! असं हे तिचं कामाविषयीचं झपाटलेपण मेधा पाटकरांच्या चरित्राच्या निमित्ताने त्यांच्या लहानपणात शिरताना असतं, तसंच 'जॉयस्टिक'मधल्या कुमारवयीन मुलामुलींच्या गोष्टी सांगतानाही असतं.

गेल्या वर्षी सोनाली जेव्हा 'मध्यरात्रीनंतरचे तास'च्या तिने केलेल्या अनुवादासाठी 'साहित्य अकादमी'चा पुरस्कार स्वीकारण्यासाठी दिल्लीला गेली, तेव्हा घडलेला हा किस्सा. तिचं पुरस्कारासाठी नाव पुकारल्यावर रॅम्पवरून स्टेज चढायला अर्थातच तिला इतरांपेक्षा थोडा जास्त वेळ लागला. ते पाहून अध्यक्ष म्हणाले, 'त्यांना कशाला वर यायचा त्रास देताहात? आम्हीच खाली उतरून येतो आणि पुरस्कार देतो.' त्यावर सोनाली तत्काळ स्वच्छपणे उत्तरली, 'मी जर कोल्हापूरहून दिल्लीत येऊ शकते, तर या इथल्या स्टेजवर चढणं ही काय बडी बात आहे सर! होऊ दे सर्वांना माझ्या व्हीलचेअरमधून वावरण्याची सवय!'

अनेक व्यासपीठांवरून, व्याख्यानांमधून, कधी कुणा अधिकारी व्यक्तींशी झालेल्या चर्चांमधून सोनालीने अनेकदा सार्वजनिक ठिकाणी अपंगांसाठी मैत्रीपूर्ण वास्तुरचना करण्याच्या मुद्द्यावर भर दिला आहे. त्याचा परिणाम होऊन कोल्हापुरात सिनेमा हॉल, दुकानं, हॉटेलं अशा ठिकाणी अपंगांसाठींच्या पायाभूत सुविधांबद्दल जाण तयार होते आहे. काही प्रमाणात का होईना पण लोकांमध्ये अपंगांच्या शारीरिक, भावनिक व सांस्कृतिक गरजांबाबतीत संवेदनशीलता जागी होऊ पाहते आहे. सोनालीच्या प्रयत्नांना यश येताना दिसत आहे.

असं सारं असलं तरीही, बैलगाडीचा जू पाठीवर पडण्याने वयाच्या नवव्या वर्षी तिला जे अपंगत्व












आलेलं आहे, त्या सोबत जगणं तेवढसं सोपं नाही. तिची प्रकृती हट्टाने तिला दर थोड्या दिवसांनी दणके देते. कधी जुनी, कधी नवी दुखणी डोकं वर काढतात आणि तिला आतून घाबरवतात. एरवी आयुष्यात हव्याहव्याशा वाटणाऱ्या या स्वातंत्र्याची किंमत, अशा या आजारपणांच्या दरम्यान, तिच्या इतकी दुसऱ्या कुणीही मोजली नसेल. एक तर तिचे बरेचसे त्रास हे वैद्यकीयदृष्ट्या 'अपेक्षितच' असतात. त्यांच्यावर काहीही 'उपचार' नसतो- तीव्रता थोडीफार कमी करण्यासाठी मदत होईल अशी औषधं घेऊन बरं होण्याची वाट पाहावी लागते. अशा वेळी मनाला जे हळवेपण येतं, निराशा येते आणि कुणीतरी कुठलेही सांत्वनाचे शाब्दिक बुडबुडे न सोडता केवळ सोबत असावं असं वाटतं, तेव्हा तिच्या मनोबलाचा खरा कस लागतो. पण अखेरीस सोनाली त्यातूनही जिद्दीने, स्वत:च स्वत:ची उत्तम शुश्रूषा करून टिकून उरते नि निग्रहाने नव्या उत्साहात पुन्हा कामाला लागते. अशा या तिच्या अटळ शारीरिक परिस्थितीमुळेच गुणवत्तापूर्ण जगण्यासाठी अन्न-वस्त्र-निवाऱ्याआधीही तिच्यासाठी तिची 'प्रकृती' ही जगातली सर्वांत मौल्यवान आणि महत्त्वाची गोष्ट ठरते. तिच्याइतकं शरीराशी तादात्म्य साधलेलं मी इतर कुणालाही पाहिलेलं नाही. तिला कधीही फोन वर 'कशी आहेस?' असं विचारलं की तिचं पहिलं उत्तर हमखास तिच्या शरीर स्वास्थ्याविषयीच येतं!

तिच्या कामासाठी समाजाकडून मिळालेल्या कौतुकाच्या थापेसह तिचा कालानुरूप वाढलेला प्रचंड लोकसंग्रह हाताळणं हा तिच्या मागे लागलेला एक असाच नवा उद्योग! क्वचित कधी तिला मदतीसाठी कुणाला हाक मारावी लागते. त्यातून नव्याच गमती सुरू होतात. कुणी 'समाजसेवा', तर कुणी 'देवाची सेवा' म्हणून तिला मदत करतं. कुणी मग हक्काने वेळी-अवेळी येऊन तिची भेट घेऊ पाहतं. कुणाच्या नजरेत 'दया' तर कुणामध्ये मदतकर्ता म्हणून चक्क 'हिरोइजम' दाटून येतो. क्वचित कुणाच्या मनात 'आपल्याशिवाय आयुष्यात हिने काय केलं असतं?' असं काहीतरी येतं. खरं तर आपण सगळेच समाजाचा एक भाग म्हणून जगताना या ना त्या कारणाने कधी इतरांची मदत घेतो आणि त्याची









वेळोवेळी परतफेडही करतो. पण सोनालीसारख्या व्यक्तींचं सामाजिक देवाणघेवाणीचं गणित दुर्दैवानं केवळ कृतज्ञ परतफेडींनी सुटत नाही - तिला त्याला स्पष्टपणे 'सिद्धतेची' धारही लावावी लागते. अपंगत्वाची तीव्रता जास्त असल्याने काही वेळा इतरांची मदत घ्यावी लागत असतानाच स्वत:चा स्वाभिमानही जपणं, मदतकर्त्याविषयी कृतज्ञ राहून त्याच वेळी आपलं आयुष्य कुणाच्याही ताब्यात जाऊ न देण्याचा तोल सांभाळणं ही मानसिकरीत्या प्रचंड दमवणारी कसरत सोनालीला दुर्दैवाने सतत करावी लागते.

आपल्या देशात जवळपास ३ कोटी अपंग नागरिक आहेत. त्यांच्यापैकी सत्तर टक्के गावा-खेड्यातले! त्यामुळे बऱ्याच जणांना स्वत:च्या सबलीकरणासाठी आवश्यक वातावरण किंवा संधी मिळत नाहीत. मग बरेचदा 'दिव्यांग'पणाचा शिक्का मारून समाज त्यांना त्या दिव्यत्वाच्या देव्हाऱ्यात बसवतो नि त्यांच्या मानसिक-शारीरिक इच्छांची चक्क हिंसा करतो! अशा पार्श्वभूमीवर सोनाली नवांगुळ नावाचं एक प्रखर व्यक्तिमत्त्व ३२ शिराळ्यासारख्या एका छोट्याशा खेड्यातून कोल्हापुरात स्वावलंबी व्हायला येतं. पुरेसा अनुभव घेतल्यावर संस्थेचं 'अपंगांसाठी' म्हणून बनवलेलं सुरक्षित(!) कोंदण धाडसाने झुगारून देतं. आयुष्यात पहिल्यांदाच पूर्णत: स्वतंत्रपणे राहताना पोटापाण्यासाठी लेखणी परजत स्वत:चं नाव कमावतं. अनुभवांच्या निरनिराळ्या सडकांवरून आपली चाकाची खुर्ची मजेत वेगानं दौडवत आणि उत्तम पुस्तकं आणि अनुवाद लिहून स्वत:च्या कामाला 'अपंगत्वाच्या' शिक्क्याशिवाय एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवतं!

सोनालीचं आयुष्य अनेक पातळ्यांवर आव्हानात्मक आहे. त्यात वाढत्या तीव्रतेची शारीरिक आव्हानं तर आहेतच पण त्या सोबतच तिने स्वत:च स्वत:ला दिलेली आव्हानंही पुष्कळ आहेत. एखाद्या व्हिडीओ गेम प्रमाणेच जगण्यातल्या अनुभवांच्या प्रत्येक पातळीवर ही आव्हानं बदलत जातात नि कठीण होत जातात. मनात आणलं असतं तर तिला स्वत:पुरती काही मर्यादा केव्हाच आखता आली असती- आणि त्याचं काही विशेष न वाटता समाजाने त्याबद्दल तिला काही विचारलंही नसतं. पण तिनं तसं न करता निवडलेला जगण्याचा मार्ग सोपा नाही. तो तिचा प्रचंड कस लावणारा आहे! मुळात तिला इतरांसाठी कुणी प्रेरणास्थान, मखरातली पूजनीय दिव्यांग-मूर्ती किंवा फार अनुकरणीय समाजसेविका म्हणून जगायचंच नाही. तिला जगायचंय ते एक सामान्य 'माणूस' म्हणून! एक अत्यंत गुणवत्तापूर्ण, चोखंदळ, स्वच्छंद, रसिक आणि स्वत:ला भावणारं खासगी आयुष्य जगणारं माणूस म्हणून. मग तसं जगताना ती अपरिहार्यतेने कधी चुकेल, ठेचकाळेल, धडपडेलही- पण पुन्हा उठेल आणि धावू लागेल, नवी क्षितिजं विस्तारण्यासाठी... प्रश्न हा आहे की जर सोनाली स्वत: रोज नव्या वाढत्या आव्हानांना तोंड द्यायला तयार आहे, तर आपण समाज म्हणून तिला कुठल्याही पूर्वग्रहांशिवाय, स्टिरिओटाइप प्रेरणादायी कोंदणांशिवाय नि कुठल्याही 'इझम'शिवाय समानतेच्या पातळीवर एक माणूस म्हणून स्वीकारायला तयार आहोत का?

**परिमला प्रभुदेसाई**
९५२७६७८८७६

समाजकार्य – विशेष पुरस्कार (विधवा प्रथा निर्मूलन) २०२२

# प्रमोद झिंजाडे
# ‘विधवा प्रथा निर्मूलन अभियाना’चे प्रेरक नेतृत्व

□

प्रशांत कोठडिया



*कोव्हिड महामारीत वारलेल्या माणसाच्या बायकोचे हाल बघून प्रमोद झिंजाडे मनोमन अस्वस्थ झाले. त्यांनी शंभर रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहिलं की 'मी अगोदर गेलो तर माझ्या बायकोचे दागिने काढून घ्यायचे नाहीत, तिचे कुंकू पुसायचे नाही, तिला सन्मानाने वागवायचे'. या वैयक्तिक कृतीची बघता बघता 'वैचारिक चळवळ' झाली. मोठ्या प्रमाणात महिला या चळवळीत आल्या. हेरवाडच्या ग्रामपंचायतीने विधवांच्या सन्मानाचा ठराव केला आणि महाराष्ट्रातल्या सर्वच ग्रामपंचायतींना याची लागण झाली. महाराष्ट्र शासनाने एक ठराव करून संपूर्ण महाराष्ट्राला हा 'हेरवाड पॅटर्न' लागू केला.*

**२०२३ साल** उजाडत असताना, आपल्या सर्वदूरच्या बहुजन समाजातील महिलांची स्थिती आज-ही अतिशय विदारक आहे हे तथाकथित पुरोगामी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वावरताना सहजपणे जाणवते. ग्रामीण भाग असो वा शहरी गरीब वस्त्या, कोणत्याही कारणामुळे एकट्या राहणाऱ्या महिलेला आणि विशेषत: वैधव्य आलेल्या स्त्रियांना ज्या अपमानास्पद, तिरस्कारपूर्ण आणि टिंगलटवाळीच्या वागणुकीला तोंड द्यावे लागते, याची कल्पनाही करवत नाही. विधवेने कोणत्याही सार्वजनिक वा खासगी समारंभात जाऊ नये, रंगीत कपडे घालू नये, हे कमी आहे की काय, तिच्या चेहऱ्यावर हास्याची रेघही उमटायला नको, अशी एक ना अनेक बंधने तिच्यावर वर्षानुवर्षे घातली गेलेली आहेत. ही परिस्थिती कमी होती म्हणून की काय, कोविड महामारीने देशातील अक्षरश: कोट्यवधी आयाबहिणींना जणू एक वेगळेच अग्निदिव्यच करायला भाग पाडले. कोरोना विषाणूंमुळे मृत्युमुखी पडलेल्या पुरुषमंडळींमुळे असंख्य संसार उघडे पडले आणि त्यामुळे विधवा झालेल्या महिलांची ही विदारक स्थिती अस्वस्थ करणारी असली तरी, या क्रूर प्रथेविरुद्ध बोलण्याची पुरुषमंडळींची हिंमत होत नसावी किंवा याबद्दल मौन धारण करणे हे कदाचित त्यांना सोयीचे वाटत असावे. ही परिस्थिती पाहून लहानशा खेड्यातील एक व्यक्ती मात्र खूपच अस्वस्थ होती. प्रमोद झिंजाडे हे या अस्वस्थ होणाऱ्या संवेदनशील व्यक्तीचे नाव.

महात्मा फुले, क्रांतिजोती सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी, संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील आदी समाजसुधारकांच्या विचारांनी पूर्णपणे भारावलेल्या झिंजाडे यांनी, आपल्या तरुणपणी म्हणजेच १९८२ साली करमाळासारख्या दुष्काळी तालुक्यातील 'पोथरे' या त्यांच्या जन्मगावी 'महात्मा फुले समाजसेवा मंडळ' या संस्थेची स्थापना केली आणि ते मागील ४० वर्षांपासून सर्वांगीण ग्रामीण विकासाचे कार्य अविरतपणे करीत आहेत.

सुमारे दोन वर्षांपूर्वीची एका घटनेने झिंजाडे यांच्या आयुष्याला एकप्रकारे कलाटणी दिली. ११ जून २०२० रोजी, झिंजाडे हे सांगली जिल्ह्यात एका कार्यकर्त्याच्या अंतिम संस्काराला गेले होते. चितेला अग्नी देऊन काही क्षण होतात न होतात, इतर विधवांनी त्या कार्यकर्त्याच्या पत्नीचे कुंकू पुसत

तिच्या अंगावर जे काही तुटपुंजे दागिने होते तेदेखील काढायला सुरुवात केली. ती हमसून हमसून रडत होती, ओरडत होती, पण या जुन्या प्रथेपुढे कोणाचे काय चालणार? पुढील काही मिनिटांतच तिच्या वैवाहिक जीवनाचे सारे रंगच पुसून टाकले गेले आणि तुला आता बेरंगी आयुष्य जगावे लागेल, असा संदेशच जणू तिला देण्यात आला. काहीही चूक नसलेल्या एका दु:खी महिलेचा आक्रोश ऐकून झिंजाडे यांच्या मनात कालवाकालव होणे स्वाभाविकच होते. हृदयात वेदनेची कळ उमटली आणि यांनी मनोमन ठरवले, की ही अन्यायी व भयावह प्रथा बंद व्हायलाच हवी. त्यादृष्टीने काय करावे याबाबतचे विचारचक्र त्यांच्या डोक्यात सुरू झाले. लोकांचे पुन्हा एकदा प्रबोधन करून त्यांच्यामध्ये या अनिष्ट प्रथेविरोधात जागृती करण्याची आवश्यकता असल्याचे झिंजाडे यांना जाणवले. मात्र केवळ प्रबोधन व जागृती करून भागणार नाही, तर या प्रथेविरुद्ध कायदेशीर बाबींचाही शासकीय पातळीवरून पाठपुरावा करणे किती महत्त्वाचे आहे, हे पण त्यांच्या लक्षात आले.

दरम्यान कोविडच्या महामारीचे थैमान सुरू झाले. कोविडच्या या आव्हानात्मक काळात झिंजाडे यांना, राज्यातील विविध ठिकाणी गोरगरीब कष्टकऱ्यांना अन्नधान्य व इतर आवश्यक वस्तूंचे वाटप करण्याची मोहीम प्राधान्याने हाती घ्यावी लागली. कोरोनाचे संकट ओसरल्यावर मात्र झिंजाडे यांनी ११ फेब्रुवारी २०२२ रोजी 'विधवा महिला सन्मान व संरक्षण कायदा अभियान' या नावाने व्हॉट्सॲप ग्रुप बनवला आणि आपल्या नव्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीस प्रारंभ केला. सद्य परिस्थितीत 'व्हॉट्सॲप विद्यापीठा'च्या माध्यमातून विद्वेष पसरविण्याचा जो नंगा नाच सुरू आहे, त्या पार्श्वभूमीवर





समाजमाध्यमांचा विधायक कार्यासाठीही वापर करता येतो, याचे झिंजाडे यांनी जणू उदाहरणच समाजापुढे ठेवले. या व्हॉट्सॲप गटामध्ये राज्यातील सरपंच, सामाजिक संस्था, बचत गट, शासकीय अधिकारी यांचा समावेश केला आणि या अनिष्ट प्रथेचे निर्मूलन करणे किती गरजेचे आहे हे पटवून देण्यासाठी या गटातील सभासदांशी संवाद सुरू केला.

झिंजाडे हे मुळातच कृतिशील कार्यकर्ता असल्यामुळे, त्यांनी स्वत:च एक उदाहरण घालून देण्याचे ठरवले. या पारंपरिक अनिष्ट रूढीच्या बंधनातून स्वत:च्या पत्नीला मुक्त करण्याचा झिंजाडे यांनी मनोमन निश्चय केला आणि त्या दृष्टीने, 'माझ्या मृत्युपश्चात माझ्या पत्नीवर या प्रकारच्या अवमानकारक रूढी, परंपरा लादू नयेत, तिचे कुंकू पुसून टाकू नये, तिच्या बांगड्या काढू नये आणि कोणत्याही प्रकारे तिचे विद्रुपीकरण करू नये', असे शंभर रुपयांच्या बॉन्डवर प्रतिज्ञापत्र तयार केले आणि दि. २९ मार्च २०२२ ला ते शासन दरबारी सादर करून एका विधायक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आणि अंधारमय समाजातील एका पणतीच्या प्रकाशात त्याने आश्वासक पाऊल टाकले.

'विधवा महिला सन्मान व संरक्षण कायदा अभियाना'चा समन्वयक या नात्याने झिंजाडे यांनी या विषयावर ग्रामीण भाग पिंजून काढायचे ठरवले. याकरिता त्यांनी राज्यातील सरपंचांशी पत्र, व्हॉट्सॲप, पत्रकं, या माध्यमातून संवाद सुरू केला. २०१९ मध्ये कोल्हापूर व सांगली परिसरात आलेल्या पूरामध्ये मदत कार्य करत असताना, प्रमोदची ओळख कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड या गावचे सरपंच श्री. सुरगोंडा पाटील यांच्याशी झाली होती. या भेटीत, झिंजाडे यांनी विधवा प्रथा निर्मूलन कार्याविषयी सूतोवाच केलेच होते. मात्र पुढील काही महिन्यांतच कोविड महामारीसारखे संकट येईल, याची कोणाला कल्पना असणार? देशभराप्रमाणेच हेरवाड गावातील जवळपास वीस महिलांना वैधव्य आल्यामुळे, त्यांना जे भोगावे लागत होते हे श्री. सुरगोंडा पाटील यांनी प्रत्यक्षात पाहिले होते. याच जिल्ह्यातील माणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. राजू मगदूम हेदेखील झिंजाडेंच्या विचाराने प्रभावित झाले होते आणि त्या दोहोंच्या मनातही या अनिष्ट प्रथेविरुद्ध आपल्या गावात कार्य सुरू करण्याचा विचार घोळतच होता. याच दरम्यान, हेरवाड गावाच्या पंचक्रोशीत वसलेल्या अर्जुनवाड या गावातील श्रीमती अंजली पैलवान या तरुण महिलेवर विधवा होण्याचा दुर्दैवी प्रसंग गुदरला. श्रीमती पैलवान यांनी झिंजाडे यांच्याशी संपर्क साधला, तेव्हा त्यांना मार्गदर्शन करताना झिंजाडे यांनी 'आपण स्वत:चे



ग्रामपंचायत सदस्य
श्रीमती मुक्ताबाई संजय पुजारी

'आपल्या समाजात पतीच्या निधनावेळी अंत्यविधीवेळी पत्नीच्या कपाळावरचे कुंकू पुसणे, गळयातील मंगळसूत्र तोडणे, हातातील बांगड्या फोडणे, पायातील जोडवी काढणे असे घडते. तसेच महिलेला विधवा म्हणून कोणत्याही प्रकारचे धार्मिक-सामाजिक कार्यक्रमात सहभागी होता येत नाही. कायद्याने प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्याचा समान अधिकार आहे. या प्रथेमुळे या अधिकारावर गदा येत आहे. म्हणजेच कायद्याचा भंग होत आहे. तरी आपल्या गावामध्ये व देशामध्ये विधवा महिलांना सन्मानाने जगता आले पाहिजे, याकरता विधवा प्रथा बंद करण्यात येत आहे. यासंदर्भात गावामध्ये जनजागृती करण्यात यावी, त्यास ही सभा मंजुरी देत आहे.'

(ग्रामपंचायत सदस्य श्रीमती मुक्ताबाई संजय पुजारी यांनी हा ठराव मांडला आणि श्रीमती सुजाता केशव गुरव यांनी त्याला अनुमोदन दिले).

उदाहरण घालून द्या' असे सुचवले. त्याचा परिणाम म्हणून, अंजलीबाईंनी पुढाकार घेत हळदी-कुंकवाचा समारंभ आयोजित केला आणि दागदागिने परिधान करून सण साजरे करण्यास प्रारंभ केला. त्यांच्या या धाडसाचे दबक्या आवाजात का होईना, गावात थोडेफार कौतुकही झाले. वरील सर्व परिस्थितीचा परिपाक म्हणजे, हेरवाड ग्रामपंचायतीने (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) 'विधवा प्रथा निर्मूलना'चा ५ मे २०२२ रोजी एकमताने मंजूर केलेला खालील ऐतिहासिक ठराव.

हेरवाड ग्रामपंचायतीने उचललेल्या या पावलाची देशभरातील सर्व भाषिक वर्तमानपत्रांनी दखल घेतल्यामुळे याबाबत सर्वत्र चर्चा सुरू झाली. त्या पाठोपाठ माणगाव ग्रामपंचायतीनेही अशाच प्रकारचा ठराव मंजूर केला. कोल्हापूर जिल्हा परिषदेने या ठरावांचे समर्थन करणारे एक परिपत्रकही जारी केले. शासकीय पातळीवरही त्याची तातडीने दखल घेतली घेतली गेली. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी 'विधवा प्रथा निर्मूलन अभियान' आणि 'स्त्री आधार केंद्र' यांच्या सहभागासह २७ मे २०२२ रोजी पुण्यातील विधानभवनात परिवर्तन बैठकीचे आयोजन केले. त्यामध्ये सर्व संबंधित खात्याचे तसेच पुणे जिल्हा परिषदेचे अधिकारी, विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि विशेषत: विधवा झालेल्या महिला उपस्थित होत्या. या अनिष्ट प्रथेचे पूर्णपणे उच्चाटन करण्याचा निर्धार सदर बैठकीत व्यक्त करण्यात आला आणि या प्रथेविरुद्ध कायदा झाला पाहिजे, ही झिंजाडे यांची भूमिका उचलून धरत, शासनाकडे यासाठी आग्रह धरण्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जाहीर केले.

मागील चाळीस वर्षांपासून, रोजगार हमी योजनेची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून झटणाऱ्या झिंजाडे यांच्या भरीव कार्याला 'विधवा प्रथा निर्मूलन अभियाना'मुळे एक वेगळेच परिमाण लाभले आहे. जमिनीवर घट्ट पाय रोवून असलेल्या झिंजाडे यांनी ठिकठिकाणी राबविलेल्या पाणलोटक्षेत्र विकासाच्या 'पाणीदार' प्रकल्पांमुळे करमाळासारख्या दुष्काळी भागातील शेती पिकू लागली आणि अक्षरश: हजारो जिरायती शेतकरी दुष्काळाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर आले आहेत. उपजीविकेसाठी कायम भटकंती करणाऱ्या अनुसूचित जाती व भटक्या जमातीतील विशेषत: पारधी जमातीच्या कुटुंबांचे पुनर्वसन आणि त्यांच्या मुलामुलींना कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण दिल्यामुळे या पंचक्रोशीतील भटक्या व विमुक्त समाजाच्या आयुष्यात मोठे परिवर्तन घडून आले आहे. 'रोजगार हमी योजने'च्या प्रेरणेतून देशपातळीवर सुरू झालेल्या 'मनरेगा' या रोजगाराभिमुख क्रांतिकारी योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून शासनाने राज्यभरातील हजारो सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी पण झिंजाडे यांच्या नेतृत्वाखालील 'महात्मा फुले समाज विकास मंडळा'कडे सोपवली आहे.

राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभागी व्हावे म्हणून झिंजाडे पायाला भिंगरी लावून सर्वदूर फिरत आहेत, लोकांशी आणि लोकप्रतिनिधींशी संवाद साधत आहेत. त्यांना सर्वत्र उत्साहवर्धक प्रतिसादही लाभत आहे. दुसऱ्या बाजूने याबाबत कायदा व्हावा म्हणून ते शासनालाही साद घालत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून झिंजाडे यांनी कायद्याचे मसुदास्वरूप प्रारूपही तयार केले असून, हा कायदा व्हावा म्हणून ते शासन दरबारी न थकता पिच्छा पुरवत आहेत. राजर्षी छत्रपती श्री. शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षात, श्री. प्रमोद झिंजाडे यांच्या या महत्त्वपूर्ण व अभिनव अभियानास हृदयपूर्वक शुभेच्छा देत असताना, वैधव्याचे भोग वाट्यास आलेल्या आयाबहिणींना 'माणूस' म्हणून जगण्यास बळ देणाऱ्या त्यांच्या या अतुलनीय कार्यास सलाम.!

**प्रशांत कोठडिया**
०२०-२९९८०६१३, ९९२२९१३६१३

कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) २०२२

# नंदिनी जाधव
# जटनिर्मूलनवाली नंदिनीताई

□

दीपक जाधव



*नंदिनी ही खरोखरच ‘सावित्रीची लेक’ शोभते. स्वतःचे ब्युटी पार्लर असणारी नंदिनी ही नरेंद्र दाभोलकरांपासून प्रेरणा घेऊन स्वत:ला ‘अंधश्रद्धा निर्मुलना’च्या कार्यात झोकून देते आणि जट निर्मूलनाच्या कार्याला वाहून घेते, हे थक्क करणारे आहे. तिचे हे काम सोपे नाही. त्यासाठी ती त्या जटवाल्या महिलेच्या घरी अगोदर जाते, त्यांचे प्रबोधन करते. त्यांच्या मनात ‘हे देवाचे आहे आणि ते काढले तर देवाचा कोप होईल’ अशी जी भीती असते, ती भीती ती अगोदर दूर करते आणि मगच जट काढण्यासाठी हाती कात्री घेते. एरवी मोटरसायकलवर फिरणारी आणि बिनधास्त वाटणारी नंदिनी प्रत्यक्षात मात्र मानवी मन समजवून घेऊनच हळूवारपणे हे कार्य करत असते.*

**महाराष्ट्रात जटनिर्मूलन,** देवदासी प्रथेला विरोध आदी समाजसुधारणेचे काम स्वातंत्र्यपूर्व काळापासून केले जात आहे. स्वातंत्र्यानंतर पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनी याबाबत आवाज उठवला तसेच अनेक वेळा आंदोलने केली. जटनिर्मूलनाच्या या कामाला खऱ्या अर्थाने सक्रिय चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले ते २०१२ पासून आणि त्याच्या कर्त्याधर्त्या राहिल्या आहेत त्या नंदिनीताई जाधव. केवळ प्रबोधनापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष हातात कात्री घेऊन जट काढण्याच्या कामाला नंदिनी यांनी सुरुवात केली.



आतापर्यंत महाराष्ट्रातील २५८ महिलांच्या डोक्यातील जट काढून एकप्रकारे त्यांच्या आयुष्यातील गुंता दूर करण्याचे तसेच त्यांना नवे आयुष्य मिळवून देण्याचे काम नंदिनी यांनी केले आहे. डोक्यात जट होणे ही बाब संपूर्णत: धार्मिकतेशी, देव-देवतांशी जोडली गेली आहे. त्यामुळे २१ व्या शतकातही त्या काढायचा साधा विचार करणे हे महाभयंकर पाप समजले जाते. त्या परिस्थितीत डोक्यात जट झालेल्या महिलेचे, तिच्या कुटुंबीयांचे, नातेवाइकांचे तसेच तिच्या गावातील लोकांचे मत परिवर्तन करण्याचे अत्यंत अवघड काम नंदिनी करत आहेत. आज शेकडो महिलांच्या डोक्यातील जट काढल्यानंतरही कोणतेही संकट त्या महिलांच्या कुटुंबावर ओढवले नाही हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे आज डोक्यात जट होणे ही कोणत्याही देवीची देन नसून केसांची निगा नीट न राखल्यामुळे ते होते, हा विचार समाजमान्य होण्यास सुरुवात झाली आहे. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

**त्या घटनेनंतर आईने बनवले अधिक कणखर**

नंदिनी या मूळच्या कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातल्या जयसिंगपूर गावच्या आहेत. त्यांना लहानपणापासून खेळांमध्ये खूप रुची राहिलेली आहे. विशेषत: मुलांचे मानले जाणारे विटी-दांडू, गोट्या, झाडावर चढणे, क्रिकेट आदी खेळ त्या हिरीरीने खेळायच्या. त्यांच्या आईनेही त्यांना जाणीवपूर्वक एका मुलाप्रमाणेच वाढवले. त्यांना भांडी, बाहुलीचे खेळ न देता बॅट-बॉल खेळायला दिले. त्यांचे केस लहानपणापासून मुलांसारखेच लहान ठेवले. याचे कारण त्यांच्या बालपणी घडलेल्या एका घटनेत दडलेले आहे.

नंदिनी दोन वर्षांची असताना त्यांना एका लमाणी बाईने पळवून नेले होते. त्याचा त्यांच्या आईला मोठा धक्का बसला होता. खूप शोधाशोध केल्यानंतर अखेर दोन दिवसांनी त्या सापडल्या. पळवून

  

नेलेल्या महिलेच्या तावडीतून त्यांची सुटका करण्यात आली. मात्र या घटनेचा त्यांच्या आईच्या मनावर खोलवर परिणाम झाला. मुलीच्या सुरक्षिततेच्या भावनेतून, काळजीपोटी आईने त्यांना मुलासारखे वाढवण्याचे ठरवले आणि अधिकाधिक कणखर केले.

**खेळात राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व**

जयसिंगपूरच्या 'बळवंतराव झेले हायस्कूल'मधून नंदिनी यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. त्यानंतर सांगलीच्या कस्तुरबाई वालचंद कॉलेजमधून त्यांनी बी.ए. पूर्ण केले. शाळा व कॉलेजमध्ये असताना त्या अभ्यासापेक्षा विविध खेळांमध्येच जास्त रमल्या. त्यांनी ॲथलेटिक्स (भालाफेक), व्हॉलीबॉल, शूटिंग बॉल, हॅण्डबॉल या खेळात राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व केले आहे.

**कला जोपासत अनेक महिला व मुलींना केले प्रशिक्षित**

लग्नानंतर नवऱ्याच्या नोकरीमुळे त्यांना ठाण्याला जावे लागले. तिथे त्यांनी सतत नवे काहीतरी शिकण्याचा धडाका लावला. मन रमविण्यासाठी छंद म्हणून क्राफ्टचे विविध प्रकार शिकण्यास सुरुवात केली. छंद जोपासताना क्राफ्टचे १५० कलाप्रकार त्यांनी आत्मसात केले. त्यानंतर ब्युटीपार्लरचा सिडेस्कोचा (लंडन) कोर्स केला. हे सगळे शिकून घेतल्यानंतर ते लगेच दुसऱ्या मुलींना शिकवण्याचे कामही त्यांनी सुरू केले. त्यांच्या घरीच मुलींचे प्रशिक्षण वर्ग चालू लागले.

त्यानंतर त्या पुण्याला शिफ्ट झाल्या. ठाण्यातला मुलींना शिकवण्याचा अनुभव त्यांच्या गाठीशी होता. त्यामुळे त्यांनी पुण्यात 'गोल्डन ग्लोरी' नावाचे ब्युटीपार्लर व मुलींसाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. पार्लरचा अभ्यासक्रम कमी खर्चात व कमी वेळात शिकवण्याच्या हेतूने त्या काम करू लागल्या. इतरांच्या तुलनेत खूपच माफक फी मध्ये त्या ब्युटीपार्लरचा कोर्स शिकवत असल्याने त्यांना खूप मोठा





प्रतिसाद मिळू लागला. बाहेरगावाहून अनेक मुली त्यांच्याकडे या कोर्ससाठी येऊ लागल्या.

अर्थात, इथेही त्यांचे वेगळेपण दिसून येते. त्यांनी अशा महिलांना प्रशिक्षण दिले ज्यांना कधीही बाहेर संधी मिळाली नव्हती, ज्या आर्थिकदृष्ट्या कमजोर होत्या. प्रशिक्षणासाठी येणाऱ्या स्त्रिया पहिल्या दिवशी एक अक्षरही बोलू शकत नसत, पण प्रशिक्षणानंतर त्यांच्यात एक आत्मविश्वास निर्माण झालेला दिसे. यातून अनेक विधवा, परित्यक्ता महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे बळ मिळाले.

**अंनिसच्या पूर्णवेळ कार्यकर्त्या बनल्या**

नंदिनी व्यवसायात चांगल्या स्थिरावल्या होत्या. महिना दीड लाख रुपयांचे उत्पन्न त्यांना ब्युटीपार्लर व प्रशिक्षण केंद्रातून मिळत होते. आपण व्यापक पातळीवर सामाजिक कार्यात सहभागी झाले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. त्याच वेळी २०१२ साली वर्तमानपत्रात आलेले अंनिसच्या बैठकीचे एक निवेदन त्यांच्या वाचनात आले. निवेदनात दिलेला पत्ता शोधत त्या अंनिसच्या बैठकीला पोहचल्या. तिथे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्याशी नंदिनी यांची भेट झाली. त्या नियमित दर सोमवारी अंनिसच्या बैठकीला येऊ लागल्या. त्या वेळी जादूटोणाविरोधी कायदा व्हावा यासाठी डॉक्टर नरेंद्र दाभोलकर विविध आंदोलने करत होते. त्यामध्ये नंदिनी यांनी सहभाग घेतला.

आपला व्यवसाय सांभाळून अंनिसच्या कामाला वेळ देण्याचा प्रयत्न त्या करत होत्या. त्याच दरम्यान २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या झाली. या घटनेचे राज्यभर तसेच





देशातही पडसाद उमटले. डॉ. दाभोलकरांचे विचार पुढे नेण्याचा निर्धार अंनिसच्या कार्यकर्त्यांनी केला. नंदिनी यांनी ब्युटीपार्लरला टाळे ठोकले आणि अंनिसच्या कामासाठी पूर्णवेळ वाहून घेण्याचा निर्णय घेतला. आता स्त्रियांचे बाह्य सौंदर्य वाढवण्यापेक्षा आंतरिक व वैचारिक सौंदर्य वाढवूयात असे त्यांनी ठरवले. हा खऱ्या अर्थाने त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला.

डॉक्टरांच्या खुनानंतर त्यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर पकडले जावे यासाठी सातत्याने अंनिसच्या वतीने पाठपुरावा करण्यात आला. त्यामध्ये नंदिनी यांचा मोठा सहभाग राहिला आहे. चमत्कार सादरीकरण, स्त्री व अंधश्रद्धा, जादूटोणा विरोधी कायदा याविषयी त्यांनी महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांत २,००० पेक्षा जास्त व्याख्याने दिली आहेत. जादूटोणा कायद्याच्या प्रसारासाठी त्या महाराष्ट्रभर सलग ४९ दिवस फिरल्या. अनेक बाबाबुवा, बोगस डॉक्टरांचा त्यांनी पर्दाफाश केला आहे.

**जनवाडीतल्या घटनेनंतर झाली जटनिर्मूलनाच्या मोहिमेला सुरुवात**

अंनिसच्या कामामुळे त्यांच्यात उपजत असणाऱ्या कार्यकर्तेपणाला खऱ्या अर्थाने दिशा मिळू लागली होती. त्याचदरम्यान त्यांच्याकडे जटेबाबतची पहिली केस आली. जनवाडी येथील १६ वर्षांच्या मुलीच्या डोक्यात जट आली होती. त्यामुळे कुटुंबीयांनी घाबरून तिची शाळा बंद करून घरी बसवले होते. तिच्या डोक्यात जट आल्याने तिला देवदासी म्हणून सोडण्याचा विचार तिच्या घरचे करत होते.

त्या मुलीच्या मैत्रिणींनी ही माहिती शाळेतील शिक्षकांना सांगितली. त्यांनी ती अंनिसपर्यंत पोहचवली.

नंदिनी अंनिसच्या कार्यकर्त्यांसह त्या मुलीच्या जनवाडी येथील घरी गेल्या. सुरुवातीला तिच्या कुटुंबीयांनी हा आमच्या घरातला मामला आहे असे सांगून त्यांचे काहीही ऐकून घेण्यास नकार दिला. पण त्यांनी धीर सोडला नाही. त्या दिवसभर त्यांच्या घरी बसून राहिल्या. त्यांना जट कशी येते सांगितले. देवीचा कोप होत नाही हे समजावले, बराच काथ्याकूट केला. शेवटी ते तयार झाले आणि ती १६ वर्षांची मुलगी पुढच्या आयुष्यभराच्या भयंकर त्रासापासून वाचली.

त्यानंतर याच्या बातम्या विविध माध्यमांमधून प्रकाशित होऊ लागल्या. त्या वाचून आणखी काही जटंच्या प्रकरणांची माहिती नंदिनींना मिळू लागली. त्यानंतर सुरू झाला तो जटनिर्मूलनाचा प्रवास. एखाद्या महिलेच्या केसात जट असल्याची माहिती मिळाली की, त्यांना भेटणे. तिला, तिच्या कुटुंबीयांना जट काढण्याबाबत सांगणे. त्यांचे मन वळवण्याचा अथक प्रयत्न करणे. त्यासाठी न थकता पाठपुरावा करणे सुरू झाले. काही प्रकरणात तर त्यांनी २-२ वर्षे पाठपुरावा करून त्या कुटुंबांना जट काढण्यासाठी तयार केले.

जट कापणे हे काम जितके कौशल्याचे आणि जिकिरीचे आहे त्याहून जास्त अवघड काम आहे ते जट कापण्यासाठी त्या महिलेची आणि तिच्या कुटुंबीयांची मानसिक तयारी करणे. जट कापली तर त्या महिलेच्या घरातील नवरा, मुले मरतील अशांसारख्या समजुती समाजात घट्ट रुजलेल्या आहेत. त्या दूर करणे हे खरे आव्हान असायचे. त्या महिलेचे, तिच्या कुटुंबीयांचे आणि गावकऱ्यांचे समुपदेशन करताना अनेकदा वादावादीचे, भांडणाचे प्रसंग येत. वातावरण तणावपूर्ण होत. नंदिनीताई विरोध करणाऱ्या नातेवाइकांना समजावून सांगत, ''तुमच्या केसांना एक छोटा दगड दिवसभर बांधून बघा, म्हणजे काय त्रास आहे ते कळेल.'' वर्षानुवर्षं ती जट बाळगल्यामुळे त्या महिलेच्या हालचालींना मर्यादा येतात, त्यामुळे खांदे, मान आणि पाठ प्रचंड दुखते. जटेमुळे त्या महिलेच्या आरोग्याचे गंभीर



प्रश्न कसे निर्माण होतात हे नंदिनी कुटुंबीयांना पटवून देतात.

अनेक वर्षे जट तशीच राहिल्याने केसांच्या जटेमध्ये उवा, लिखा प्रचंड असतात. काही वेळा तर अळ्या, झुरळांची पिल्लेसुद्धा त्यात वास्तव्य करतात. त्यामुळे त्या बाईच्या डोक्यावर लहान-मोठ्या जखमा झालेल्या असतात. जट कापली की या सगळ्याची स्वच्छता करावीच लागते. जखमा छोट्या असतील तर तात्पुरते औषधोपचारही करावे लागतात. मोठ्या जखमांसाठी बळजबरीने डॉक्टरांकडे पाठवावे लागते. हे सगळे केल्यानंतर त्या महिलेच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू आणि तिला जटेच्या त्रासातून मिळालेली मुक्ती ही नंदिनी यांना पार्लरच्या लाखो रुपयांच्या कमाईपेक्षा कितीतरी जास्त समाधान देते आहे.

केवळ आपल्या कामाची चौकट ठरवून तेवढ्यापुरतेच काम करणे हे नंदिनी यांना मान्य नाही. त्यामुळे त्या जिथे आपली गरज वाटेल तिथे सरळ उडी घेतात. पाणी फाउंडेशनच्या वतीने दुष्काळग्रस्त भागात वॉटर कप स्पर्धा घेण्यात येत होती. उदाची वाडी येथे ७-८ मुले एकत्र येऊन चर खोदण्याचे काम करत आहेत. त्यांना गावातून इतर कोणाचाच सपोर्ट मिळत नसल्याचे त्यांनी एका फेसबुक पोस्टमध्ये वाचले. त्यानंतर त्यांनी लगेच आपली बुलेट काढली आणि त्यांच्या घरापासून ३७ कि.मी. अंतरावर असलेली उदाची वाडी गाठली. या गावात त्या मुलांसोबत काम करण्यास सुरुवात केली. त्यानंतर इतर गावकरी देखील श्रमदानात सहभागी झाले. त्यांनी स्वत: ५२ दिवस या गावात जाऊन श्रमदान केले. उदाची वाडीला त्या वर्षीचा 'सत्यमेव जयते वॉटर कप' स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला.

कंजारभाट समाजात नववधूची कौमार्य चाचणी घेण्याची एक चुकीची प्रथा आहे. याविरोधात कंजारभाट समाजातील तरुण-तरुणींचे प्रबोधन करून त्यांना नंदिनी यांनी एकत्र केले. त्यांच्या पाठीशी उभे राहून, वेळप्रसंगी मीडियाची मदत घेऊन त्यांनी ही प्रथा बंद होण्यासाठी प्रयत्न केले.

सामाजिक बहिष्कृत कायदा, जादूटोणा विरोधी कायदा याच्या प्रचार व प्रसाराचे काम करणे, या कायद्याचे उल्लंघन होत असल्यास त्याबाबत पोलीस तक्रार दाखल करून संबंधितांवर कारवाई होण्यासाठी पाठपुरावा करणे आदी कामे त्या करत आहे. अंनिसच्या शहर सचिव म्हणून त्यांना पहिली जबाबदारी मिळाली, त्यानंतर त्यांनी पुणे जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून ५ वर्षे काम पाहिले. सध्या त्या अंनिसच्या राज्य कार्यकारणी सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

जटनिर्मूलनासाठीचा आलेला फोन असो की बुवाबाजी विरोधातील तक्रार, एखाद्या शाळेत विद्यार्थ्यांसमोर चमत्कारांचे सादरीकरण करणे असो की अधिकाऱ्यांना जादूटोणा विरोधी कायद्याचे प्रशिक्षण द्यायचे असो त्यासाठी नंदिनी कायम तयार असतात. संपूर्ण महाराष्ट्र हा जटमुक्त व्हावा, राज्यातील एकाही महिलेला अंधश्रद्धेपोटी त्या भयंकर त्रासाला सामोरे जावे लागू नये यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून यापुढेही काम करत राहण्याचा त्यांचा मानस आहे. येणाऱ्या काळात अनेक नव्या कार्यकर्त्या मुली व महिलांना जटनिर्मूलन व अंनिसच्या कामात त्यांना जोडून घ्यायचे आहे.

**दीपक जाधव**

९९२२२०११९२

ग्रंथ पुरस्कार (वैचारिक/अपारंपरिक) २०२२

# शरद बाविस्कर
# ‘भुरा’ आत्मकथन
# रावेर ते जेएनयू

□

दिलीप चव्हाण



*धुळ्याजवळील रावेर या खेडेगावी असणारा बुजरा मुलगा स्वत:ची परिस्थिती बदलायची या निश्चयाने शिक्षणाची कास धरतो. प्रचंड अभ्यास करतो. स्वयं-अध्ययनाच्या जोरावर तो फ्रेंच भाषा शिकतो आणि तत्वज्ञानाच्या पाच पदव्या या फ्रेंच भाषेतूनच मिळवतो. आज दिल्लीच्या 'जवाहरलाल नेहरू विद्यापीठा'त प्राध्यापक असणाऱ्या शरद बाविस्करांचा हा प्रवास आपल्याला त्यांच्या 'भुरा' या आत्मकथनामध्ये वाचायला मिळतो. या पुस्तकाच्या अल्पावधीत नऊ आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. यावरून तरुणांना हे आत्मकथन किती प्रेरक वाटत असेल, याचा अंदाज आपण करू शकतो.*

**'भुरा' या** आत्मकथनाद्वारे शरदची ओळख उभ्या महाराष्ट्राला झाली आहे. पण ही ओळख त्याला सहज लाभलेली नाही. किंबहुना 'भुरा'चा लेखक म्हणून असलेली ओळखच काय त्याला काहीही सहज मिळालेलं नाही. हजार प्रकारच्या अभावांना पुरून उरलेला माणूस आहे तो. त्याचा संपूर्ण भोवताल प्रतिकूल असताना या पुरून उरण्यात नक्कीच त्याचा पराक्रम आहे. पण त्याच्या जीवनकथेची सांगता जर फक्त गरीब कष्टकरी कुटुंबात जन्माला येऊन कठोर परिश्रम घेऊन यशस्वी प्राध्यापक होण्यात असती तर त्याचं कौतुक वाटलं असतं पण फार गांभीर्याने त्यावर आपण चर्चा करावी असं त्या गोष्टीत काहीही नसतं. कारण अभाव, प्रतिकूल परिस्थिती आणि त्यावर जिद्दीने मात करून पुढे जाणं ही आपल्या विकसनशील आणि सर्वार्थाने मागास समाजात तशी कौतुकाची असली तरी सामान्य बाब आहे. अशी कितीतरी यशस्वी उदाहरणं आपल्या भोवती असतात. अशाप्रकारे यशस्वी झालेल्यांच्या कित्येक जीवनकहाण्या आत्मकथनांच्या रूपाने मराठीत आहेत. त्यांना कमी-अधिक लोकप्रियता आणि राजमान्यताही लाभलेली आहे. आपल्या भारतीय समाजातल्या दारिद्र्याचं, शोषणाचं, जातीयतेचं भीषण स्वरूप या आत्मकथनांमुळे अधोरेखित झालं ही वस्तुस्थिती आहे. अभावग्रस्त समाजातून आलेल्या दलित-ग्रामीण अशी सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या लेखकांच्या या आत्मकथनांचं समाजशास्त्रीय आणि वाङ्मयीन मूल्य आता सर्वमान्य आहे. व्यवस्थेविरुद्धचा आक्रोश या आत्मकथनांमधून व्यक्त झाला आणि त्याची दखल घेणंही व्यवस्थेला भाग पडलं. पण आपली व्यवस्था दखल घेते म्हणजे काय करते? तर त्या त्या जातवर्गातील लेखकाच्या व्यक्तिगत अडचणी दूर करते आणि लेखकाच्या व्यक्तिगत अडचणी दूर झाल्या की आक्रोशित लेखक व्यवस्थेच्या पायरीवर निवांत पडून राहतो, अधूनमधून व्यवस्थेने दिलेल्या पायरीवरूनच समरसतेची गाणी गातो. ज्या समाजघटकांचं दु:ख प्रातिनिधिक स्वरूपात लेखकाने मांडलेलं असतं त्यांच्या दु:खावर उपाय न शोधता फक्त प्रतिनिधीचं दु:ख कसं कमी होईल एवढं बघून व्यवस्था हात झटकते. फार थोडे लेखक व्यवस्थेच्या या जाळ्यात अडकले नाहीत. त्यांनी व्यापक समाजहितासाठी संघर्ष सुरू ठेवला. त्या संघर्षाची ते आजही किंमत मोजत आहेत. त्यातल्या काहींनी व्यवस्थेच्या बाहेर राहून संघर्ष सुरू ठेवलाय तर काहींनी व्यवस्थेच्या आत

असूनही शोषित समाजाशी असलेली आपली नाळ तुटू दिली नाही आणि आपल्या परीने व्यवस्था परिवर्तनाच्या संघर्षात सक्रिय आहेत. सर्वसाधारणपणे वंचित, दुर्बल घटकातून आलेल्या मराठी लेखक आणि लेखिकांचं सहज दिसणारं हे चित्र आहे. शरद हा दुसऱ्या प्रकारचा लेखक आहे. तो दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात फ्रेंच तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक असला आणि त्या अनुषंगाने व्यवस्थेचा भाग असला तरी त्याने संघर्ष सुरू ठेवलाय. या देशातल्या अटळ सांस्कृतिक संघर्षाचं मोल समजलेला आणि यात निर्णायक विजय मिळवण्यासाठी आखाव्या लागणाऱ्या डावपेचांची सखोल समज असलेला तो बुद्धिमान लेखक आहे हे त्याच्या अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या भुरा या आत्मकथनाने सिद्ध केलं आहे. लोकवाङ्मय गृह या प्रतिष्ठित प्रकाशन संस्थेने अत्यंत मौलिक दस्तावेज या ग्रंथाच्या रूपाने मराठी वाचकांना उपलब्ध करून दिला आहे.

शरद बाविस्कर हा आज 'प्रा. डॉ.' वगैरे आणि तेही जेएनयु सारख्या विद्यापीठात असला तरी केवळ तेवढ्यावरून त्याचं मूल्यमापन करण्याची गल्लत कुणी करू नये. कारण अशा प्रकारच्या संस्थात्मक सुरक्षिततेत ज्या सर्वसाधारण बौद्धिकताविरोधी आजारांची लागण होते त्यापासून आजवर त्याने स्वत:ला कटाक्षाने जपलं आहे. आपल्याकडे पदवी मिळेपर्यंत किमान काही परिश्रम घेतले



जातात. मात्र एकदा पदवी मिळाली आणि नोकरी लागली की अनेकांचा एकूण ज्ञानव्यवहाराशी संबंध संपतो. दु:खद बाब म्हणजे ज्ञानक्षेत्रात वावरणाऱ्यांचाही हा संबंध फारच तकलादू स्वरूपाचा असतो. शरदसारखे अभ्यासक हे अपवाद आहेत. त्याचं हे अपवादात्मक असणं ही काही आजची गोष्ट नाही. त्याला मी विद्यार्थिदशेपासून जे पाहिलंय तिथूनच त्याचं हे वेगळं असणं नक्कीच जाणवलं होतं. तो त्या वेळी दर्जेदार शिक्षणासाठी ओळखल्या जाणाऱ्या धुळ्याच्या जयहिंद महाविद्यालयात आला ते धुळ्याजवळच्याच रावेर या छोट्याशा खेड्यातून. कोरडवाहू शेतकऱ्याच्या घरातला हा मुलगा. वडील अकाली गेल्यानंतर आईने मोठ्या कष्टाने मोलमजुरी करून कुटुंब सावरलेलं. त्याचा संघर्ष त्याच्या सबंध व्यक्तिमत्त्वातून जाणवावा असा तो आला. आला तोही खानदेशातल्या सर्वांत नामांकित महाविद्यालयात. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या या महाविद्यालयाचं एकूण वातावरण असं होतं की खेड्यापाड्यातून आलेली मुलं-मुली बुजून जात. त्यांना रुळायला थोडा वेळ लागत असला तरी डॉ. के. बी. पाटील यांच्यासारखे अत्यंत बुद्धिमान, समंजस आणि मायाळू प्राचार्य लाभल्याने अभावग्रस्त घरातली मुलं-मुलीही कालांतराने आत्मविश्वासाने वावरू लागत. या महाविद्यालयाचं त्या काळातील वैशिष्ट्य म्हणजे पैशासाठी कुणाचं शिक्षण थांबणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेतली जाई. संस्थाचालकांची



तत्त्वनिष्ठा, प्राचार्यांची संवेदनशीलता आणि काही प्राध्यापकांत का होईना पण असलेलं जबाबदारीचं भान यामुळे एकूणच सबंध संस्थेतलं वातावरण विद्यार्थ्यांच्या जडणघडणीला पूरक असे. त्यामुळे प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी या नात्यात जबाबदारीची भावना आणि परस्परांविषयी जिव्हाळा आपोआप निर्माण होत असे. अर्थात सर्वच छानछान होतं असं नाही. काही मर्यादा नक्कीच होत्या. पण वाईटाला प्रोत्साहन मिळणार नाही याची काळजी घेतल्याने बराच काळ गुणवत्ता टिकून होती. शरद आला एफ. वाय. बी. ए. ला आमच्या इंग्रजी विभागात. अगदी किरकोळ देहयष्टीचा. अबोल. पण बारकाईने सगळं न्याहाळणारा. शांतपणे आपला भोवताल समजून घेऊ पाहणारा. विभागाच्या कोणत्याही उपक्रमात फारसा रस न दाखवणारा. सगळं काही दुरून बघणारा. आमच्या विभागाच्या स्मार्ट मुलांमध्ये हा एकमेव मुलगा होता जो खूप अबोल होता. कदाचित तो लक्षातही आला नसता पण लेक्चर ऐकताना ज्या पद्धतीने तो ऐकत असे त्यात त्याच्या वयाच्या मानाने भयंकर गांभीर्य होतं. कदाचित कित्येक वर्षांची त्याची ज्ञानाची भूक घेऊन तो आलेला होता. अशी मुलं वर्गात असतात तेव्हा प्राध्यापकांची जबाबदारी नक्कीच वाढते. हळूहळू संवाद वाढत गेला तशी त्याची एकूण समज आणि अफाट कष्टाची तयारी लक्षात येत गेली. कुणीही विद्यार्थी त्या वयात वाचणार नाही अशी गंभीर आणि मौलिक पुस्तकं तो वाचत असे. विशेषत: इंग्रजी भाषा आत्मसात करण्यासाठी कितीही कष्ट घ्यायची त्याची तयारी होती. भाषा प्रयोगशाळेत काही विद्यार्थ्यांना तासभर बसणंसुद्धा मोठं काम वाटत असे, तिथे शरद मात्र तासन्तास बसून इंग्रजी संवादाच्या, नाटकांच्या ऑडिओ कॅसेट्स ऐकत बसत असे. तास नसताना तो कधीही इकडेतिकडे भटकताना मला दिसला नाही. तो एक तर लायब्ररीत किंवा लॅंग्वेज लॅबमध्ये असे. भाषा आणि ज्ञानावरचं त्याचं हे प्रेम आजतागायत अबाधित आहे. पुढे लखनौला इंग्रजी भाषा व साहित्याचं पदव्युत्तर शिक्षण घेऊन तो फ्रेंच भाषा, साहित्य आणि तत्त्वज्ञानाकडे वळला. इटली, फ्रान्स, इंग्लंड येथील नामांकित विद्यापीठांतून त्याने वेगवेगळ्या विषयांतलं पदव्युत्तर शिक्षण घेतलं. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून फ्रेंच तत्त्वज्ञानात पीएच.डी. केली. या दहा-बारा वर्षांत नोकरीनिमित्ताने तो दिल्लीत स्थिरावला असला तरी त्याची ही भटकंती नोकरी किंवा आर्थिक स्थैर्य एवढ्यासाठी नव्हती तर ज्ञानासाठी होती हे त्याच्या आत्मकहाणीतून जो शैक्षणिक प्रवास आपल्यासमोर आहे त्यातून दिसतं.

या संपूर्ण प्रवासात त्याने ज्ञान, ज्ञानाचं स्वरूप, भाषा आणि तिची संरचना, तत्त्वज्ञानासह विविध ज्ञानशाखा आणि त्यांचे आंतरिक संबंध, राजकीय व्यवस्थेचे संस्थात्मक स्वरूप, तिचे तत्त्वज्ञान आणि तिचा नागरिकांशी असलेला व्यवहार मुळापासून समजून घेतले आहेत. व्यक्ती आणि समष्टी संबंधांतला समन्वय आणि तणाव, मानवी नातेसंबंध आणि त्यावर प्रभाव गाजवणाऱ्या बहुस्तरीय सामाजिक संरचना याचं सम्यक आकलन त्याने करून घेतलं आहे. तत्त्वज्ञानाचा आणि विशेषत: राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रशिक्षित अभ्यासक असल्यामुळे जात-धर्म या सर्वसामान्यांसाठी अस्मितेच्या असलेल्या विषयांकडे तो कमालीच्या तटस्थपणे आणि चिकित्सक दृष्टीने पाहू शकतो. तत्त्वज्ञानासोबत तो भाषा आणि साहित्य या विषयांशीही तेवढ्याच आत्मीयतेने जोडलेला असल्यामुळे त्याची एकूण मांडणी ही बोजड न होता सर्वसामान्यांच्याही आकलनाच्या कक्षेत राहते. त्याचं अप्रूप यासाठीही आहे की, आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या पदव्या घेतल्यानंतरही त्याची धडपड आंतरराष्ट्रीय होण्यासाठी

नाही तर वैश्विक होण्यासाठी आहे. जगभरच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यावर त्याला आपली नाळ आपल्या मातीतल्या फुले-शाहू-आंबेडकरांशी नैसर्गिकरीत्या जुळलेली असल्याची जाणीव आहे. तो महात्मा गांधींना राजकीय तत्त्वज्ञानाच्या परिप्रेक्षातून व्यापक संदर्भात समजून घेऊ शकतो. त्याच्या या व्यासंगामुळेच त्याचं मानवी जीवनाचं, ते नियंत्रित करू पाहणाऱ्या व्यवस्थांचं, त्यातील ताणतणावांचं व संघर्षाचं त्याचं आकलन मराठीत नवी भर घालणारं ठरतं. मानवी जीवनाचं इतकं बहुस्तरीय आकलन मराठी लेखनात अपवादाने दिसतं. पारंपरिक आत्मकथनाहून 'भुरा' हे आत्मकथन इथेच वेगळं ठरतं. हे आत्मकथन आपल्या दरिद्री समाजात व्यक्तीच्या वाट्याला अटळपणे येणाऱ्या भोगांची केवळ कहाणी सांगत नाही तर हे भोग व्यक्तीच्या वाट्याला का येतात याची सखोल कारणमीमांसा करतं. आपल्या सामाजिक-राजकीय परिवेशाला धारेवर धरत असताना स्वत:च्या गुणदोषांकडे तटस्थपणे पाहायला शिकवतं. मानवी दु:खाची वैश्विकता उमगल्यामुळे आणि लेखकाला त्याविषयी विलक्षण समज असल्यामुळे आत्मकथनांमध्ये सर्वसाधारणपणे दिसून येणाऱ्या उरबडवेगिरी, आत्मप्रौढी या दोषांपासून हे आत्मकथन मुक्त राहू शकलं. महाराष्ट्रातल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून ते साहित्यातल्या जाणकारांना आत्मकथनाच्या या वेगळेपणाने प्रभावित केलं. पदव्या घेणं आणि नोकऱ्या करणं एवढ्या मर्यादित हेतूने जगणं निर्धारित होणाऱ्या देशात 'भुरा' हे आत्मकथन काही वेगळं, मूलभूत स्वरूपाचं जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगू पाहतं आहे. ते तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानप्राप्ती आणि ज्ञानप्राप्तीतून केवळ व्यक्तीच्या नव्हे तर समष्टीच्या दु:खमुक्तीचा ध्यास. अशा प्रकारचा ध्यास घेतलेली माणसं अधूनमधून होऊन गेलीत आपल्या इतिहासात. पण ते अपवादच आहेत. त्यांची सलग अशी परंपरा नाही निर्माण होऊ शकली. इथल्या व्यवस्थेने माणसं विचारी न होता निमूटपणे झुंडीत रूपांतरित होतील याचा कडेकोट बंदोबस्त केलेला आहे. सध्या अशा विध्वंसक प्रयत्नांना गती देण्यात आली आहे. सबंध तरुणाई वास्तवापासून दूर अशा काल्पनिक जगात वावरेल याची पद्धतशीर तजवीज करण्यात आली आहे. अशा वातावरणात शरदचं आत्मकथन मराठीत आलं आहे. एकूणच चंगळवादात भरकटलेल्या तरुणाईत ज्ञानप्राप्तीचा ध्यास रुजवू शकण्याची क्षमता शरदच्या या आत्मकथनात आहे. मानवी जीवनातला अंधकार नष्ट करण्याची क्षमता व्यक्ती ज्ञानाच्या बळावरच कमवू शकते असा विश्वास देणारी एक वैश्विक कलाकृती मराठीला लाभलेली आहे. महाराष्ट्र फाउंडेशनने योग्य साहित्यकृतीची आणि लेखकाची आवर्जून नोंद घेऊन हा सन्मान केला याचा मराठी भाषा आणि साहित्यावर मनापासून प्रेम करणारा वाचक म्हणून मला मनापासून आनंद आहे.

**दिलीप चव्हाण**
९६३७१०४२९३

कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष) २०२२

# कुमारीबाई जमकातन
# संघर्षाची विविध रूपे...

□

सुनीता बागल



*गडचिरोली भागातली ही एक धडपडी बाई. तिने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे. तिला मास्टर ऑफ सोशल वर्कची डिग्री घ्यायची इच्छा आहे. ती सोशल मिडियावर खूप ॲक्टिव आहे, तिचे अनेक यू ट्यूब व्हिडिओ आहेत. तिने कोरचीला छानपैकी मोठे घर बांधले आहे. आणि त्यात स्वत:साठी एक वेगळी स्वतंत्र खोली बांधली आहे. विविध स्तरांवर अनेक पुरस्काराने तिला सन्मानित केले गेले आहे. कुमारीबाई ही आता फक्त कोरची किंवा गडचिरोली जिल्ह्यापर्यंत मर्यादित राहिलेली नाही. 'मकाम' ('महिला किसान अधिकार मंच') या संस्थेत आणि देश पातळीवर अनेक ठिकाणी महिलांच्या अधिकारांबद्दल ती अधिकारवाणीने मांडणी करत आहे.*

**धर्म, जात,** समाज, शासन, कुटुंब आणि स्त्री म्हणून असलेला स्वत: बरोबर असलेल्या संघर्षाची अनेक वलये सातत्याने भेदत जाणारी आमची मैत्रीण कुमारीबाई जमकातन.

गेल्या २५ वर्षांपासूनची आमची ओळख. १९९६ साली ती गडचिरोली जिल्ह्यातील 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेत महिला स्वयंसहाय गटाचे काम करण्यासाठी कार्यकर्ती म्हणून रुजू झाली. वयाच्या पंधराव्या वर्षी लग्न झालेली ही मुलगी छत्तीसगडच्या छोट्याशा गावातून महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात आली. घरची परिस्थिती बदलण्याची जिद्द धरून, घरी सासूची काळजी घेऊन, घरातली कामे आटोपून छोट्या मुलाला घेऊन संस्थेच्या व गटाच्या मीटिंगला यायची. सर्व काही शांतपणे समजून घ्यायची, थोडी भाषेची अडचण व्हायची, पण तरीही प्रयत्न करून ती सर्व काही साठवून घेत असे. समाजातील स्त्रियांची स्थिती गटाच्या बायांकडून समजत होती.

आज गटांच्या माध्यमातून संघटनेचे, एकजुटीचे महत्त्व समजून घेत असताना संस्थेच्या अंतर्गत महिलांना एकत्र आणणे, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत आर्थिक विकासासाठी बचत गटाची परिसर पातळीवर, आर्थिक आणि सामाजिक संघटन बांधणी करण्यात तिचा मोठा सहभाग आहे. कुरखेडा येथील परिसर संघाचे आर्थिक रेकॉर्ड ठेवण्याचे काम ती अनेक वर्षे नियमितपणे करते. आजही शासनाच्या योजनांच्या प्रवाहात कोरची येथील 'सामूहिक महिला परिसर संघ' चांगल्या पद्धतीने सुरू आहे. कोरची येथे 'महिला परिसर संघा'चे कार्यालय उभे करण्यासाठी तिने प्रयत्न करून जागा मिळविली आणि 'संघा'चे स्वतंत्र कार्यालय उभे राहिले. या जागेत महा-ग्रामसभा संघटनेचेही कार्यालय आहे. माझ्या माहितीप्रमाणे राज्यात 'महिला परिसर संघा'चे स्वतंत्र कार्यालय हे फक्त कोरची येथे आहे.

बचत गटांचे आणि 'परिसर संघा'चे वलय वाढत जाऊन त्यांनी अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. हे संघटन तालुका पातळीपर्यंत मर्यादित न ठेवता त्याचा प्रसार चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांत झाला. महिलांच्या प्रश्नावर एकजुटीने लढण्यासाठी 'क्रांतिज्योती महिला संघटने'ची सुरुवात केली. संघटन टिकविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. याची धुरा कुमारीबाईच्याच खांद्यावर आहे.

या कामातून बायकांबरोबर तिची मैत्री वाढत गेली आणि त्यांच्यावर होणाऱ्या कौटुंबिक हिंसेचे मुद्दे पुढे येऊ लागले. या हिंसाचाराबद्दल बोलण्यास कुठेही जागा नव्हती. जात पंचायतीत महिलांना येण्यास बंदी होती किंबहुना तिथे मुद्दे येतच नव्हते त्यामुळे पंचायतीत एकतर्फी निर्णय होत होते. येथून धर्मानी आणि जातींनी निर्माण केलेल्या परंपरेशी संघर्ष सुरू झाला. कुमारीबाईने प्रश्न विचारण्यास सुरुवात केली, महिलांचे मुद्दे मांडणीसाठी आणि स्त्रियांच्या दृष्टीने न्याय होण्यासाठी त्यांचे प्रतिनिधित्व जात पंचायतीत असणे आवश्यक आहे. यासाठी कुमारीबाई आणि सहकाऱ्यांनी मोठी लढाई जिंकली आणि महिलांना जात पंचायतीत प्रतिनिधित्व मिळाले. कुटुंबाविरुद्ध आणि समाजाविरुद्ध संघर्ष करत असताना खूपदा एकटे पडल्याची किंवा वाळीत टाकल्याची भावना येते, अशा वेळी बचत गटांच्या कामातून मिळविलेल्या कमलाबाई, रूहेलिनबाई, संस्थेतील सहकारी मैत्रिणी साथीला येतात, वैयक्तिक जीवनातील भावनिक प्रसंगांना व्यक्त करण्यासाठी मोकळीक मिळते.

१९९३ च्या घटना दुरुस्तीने महिलांना ग्रामपंचायतीत ३३% आरक्षण मिळाले आणि ग्रामपंचायतीमध्ये महिला प्रतिनिधित्व वाढले. गावाच्या विकासात महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक होते, परंतु ग्रामसभेत महिला जात नव्हत्या किंवा गावाची तशी अपेक्षा पण नव्हती. कुमारी बाई आणि संस्थेने या विषयात पुढाकार घेतला आणि ग्रामसभेत महिलांची संख्या वाढण्यास सुरुवात झाली. यासाठी गावातील पुरुषसत्ताक वृत्तीच्या विरोधात सातत्याने वैचारिक संघर्ष करावा लागतो. गावाच्या विकासासाठी आलेल्या निधीचा वापर करण्यासाठी आणि गावांच्या प्रश्नांसाठी ग्रामसभेचे व्यावहार पारदर्शक असावेत म्हणून ती त्याचा हिशोब ठेवते. महा-ग्रामसभेच्या निर्णय घेणाऱ्या कमिटीमध्ये ५०% महिला सदस्य आणण्यासाठी, चर्चा आणि कृती यांचा पाठपुरावा ती नेहमी करत असते. शासनाच्या जी. आर. प्रमाणे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नात महिलांचा १०% आणि अपंग व्यक्तींचा ५% वाटा मिळविण्याच्या मुद्द्यावरही तिला सातत्याने भांडावे लागते.





गडचिरोली जिल्ह्यातील लोकांचा उदरनिर्वाह हा प्रामुख्याने जंगलावर आधारित आहे. शेतीवर जगण्याचे प्रमाण कमी आहे. जंगलांशी निगडित शासनाचे अनेक कायदे आहेत. मोहन हिराबाई, देवाजी तोफा, सतीश गोगूलवार, शुभदा देशमुख या सर्वांच्या संपर्कातून आणि अभ्यास गटातून आदिवासी स्वशासन, जंगल संरक्षण, पेसा कायदा अशा अनेक जल-जंगल-जमीन संदर्भातील कायद्यांचा तिने अभ्यास केला आहे. जंगलातील गौण वन-उपज जमा करून त्यावर प्रक्रिया करून विक्री करण्याच्या व्यवसायासाठी बचत गटातील महिलांना त्याचे प्रशिक्षण दिले जाते. परंतु जंगलात जाऊन वन-उपज जमा करण्यात अनेक अडथळे येतात, त्यासाठी शासनाशी सतत भांडावे लागते. वन संरक्षण समितीमध्ये ५०% महिलांचे प्रतिनिधित्व आणणे, जंगलांमध्ये महिलांवर होणारे अत्याचार यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी अधिकाऱ्यांशी बोलणे करणे, पाठपुरावा करणे अशी कामे करण्यात ती कायमच गुंतलेली असते.

कौटुंबिक हिंसाचारांच्या विषयावर काम करत असताना सातत्याने जाणवते की महिलांच्या नावे संपत्ती नाही त्यामुळे त्यांना अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागते. शेती, घर, जमीन पट्टा, जंगल, सार्वजनिक मालमत्ता, इतर आर्थिक स्रोत या सर्वांमध्ये स्त्रियांना समान अधिकार मिळाला पाहिजे, त्यामध्ये त्यांचे नांव आले पाहिजे अशा अनेक मुद्द्यांवर ती सातत्याने अनेक वर्षे काम करत असल्याने आता या कामाला थोडेफार यश मिळत आहे. २००५ मध्ये कोरची ग्रामपंचायतमध्ये कागदपत्रात पती बरोबर पत्नीचेही नाव घरमालक म्हणून नोंदविण्यात आले. हे मोठे यश आहे. शेती, जमीन पट्टा, घर, जंगल मालमत्ता या सर्वांमध्ये समान वाटा मिळणे तसेच घराच्या आणि गाव विकासाच्या निर्णयात सहभाग वाढणे ही स्त्रियांच्या आत्मसन्मानाची प्रक्रिया सोपी नाही. कुमारीबाई जिद्दी आहे, हट्टी आहे, ठरविलेले काम पूर्ण करण्याचा तिचा हट्ट असतो, हा स्वभाव तिला आणि महिलांना




रावपाट गंगाराम घाट
वार्षीक उत्सव व अधिकार संमेलन
:: कार्यक्रम ::
दि. ०३ फेब्रुवारी ते ०५ फेब्रुवारी २०२०
रोज सोमवार ते बुधवार
:: स्थळ ::
ग्रामसभा झेंडेपार
आदिवासी गोंडी
सांस्कृतिक नृत्य स्पर्धा
प्रवेश फी २०१ रु.
प्रथम पुरस्कार
द्वितिय पुरस्कार
तृतिय पुरस्कार
चतुर्थ पुरस्कार



आत्मसन्मान मिळवून देतो.

आज तिने दोन्ही मुलांचे लग्न योग्य वयात आणि योग्य पद्धतीने करून दिलेले आहे. संस्थेचे काम करता करता तिने पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले आहे. तिला मास्टर ऑफ सोशल वर्कची डिग्री घ्यायची इच्छा आहे. ती सोशल मीडियावर खूप ॲक्टिव आहे, तिचे अनेक यू ट्यूब व्हिडिओ आहेत. तिने कोरचीला छानपैकी मोठे घर बांधले आहे. आणि त्यात स्वत:साठी एक वेगळी स्वतंत्र खोली बांधली आहे. विविध स्तरांवर अनेक पुरस्काराने तिला सन्मानित केले आहे. कुमारीबाई ही आता फक्त कोरची किंवा गडचिरोली जिल्ह्यापर्यंत मर्यादित राहिलेली नाही. 'मकाम' ('महिला किसान अधिकार मंच') या संस्थेत आणि देश पातळीवर अनेक ठिकाणी महिलांच्या अधिकारांबद्दल ती अधिकारवाणीने मांडणी करत आहे.

कधीकधी सहकाऱ्यांच्या काही गोष्टी, निर्णय पटले नाही तर ती लहान मुलांसारखी रुसून बसते, 'राजीनामा देते', 'काम सोडते' असे म्हणते. मग मी किंवा 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेची संचालक आणि तिची आणि आमची मैत्रीण शुभदा (देशमुख) तिच्याशी बोललो की रुसवा पळून जातो आणि ती परत नव्याने स्वत:ला कामात झोकून देते. अशा आमच्या या मैत्रिणीच्या कामाचा लेखाजोखा एवढ्या कमी शब्दात मांडण्याचा हा तोकडा प्रयत्न केला आहे.

**सुनीता बागल**
७८७५८८६६५०

# संदेश कुलकर्णी माणूस आणि रंगकर्मी

□

मनस्विनी लता रवींद्र



*'पुनश्च हनिमून' अलीकडच्या काळातील महत्त्वाचे नाटक. कोणत्याही संवेदनशील माणसाला आजच्या काळात पडणारे प्रश्न, त्यांचे तेवढ्याच संवेदनशील मनाने केलेले लेखन हे या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणता येईल. मात्र हे नाटक रुढ अर्थाने ज्याला 'समस्याप्रधान' म्हणतात, तसे कुठेही होत नाही. नाटकाला अनेक आयाम आहेत. स्त्री-पुरुष नात्यातील आणि लग्नातील सूक्ष्म तणाव, महानगरातील बाजारू संस्कृतीत होणारी घुसमट, आजची विखंडित समाजव्यवस्था, त्यातून निर्माण होणारे मानसिक ताण, अशा किती तरी गोष्टींना हे नाटक स्पर्श करते. नाटकाच्या घाटाच्या अंगभूत मर्यादा ओलांडून कादंबरीतल्याप्रमाणे अनेक आयाम हे नाटक निर्माण करते.*

**२००१-०२ सुमारास** नाट्यवर्तुळात संदेशचं नाव मोठं होतं. 'समन्वय' संस्थेकडून तो नाटकं दिग्दर्शित करत होता, लिहीत होता. मला अजूनही पहिल्यांदा संदेशला बघितलं तो संदेश आठवतोय. विटकरी कुर्ता, मिशी, उंच सडपातळ बांधा आणि प्रांजळ निखळ हसू. अजूनही संदेश असाच आहे. त्याच्या चेहेऱ्यावरचं मिश्कील हास्य त्याचं व्यक्तिमत्त्वं आहे.

तेव्हा मी नाटकात बी.ए. करत होते. नाटकाचं शिक्षण घेत असल्याने नाटकाकडे बघायची दृष्टी बनत होती. नवीन जे काही बघत होते ते माझ्यापासून लांबचं वाटत होतं. आपल्याला जसं नाटक करायचं आहे ते हे नाही असं वाटायचं. आणि मी 'साठेचं काय करायचं' हे नाटक बघितलं: वाटलं हे आपल्या जवळचं आहे. तुमच्या वैयक्तिक अवकाशाच्या आत शिरणारं. इंटिमेट थिएटरची ती सुरुवात होती. जगभरात लोकं मोठ्या रंगमंचाकडून छोट्या जागेत प्रयोग करू लागले होते, डॉ. राजीव नाईक नाटकाचे मोठे अभ्यासक असल्याने जगभरात कुठल्या प्रकारचे बदल नाटकात होतायत हे त्यांना ठाऊक होतं. पण तरी मराठी लोकांना रुचेल पण काही ठोकताळे मोडले देखील जातील अशी दुहेरी बाजू सांभाळत त्यांनी साठेचं काय करायचं लिहिलं असावं. प्रत्येकाच्या मनात एक साठे असतो, जो आपल्याहून जास्तं सक्सेसफूल असतो, आणि आपलं मन सतत त्याच्याशी स्पर्धा करत असतं, असा कालातीत प्रश्न त्यात आहे, पण त्या साठेला करप्ट दाखवून शेवटी जो पैसा खातो तोच मोठा होतो आणि आपण तसे नाही म्हणून मोठे होत नाही अशी स्वत:ची काढलेली मराठी मध्यमवर्गीय समाजाला मान्य होईल अशी समजूत देखील आहे. सलमा नावाची मराठी प्राध्यापिका आहे, (इथे एक ठोकताळा मोडलाय, मुस्लीम मराठी स्त्री ही देखील मध्यमवर्गीय उच्चशिक्षित असू शकते. नेहमी हिंदू आणि उच्च जातीय नावाआडनावाचीच स्त्री प्राध्यापिका दाखवायला हवी असं नाही हा) पण ती नाटक, चित्रपट, साहित्यात असणाऱ्या (मुख्यत्वे पुरुष लेखकांनी लिहिलेल्या) सनातन स्त्रीसारखीच शांत सालसच राहते. कुठलीही पारंपरिक भूमिका मोडत नाही. 'साठेचं काय करायचं?' हे नाटक दोन्ही होतं. म्हटलं तर पारंपरिकता मोडणारं आणि म्हटलं तर पारंपरिक. एखाद्या वेगळ्या व्यक्तीने ते बसवलं असतं तर

कदाचित ते स्थळ दिवाणखानावालं नाटक होऊ शकलं असतं. पण ते नाटक नवीन वाटण्यामागे संहितेसोबतच त्याच्या मंचनाचं श्रेय आहे. संदेशने ते नाटक एखाद्या शेजारच्या घरात कॅमेरा बसवावा आणि आपण त्या घरात डोकवावं असं बसवलं. जो आकृतिबंध संदेशने या नाटकासाठी निवडला तो कॉन्टेंपरी होता आणि त्यामुळे ते नाटक त्या काळाची अभिव्यक्ती झालं. सलमा एका प्रसंगात बसते आणि रडते आहे. पाच मिनिटं ती रंगमंचावर रडत असते. खरं रडण्याचा अवधी तिला तिथे रंगमंचावर दिग्दर्शक देतो, आणि ते सगळं प्रेक्षकांसाठी खरं होऊन जातं.

ते बघितल्यावर मी तर संदेशवर फिदाच झाले होते पण आमची ओळख नव्हती. त्याचं अजून काम बघायला हवं, त्याला भेटावं वाटायचं. पण एक तर तो सिनियर, माझ्याहून बारा-पंधरा वर्षांनी मोठा, त्यात मी खूपच मितभाषी आणि बुजरी. त्यामुळे कधी त्याची-माझी अशी भेट मी शिकत असतांना झाली नाही. माझं 'सिगारेट्स' नाटक जेव्हा आलं तेव्हा संदेशनं आवर्जून येऊन नाटक आवडल्याचं सांगितलं. आणि मग माझ्या सगळ्याच नाटकांना अमृता आणि संदेश कायम येऊ लागले. हक्काचे प्रेक्षक झाले. ते दोघंही आवर्जून उल्लेख आणि कौतुक करायचे.

मराठी-हिंदी नाटक-सिनेमा क्षेत्रात, दिग्दर्शक, समीक्षक हे अत्यंत ॲग्रेसिव्ह हवेत असा ट्रेंड फार दिवस चालला. संदेश याहून पूर्ण वेगळा. कारण त्याला माहिती आहे की सगळे सारखे नसतात, रागवल्यावर सगळे पेटून उठून काही करतील असं नाही. काही जण निराश होतात, स्वत:ला कमी लेखू लागतात. त्यामुळे संदेश नेहमीच आधी कौतुक करतो. मग न पटणाऱ्या गोष्टी अत्यंत सौम्य भाषेत सांगतो.

माझं पहिलं नाटक आलं त्यानंतर संदेशची आणि माझी थोडी ओळख झाली. त्या तुटपुंज्या ओळखीतही वाटायचं, काहीही झालं तरी संदेश आहे बरं का. संदेश हा जसा माझ्यासाठी एक आधाराचा स्तंभ होता तसा तो अनेकांसाठी होता; त्याच्या बरोबरीच्या लोकांपासून ते त्याच्याहून लहान-मोठ्या सगळ्यांसाठी. पंडित सत्यदेव दुबे वांद्रे पूर्वलाच रहायचे. त्यांना बरं नाही तर संदेश धावून जातोय, राजीव नाईकांच्या घरात पाणी शिरलंय तर संदेश काहीतरी पोहोचवतोय. बांद्र्याला त्या वेळेस नाटक-साहित्य क्षेत्रातली बरीच मंडळी रहायची. अजूनही राहतात. त्यांच्यासाठी संदेश हा कायमच हाक मारल्यावर हजर होईल असा मित्र-स्नेही राहिला आहे.

संदेशची 'रॉयल कॉर्ट थिएटर लंडन'च्या रेसिडेन्सी प्रोग्राम फोर इमर्जिंग प्लेराईट्स' या आंतरराष्ट्रीय वर्कशॉपसाठी निवड झाली होती. अनेक देशांतून ही निवड केली जाते. भारतातून २००३ साली संदेश गेला होता.

तिथून आल्यावर लंडनला ज्या नाटकावर त्यानं काम केलं ते नाटक इथे मंचित झालं. ते म्हणजे 'पहिलं वहिलं'. यात अमृता सुभाष, सोनाली कुलकर्णी, मकरंद देशपांडे आणि निखिल रत्नपारखी काम करत होते. संदेशनेच हे नाटक दिग्दर्शित केलं होतं. ह्या नाटकाबाबत तर संदेशची कमालच म्हणायला हवी. मकरंद देशपांडे स्वत: लेखक-दिग्दर्शक आणि नट तरी त्याला दिग्दर्शित करणं ही एक कसोटीच होती. शिवाय त्यात सोनाली कुलकर्णी ही संदेशची धाकटी बहीण, आणि अमृता ही बायको. आणि निखिल रत्नपारखी हा जवळचा मित्र, इतक्या ओळखीच्या हक्काच्या माणसांसोबत काम करणं सोप्पं नाही. तुमचा श्वास-उच्छ्वासपण जे जाणतात. तिथे वाद होण्याच्या शक्यता वाढतात. आणि

त्यात आपणच लिहिलेलं नाटक आपणच बसवायचं. ते अजूनच अवघड.. लेखक म्हणून आपल्याला एकही ओळ कापायची नसते आणि दिग्दर्शकाला उत्तम एडिटर असावंच लागतं. नको असलेला भाग सटासट उडवावा लागतो. पण ह्या सर्व भूमिका संदेशने बखूबी निभावल्या. (अनेकदा नवरा बायको एकत्र काम करत नाहीत कारण वाद होतात, पण संदेश अमृताचं वेगळंच आहे. अमृता संदेशच्या नाटकात कमाल काम करते आणि संदेशही अमृतासोबत काम करतांना मोहरलेला असतो - हे त्या दोघांचं वेगळेपण)

संदेशने मी त्या वेळेस अगदीच नवीन असताना रॉयल कॉर्ट थिएटरच्या लंडन इथे होणाऱ्या त्याच इंटरनॅशनल वर्कशॉपसाठी ॲप्लाय करायला सांगितलं. मी ते केलं आणि माझीदेखील तिथे २००६ साली भारतातून निवड झाली. मला आत्ता विचार करून वाटतं, असं इतक्या सहज कुणाला असं सांगणं सोप्पं काम नाही. स्पर्धा, असुरक्षितता वाटू शकते, जे आपल्याला मिळालं ते इतरांना मिळू नये असा भावच संदेशच्या मनात नाही. शिवाय आता विचार केल्यावर एकदम जाणवलं, कदाचित संदेशचा माझ्यावर लेखक म्हणून तेव्हापासून अतोनात विश्वास असावा. एका लेखकाला दुसऱ्या लेखकाबद्दल असा विश्वास वाटणं हेदेखील दुर्मीळच.

संदेशचं लेखक-दिग्दर्शक आणि नट म्हणून काम विपुल आहे. एलकुंचवारांचं सोनाटा, वासांसी जीर्णानी, तेंडुलकरांच्या लेखांवरचं नाटक - कोवळी उन्हे, रामप्रहरचे ॲडॉप्टेशन आणि दिग्दर्शन, शांतता कोर्ट चालू आहे, मसाला ह्या चित्रपटाचं दिग्दर्शन. शिवाय अनेक सिनेमा, सिरियल, नाटकातून



'साठेचं काय करायचं?' : अमृता सुभाष, निखिल रत्नपारखी

अभिनय, लेखन-दिग्दर्शन.. सर्व माध्यमांत तो उत्तम काम करतोच पण लेखक म्हणून संदेश स्वत:ला सतत धारेवर धरत असतो, त्याचं स्वत:चं म्हणणं खोडून काढणारी पात्रं तो निर्माण करतो, याच्या विचारांना प्रश्न विचारणारी माणसं तो पात्रं म्हणून उभी करतो. त्याला जे वाटतंय ते कदाचित तात्पुरतं आहे याची त्याला लिहितांना जाणीव असते. बरेच लेखक स्वत:चं वागणं आणि विचार यांचं समर्थन करण्यासाठी लिहितात. पण संदेश मात्र स्वत:ला कधीकधी कटघऱ्यात उभं करून स्वत:ला सोलून काढतो. माझ्या मते हे त्याच्या लिखाणाचं आणि माणूस म्हणूनचं सामर्थ्य आहे. त्यामुळे तो बदलतो.. एकसारखा सतत राहत नाही. लोकांचं ऐकतो, मन लावून ऐकतो. माझ्या आजूबाजूला तरी असं ऐकणारे दुर्मीळच.

संदेश अमृताचं घर आता हक्काचं झालंय. बांद्रे पूर्व. जिथे मोठमोठे बंगले आहेत. साहित्य-सहवाससारखी केवळ साहित्यिकांची कॉलनी आहे. पहिल्यांदा गेले तेव्हा वाटलं असंच कुठेतरी असणार, पण संदेश अमृताचं घर चाळीतलं. मुंबईच्या मानानं फार छोटं नव्हे ते. पण शेजार उच्चभ्रू उच्चवर्णीय नाही. साधी ब्यूकॉलर्ड माणसं शेजारपाजारी. संदेश अजूनही त्याच घरात राहतो. घराच्या खिडकीतून एमआयजी क्लबचं ग्राऊंड दिसतं. एकदा मी त्याला विचारलं, 'तू एखाद्या मोठ्या घरात का नाही शिफ्ट होत?' ते त्यांना सहज शक्यं आहे. पण संदेश म्हणाला होता ते मला अजून



'पुनश्च हनिमून' : अमृता सुभाष, संदेश कुलकर्णी

लक्षात आहे. 'इथे माणसं दिसतात. मला इथे रमायला होतं.' हेच त्याचं रमलेलं मन 'माँटूकले दिवस' या त्याच्या कादंबरीत दिसतं. मला संदेशची 'माँटूकले दिवस' कादंबरी प्रचंड आवडते. परत एकदा त्याची इथे स्वत:ची चिरफाड दिसते. एक लेखक त्याची फिल्म लिहून पूर्ण करू शकत नाहीये आणि शेजारच्या घरातला लहानगा मॉन्टू सतत घरी येतो आणि त्याच्या सोबतीने कादंबरीतला नायक हळूहळू स्वत:चे जटिल प्रश्न सोडवू लागतो. त्यात एक प्रसंग आहे. जिथे माँटू लेखक या पात्राशी खेळतो आहे.. तो म्हणतो, 'मी वाघ होईन' आणि एका क्षणात तो वाघ बनतो. त्याला वाघ बनायला बाकी काहीही लागत नाही. संदेशचं हे जे निरीक्षण आहे ते कमाल आहे. लहान मुलांना कुठलं पात्रं वठवायला काहीच वेळ न लागणं. कुठली आयुधं न लागणं आणि मुळात त्याच्या पुढे जाऊन तुम्हाला जे व्हायचं ते तुम्ही सहज बनू शकता आणि ते माँटूच्या वाघ बनण्याइतकं सोप्पं आहे हा विचार. संदेशची बदलावर निष्ठा आहे. लेखक नेहमी वास्तव आणि कल्पनाविलास आणि त्याचं-तिचं म्हणणं या सगळ्याचं बेमालूम मिश्रण करत असतो/असते. हे संदेशच्या लिखाणतही आहेच पण त्याच्या लिखाणातून डोकावणारा - तो, हा ॲग्रेसिव्ह नाही. त्याचे विचार किंवा बाजू ही आक्रस्ताळी नाही. ती सटल आहे. तो सतत स्वत:ला टटोलून बघतोय असं वाटतं.




राज्य शासनाचा बालवाङ्मयाचा
२०१९चा पुरस्कार

'पुनश्च हनीमून' त्यानं काही वर्षांपूर्वी लिहिलं आणि ते मंचित झालं तेव्हा ते वेगळं नाटक होतं. आत्ताचं नाटक आणि तेव्हाचं यात एक सिच्युएशन सोडता जमीन-अस्मानाचा फरक आहे. तेव्हादेखील मला ते आवडलं होतं. पण आत्ता या वर्षी जेव्हा मी 'पुनश्च हनीमून' बघितलं तेव्हा माझ्या डोळ्यासमोरून संदेशचा वेगळाच प्रवास सरकून गेला. एका मानसिक कंडिशनमधून जाऊन परत कलाकार म्हणून तावून-सुलाखून बाहेर पडायचा प्रवास. संदेश हा नेहमीच त्याच्या डिप्रेशनबद्दल व्होकल राहिला आहे. त्याला डिप्रेशन आल्यावर तो मानसोपचार तज्ज्ञांकडून थेरपी घेत होता. पॅंडॅमिकनंतर डिप्रेशन मानसिक आजार किवा कंडिशन्ड याबद्दल प्रथमच दृकश्राव्य माध्यमात बरीच चर्चा झाली. मात्र त्याच्या सात-आठ वर्षं आधीपासूनच संदेश याबद्दल मोकळेपणानं बोलत आलाय. तो म्हणतो, ''हे ठीक आहे, चिल याकडे घाबरून बघू नका. समजून घ्या.''

संदेशने त्याकाळात स्वत:वर खूप काम केलं. सायकॉलॉजीवरची पुस्तकं वाचली. जो भेटेल त्याला तो त्याने नवीन वाचलेलं, स्वत:वर केलेले प्रयोग सांगत असे. त्याच काळात आम्ही एकत्र काम करत होतो त्यामुळे आम्ही जवळपास रोज भेटायचो आणि तो एकएक गोष्ट उलगडून सांगायचा. आपल्या आतले आपले आवाज- इनर व्हॉईसेज काय असतात आपण आपले पॅटर्न बघितले पाहिजेत. मला तो एकदा म्हणाला, ''वा मस्त दिसते आहेस.'' तर मी कारणं द्यायला लागले - ''ते ना हे माझ्या



'पुनश्च हनिमून' : संदेश कुलकर्णी

बहिणीचं टॉप आहे म्हणून असेल'' वगैरे. त्यावर संदेश हसून म्हणाला की ''थँक्यू इतकंच म्हण, कॉम्प्लिमेंट दिली आहे तुला. काही चूक नाही सांगितलेली.'' अशा खूप छोट्या साध्या गोष्टींनी संदेशच्या सहवासाने मला माझ्यात डोकवायला मदत झाली. स्वत:कडे थोडं कमी क्रिटिकली बघायला मी संदेशमुळे सुरुवात केली.

संदेशचा मुळात हसरा स्वभाव आणि स्वत:ला खूप सिरियसली न घेणं ह्यामुळे तो स्वत:च्या डिप्रेशनकडे पण हसून बघू शकतो. डिप्रेशनमध्ये असताना बाकी सगळं तो नेटाने करत होता, चालायला जात होता पण लिखाण करताना अडकला होता आणि त्या अडकलेल्या-अडलेल्या संदेशचं बाळंतपण झालं ते या नाटकानं. 'पुनश्च हनीमून' त्यानं नव्याने लिहिलं आणि आजूबाजूच्या वास्तवाबद्दलचे प्रश्न, प्रौढ झालो तरी कुरवाळत राहिलोय ते लहानपणीचे गंड आणि गुंते, त्यामुळे पार्टनरवर होणारे आघात सगळं सगळं या नाटकात आलं. हे नाटक म्हणजे त्याच्या आयुष्यात घडलेलं सत्य नाही. पण त्यातल्या पात्रांचे प्रश्न त्याचे आहेत. त्याच्या नाटकात राजकीय भूमिका आली. हे नाटक बदलाचं नाटक आहे असं मला वाटतं. बदलणाऱ्या नातेसंबंधांचं आहेच पण आजूबाजूला वेगाने सगळं बदलताना स्वत:तल्या क्रौर्याला, स्वत:तल्या आणि आजूबाजूच्या हिंसेला संदेश लेखक म्हणून म्हणतो - ''ओके, तू आहेस मग? मी मान्य करतो. मी ही हिंसा, हा उद्रेक, ही असहायता, अपरिपक्वता सगळंच नाकारत होतो, तोपर्यंत वेगवेगळ्या रूपानं माझ्यातून फुटून बाहेर येत होता

तुम्ही. पण आता मी स्वीकारतोय तुम्हाला. काय कराल?'' तो स्वत:ला आणि जगाला सांगतो की ॲक्सेप्ट इट. मग कदाचित बदल होऊ शकेल. म्हणून हे नाटक मला महत्त्वाचं वाटतं. आणि ते लिहिणारा संदेश कुलकर्णी लेखक म्हणून रिलेटेबल वाटतो.

संदेश आणि अमृता दोघेही या काळात माणुसकीवर विश्वास ठेवून जगतात, भाबडे वाटावे इतके अजूनही प्रांजळ राहिले आहेत. त्यांच्याकडून मी खूप लाड करून घेते. सतीश मनवर (माझा नवरा) आणि माझ्यासाठी त्या दोघांचं आमच्या आयुष्यात असणं आम्हाला आश्वस्त करतं.

संदेश आणि मी एकदा बोलत होतो, संदेश म्हणाला 'आमच्या घरात धार्मिक वातावरण होतं त्यामुळे माझ्या इंजिनीअरिंगपर्यंत मी ते सगळं मानायचो. आणि मग जेव्हा नाटकात आलो तेव्हा अचानक मला कळलं की देव नाहीये. आयुष्याची वीस-बावीस वर्षं तुम्ही ज्या गोष्टीवर विश्वास ठेवला असतो ती नाहीये हे कळणं भयंकर धक्का देणारं असतं. मला वाटलं मग कुणावर विसंबून रहायचं? म्हणजे आता सगळी जबाबदारी आपलीच.. भीती वाटली ना मला.'' भीती वाटली हे स्वीकारायला किती मोठी जिगर लागते. आणि इतक्या वर्षांची विश्वास प्रणाली मोडून नवीन विचार आत्मसात करायलादेखील. ही आत्मचिकित्सा आणि विच्छेदन करायला धमक लागते. या हिमतीमुळेचं कदाचित तो एक सर्जनशील संवेदनशील कलाकार आहे. संदेशच्या पुढच्या लिखाणाच्या प्रतीक्षेत सगळेच आहेत. फक्त त्यानं आता अजून जास्त लिहावं असं मला मनापासून वाटतं.

**मनस्विनी लता रवींद्र**
९८९२८३०५८८

ग्रंथ पुरस्कार (ललित) २०२२

# अनिल साबळे
# ‘पिवळा पिवळा पाचोळा’
# मुलाच्या नजरेतून आदिवासी विश्व

□

रणधीर शिंदे



*पौंगडावस्थेतील मुलाच्या नजरेतून लिहिलेले साहित्य मराठी भाषेला नवीन नाही. प्रकाश संतांच्या 'लंपन'ची आवडीने पारायणे करणारी वाचक मंडळी आहेत. अनिल साबळे या आदिवासी तरुणाने अशाच बालपणीच्या नजरेतून लंपनच्या विश्वापेक्षा अगदी वेगळंच विश्व आपल्यासमोर आणलेले आहे. जंगलात राहणारी, शिकार करून खाणारी, मासेमारी करणारी अशी कष्टाळू आदिवासी माणसे आणि त्यांचे जग मराठी साहित्यात तरी पहिल्यांदाच इतक्या जिवंतपणे अनिल साबळे यांनी 'पिवळा पिवळा पाचोळा' या कथासंग्रहाच्या द्वारे आपल्यासमोर आणलेले आहे.*

**अनिल साबळे** यांचा 'पिवळा पिवळा पाचोळा' हा कथासंग्रह अतिशय देखण्या स्वरूपात पपायरस प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. अनिल साबळे यांची कथा समकालीन मराठी कथापरंपरेतील महत्त्वाची कथा आहे. जुन्नर तालुक्यातील मुथाळणे या डोंगरी गावातील आश्रमशाळेत अनिल स्वयंपाकी म्हणून काम करतो. कवी, कथाकार, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ता अशी अनिलची ओळख आहे. 'टाहोरा' हा त्याच्या पहिल्याच कवितासंग्रहात जंगलझाडीतल्या माणसांच्या दु:खानुभवाची कविता समाविष्ट आहे. अनिलची वेगळी अशी ओळख समाजमाध्यमावरील त्याच्या अभिनव अशा छायाचित्रांमुळे निर्माण झाली आहे. डोंगर, रानावनांची व तेथील माणसांची अनोख्या शैलीतील छायाचित्रे तो फेसबुक भिंतीवर डकवत असतो. दूरदूर दिसणाऱ्या डोंगररांगा, धरणे, धरणांचे काठ, जनावरे, गायी-म्हशी, मेंढरे, माळरान, कुत्री-मांजरं, शाळकरी मुले, मजूर, कष्टकरी स्त्रिया, चांदण्यांनी लखडलेले आभाळ, भिरभिरणारी रानपाखरे अशा त्याच्या दृश्यभावचित्रांनी लोकांना भुरळ घातली आहे. अभावग्रस्त माणसांच्या व्याकूळ करुणाभावाची ही गावछायाचित्रे वेधक आहेत.

अनिल साबळे यांच्या कथा लोकविलक्षण कथा आहेत. अनिलच्या कथेतील प्रथमपुरुषी कथनसंमोहनाने वाचक त्याच्या कथासृष्टीकडे अलगद खेचला जातो. त्या कथेतील सहजसरळ गोष्टीरूपात अनोखे जग आहे. प्राकृतिक वाटाव्या अशा या कथासृष्टीत वाचक अलगद विसावतो. 'जगतोय गोष्ट सांगण्यासाठी आणि गोष्टी सांगण्याशिवाय आपल्याकडे दुसरं असतं तरी काय?' अशी त्याची भावना आहे. अनिलच्या कथा किशोरवयीन मुलाच्या भूतकाळातील विविध भावावस्थेचे चित्रण करणाऱ्या कथा आहेत. पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेणाऱ्या मुलाच्या भावविश्वाच्या या कथा आहेत. आधुनिकतेचा आणि नव्या काळगतीचा जिथे फार संपर्क झाला नाही, अशा प्रदेशातील मानवी जगाची ही कथाचित्रे आहेत. निवेदकाच्या मनातील रानशिवारातील मनमुराद भटकंतीचे, हिंडण्या-फिरण्याचे व सृष्टी-निसर्गाविषयी आणि त्याच्याशी निगडित मानवी जगाचे चित्र 'पिवळा पिवळा पाचोळा'मध्ये आहे. साबळे यांची कथा रूढ ग्रामीण कथा नाही. ती अनागर जीवनाची कथा आहे. कुटुंब, समाज, गावातील

राजकारण वा ताणतणावाचे चित्रण करणारी ही कथा नाही. तिचा मुख्य चित्रणप्रदेश हा रानशिवार आहे. किशोरवयीन मुलांच्या भावविश्वाशी निगडित रानशिवारातल्या गुंतले-जखडलेपणाबरोबर बेहोश क्षणांचे चित्रण या कथांमध्ये आहे.

ही कथा अनुभवकथनाची कथा आहे. तिचा कथाआवाका सीमित स्वरूपाचा आहे. मानवी जगण्यातील गुंतागुंतीच्या प्रश्नांची मांडणी करणारी ही कथा नव्हे. मात्र भूतकाळातील अनुभवकथनाच्या विशिष्ट सादरीकरणातून कथानुभावास त्यांनी नव्या मिती प्राप्त करून दिल्या आहेत. किशोरवयीन मुलाच्या रानाशी निगडित अनुभवांना या कथेत केंद्रीय स्थान आहे. भूतकालीन अनुभवांची वाफ होऊ न देता हे कथानुभव सर्जकतेच्या पातळीवर नेले आहेत. कथानायकाला पशूपक्षी-प्राणी यांच्याविषयीचा लळा आहे. तसाच सवंगड्यांबरोबर सरडे मारणे, मासे पकडण्याचा छंद आहे. 'घोरपड' कथेत काका-पुतण्याचे घोरपड पकडण्याचे चित्रण आहे. तर 'हिरव्यागार चिकाळ शेरावर' कथेत सरडे मारण्याचे अनुभवकथन आहे. 'गळ' कथेत मासेमारीच्या छंदाचे विस्तृत कथन आहे. 'मोहोळ' या ३४ पृष्ठांच्या कथेत केवळ आणि केवळ झाडावरील, कुपाट्यातील, मळ्यातील मधमाश्यांचे मोहोळ झाडण्याचे चित्रण आहे. डोंगरदऱ्यात वसलेल्या गावातील रानावनातील मुलाचे भावविश्व या कथाचित्रात केंद्रीय स्वरूपात आहे.

'हिरव्या चुड्याआड बुडालेलं', 'मछ्या' आणि 'मोहोळ' या संग्रहातील लोकविलक्षण कथा.



अनुभवकथन व वर्णनपरतेचा प्रदेश ओलांडून त्या जीवनभानाविषयीच्या कथा झाल्या आहेत. शाळूसोबती जिवलगाच्या मृत्यूची 'मछ्या' ही करुणाकथा. रानावनात मुक्तपणे हुंदडणाऱ्या भिलहाटीचा मछ्या सायकलवरून शाळेत जाताना ट्रकच्या अपघातात मरण पावतो. 'विहिरीत पोहून पोहून लालभडक झालेले मछ्याचे डोळे शवविच्छेदन करताना काढून घेतले होते. माझ्या गळ्यात गळा घालून रानभर हिंडणारे मछ्याचे हात आता पांढऱ्या पट्टीत गुंडळलेले होते.' या व्याकूळ करुणा विरोधभावाचे चित्र कथेत आहे. 'एक एक घरटं' कथेत नायकाच्या जंगलातील आजी-आजोबाच्या झोपडीत जाण्याच्या आणि तिथे राहण्याच्या रानधुंद वातावरणाचे चित्र आहे. एके दिवशी चोर येऊन आजीच्या गळ्याला कोयता लावून व घरातील सर्व लुटून नेतात आणि रानात बांधलेलं आमचं एकटं घर हळूहळू संपून गेल्याची भावना कथेत आहे. 'हिरव्या चुड्याआड बुडालेलं' ही कथा रानातील मोठ्याईची कथा आहे. आजोबा, वडील, मावशींच्या जीवनाचे त्यास संदर्भ आहेत. स्त्रीचे दु:ख, पुरुषी अन्याय व अपत्यहीनतेच्या दु:खाचे चित्रण कथेत आहे. बाईचे पिचलेपणाचे कारुण्य आणि वात्सल्यभावाचे गडद असे चित्र कथेत आहे. हातावर मोठ्या बाबाचे नाव असताना मोठ्याई रानात म्हाताऱ्या आजोबाबरोबर का राहते आहे असा त्याला प्रश्न पडलेला आहे. या प्रश्नाचे उत्तर त्याला कथाअखेरीस मिळते. मोठ्याईला मूल नव्हते. ती उपासतापास करते. तिच्यावर अघोरी उपचार होतात. एका अनाम म्हाताऱ्या बाबाबरोबर तिचे लग्न लावून दिले जाते. तिची मारहाण, अत्याचार, अपत्यपूर्तीचा अभाव, म्हाताऱ्याबरोबर लग्न, करुणा, वात्सल्यभावाच्या जाणिवांचे कथेत चित्र आहे. साबळे यांच्या कथेत जो समाज येतो तो बाल-किशोरवयीन मुलाच्या संदर्भातल्या आई-वडील-मावशी-शिक्षकांच्या संदर्भातला. मात्र त्याचा समाजफलक आहे तो रानवन.

कथानायकाला रानशिवारातल्या प्राकृतिक जीवनाची अपरंपार ओढ आहे. समाजचौकटी, शाळा, संस्थात्मक जीवनाऐवजी रानात रमतो. त्याच्या असतेपणाचा घनदाट प्रत्यय रानावनात येतो. त्यामुळे त्याला रानातील स्वातंत्र्याची अनिवार ओढ आहे. यात त्याच्या अनिर्बंध स्वातंत्र्याचा मनमुराद आनंद आहे. त्यामुळे रानशिवाराचे मन:पूर्वक चित्रण या कथाचित्रणात आहे. अनिल साबळे यांच्या कथेचा लक्षणीय विशेष म्हणजे रानशिवारातील सजीव सृष्टीचे केलेले अनोखे चित्रण. किंबहुना रानशिवाराचे इतक्या खच्चून माहितीचे कथेतील सादरीकरण अभिनव असे आहे. मराठी ग्रामीण कथेत बव्हंशी वेळा समाज आणि परिसराचे केवळ पृष्ठस्तरीय चित्रण येते. साबळे यांच्या कथेतील पशूपक्षी, प्राणी, जीवजंतू व शिवार भूगोलाचे चित्रण हे अनोखे आणि सखोल आहे. किंबहुना लेखकाच्या संवेदनशीलतेचा तो प्रमुख भाग आहे. त्यामुळे शिवाराच्या सळसळण्याची सजीव शब्दचित्रे साबळे यांच्या कथेत आहेत. मराठी कथासाहित्यात अशी चित्रणे अपवादभूत ठरतात. सभोवतालच्या निसर्गाचे व मानवेतर जगाचे त्यांनी केलेले शब्दरंगकाम सर्जनशील आणि कल्पशील आहे. फिरंगी बाभळी, तरवडाच्या झुडपावरील निळे भिंगं, भुरक्या रंगाचे नाकतोडे, थव्यांनी मस्त हिंडणारे मासे, गाभुळलेल्या चिंचा, तुरीतली वाळके, शेळ्या-मेंढ्या, कोकरे, जनावरे, तांबडे होले, मोहळे, मधमाश्या, माळावरल्या पांढऱ्या दुधाण्या, भुरकी ल्हावरे, खारी, बहिरी ससाणे आणि पाखरांनी गजबजलेली चलसृष्टी या कथेत आहे. पिवळीधम्मक सूर्यफूले, मोहरी फुले, गव्हाच्या ओंबी, बाभळीचे रान, सराट्यांचे वेल, निवडुंगाची लालबुंद बेटे, आमराई, मळे, कुपाटी, खळगे अशा रानभूगोलाची सचित्र वर्णने कथेत आहेत.

साबळे यांच्या कथाचित्रणात हिंस्रता आणि निरागसतेतील द्वंदभावाचे चित्रण आहे. गोरगरीब ठाकर मधमाशाचे पोळे विकून पोट भरतात. त्यांच्यासाठी मोहळे ठेवली पाहिजेत. त्यामुळे प्रकाशाला फसवल्याचा डंख माझ्या मनात मधमाशीच्या काट्यासारखा सलत होता. मुले जिवंत सरडा दोरीला बांधून टांगतात, त्या वेळचे 'त्याचे दोन चिमुकले डोळे जणू रडून रडून लालभडक झाले होते,' असे वर्णन येते. घोरपड पकडल्यानंतर तिला सोलण्यासाठी कोणी मिळत नाही तेव्हा ती विकतात. नायकाला त्यातून दीड रुपायांची तीन नाणी मिळतात. ती तळहाताच्या ओंजळीत असतात त्या वेळी बाजूलाच घोरपड शेपटीसारखी तडफडण्याचे चित्र येते. वावरीच्या कुपाटीत सरडा फेकून मारून टाकला जातो. मछ्या म्हणाला, 'गलोलीचा खडा घासून गेला असन. उलिशा जीवाला काय लागतंय मरायला. मछ्याचे हे शब्द माझ्या काळजात गलोलीच्या खड्यासारखे घुसून बसले.' त्यामुळे निरागस वात्सल्य मायाभावाचे चित्र साबळे यांच्या कथेत आहे. समाजचौकटींचा काच निर्माण झालेल्या मुलाचे हे निरागस भावविश्व आहे. त्यामुळे मोठ्याईच्या दुःखाने किंवा मित्राच्या मृत्यूने त्याच्या हृदयावर दुःखाचे डाग पडतात. 'तिच्या मायअंगातून गळून पडलेला जार आजीने उकिंड्यात पुरून टाकला जातो,' असे बकरीबद्दल चित्रण येते. 'तेंव्हा उन्हात भाजलेल्या पाखरासारखा माझा चेहरा पाहून वडील नायकाला जवळ घेतात. 'नंतर मी डोळे उघडे ठेवून पाण्यातल्या माशासारखा सावध झोपी गेलो.' किंवा बनाबाई रानात हिंडताना सापडलेली खाण्याची वस्तू लुगड्याच्या पदरात घालून खायला द्यायची. कथानायकाला मोठ्याई म्हणते, 'माझ्या कुशीत त्या दिवशी तू रात्रभर झोपला होतास, म्हणून आज देखील तुझ्या कुशीतून तुझाच वास येतोय. एका रात्रीसाठी तरी मला आई झाल्यासारखं वाटलं होतं,' अशी भावनाचित्रे कथेत आहेत.




रानविद्या म्हणूनही या कथाचित्रणाला विशेष महत्त्व आहे. खेड्यातील उपजत व परिसर पाहणीने वाहत आलेले ज्ञानकथने या कथांत आहे. ते पुस्तकी जगातून आलेले नाही, तर ते परिसर न्याहळणीतून आलेले आहे. 'घोरपडीच्या काळजाजवळचं निळं पित्त फुटलं म्हणजे सगळं मटण कडू होणं. सरडे, मासे, व्हले पकडण्याचे अद्‌भुत ज्ञान या मुलांजवळ आहे. मासे पकडण्याचे गळ कसे तयार करतात. त्यासाठी कोणतं पीठ लावावं यासारखे तपशील कथेत आहेत. डोळ्यात चीक गेल्यानंतर शेळीच्या निरशा दुधाची धार डोळ्यात सोडणं.' किंवा पाणी न पाजलेली शेळी गाभडते, चांभारी मासा, पशुपक्ष्यांच्या वावराच्या तपशिलाची ज्ञानसंपन्न रानानुभवांची ही कथा आहे. घोरपड, सरडे, मासे, पाखरे पकडण्याचे त्यांच्या उपस्थितीचे असंख्य बारकावे या कथनात आहेत. रानशिवारातील संवेदनांचा घनदाट प्राचुर्यप्रत्यय

अनिल साबळे यांच्या कथासृष्टीत आहे. 'बरणीतील जाड मिठाचे चार-दोन खडे उगीच करंडीत बसणे,' 'माठातील हळदीने माखलेल्या कैरीच्या ओल्या खापा', 'मीठ मिरचीत भाजलेले गरम मासे काटे काढत फुंकत फुंकत खाण्या'चे चित्र यासारखी रुचिरसंवेदनेची चित्रे कथेत ठिकठिकाणी आहेत.

साबळे यांची कथेची भाषा प्रथमपुरुषी गोष्टीरूपाची कथा आहे. स्वत:चे अनुभवकथन सांगत असल्यामुळे त्यास संवादी विश्वासार्ह गोष्टीवेल्हाळ 'गोष्टी'चे स्वरूप प्राप्त झाले आहे. 'बिरोबाच्या पांढऱ्या मंदिरापुढं बस थांबली आणि मी बसमधून खाली उतरलो,' 'मी मोहोळं शोधायला आमच्या घरातून बाहेर पडलो,' 'भल्या मोठ्या वडाच्या झाडाखाली मी उभा होतो', 'त्या दिवशी आम्ही एक लालतोंड्या सरडा आमच्या घरामागच्या शेराच्या कुपाटीवर घेरला होता' या प्रकारच्या प्रथमपुरुषी निवेदनाने कथारूप सजलेले आहे. 'मी', 'आम्ही', 'आमच्या' या सर्वनामांची ही गद्यभाषा आहे. त्यात सहजी वेल्हाळ गद्यलय आहे. भूतकाळातील अगणित स्मृतींचा तपशील साठ्याचा फार कल्पक उपयोग कथनात केला आहे. या कथेची भाषा ही ग्रामीण परिसराची वैशिष्ट्यपूर्ण भाषा आहे. एवढेच तिचे वर्णन अपुरे आहे. त्यांच्या कथाशयाच्या दृष्टीवर प्रादेशिक व्यक्तिभाषेचा प्रभाव आहे. कथेत रानशिवाराची उपमानसृष्टी आहे. 'खपाट्या पोटाची शेळी हिरवा शेवरा गपागपा खात होती', 'पाठीवर ऊन घेऊन लाल तोंडाचे माळसरडे बाभळीच्या खोडांवर मुंगळ्यांची रांग पाहत बसलेले होते' अशी कथासचित्रता सर्वत्र आहे. रंग-गंध-नाद-संवेदनाचा दाट प्राचुर्य प्रत्यय देणारी शब्दकळा कथेत आहे. वातावरण,



स्थळ, भूगोल व भावस्थितीचा भरगच्च प्रत्यय देणारी ही भाषा आहे. प्रथमपुरुषी कथनाचा विलोभनीय आविष्कार त्यात आहे. प्रत्यक्षता, वर्तमानाला भूतकाळातील अनुभवकथनाच्या समांतरसोबतीने कथेचा आवाका वाढविला आहे. कथेची भाषा ही सहजसंवादी गावरान व्यक्तीबोली आहे. बोली शब्दांच्या ठायी असणाऱ्या दृश्य, ध्वनी, नादसंवेदना व अर्थवत्तेचा घनदाट प्रत्यय घडवून दिला आहे. नायकाशी निगडित घटना-प्रसंगाची, भावना संवेदनांची भरगच्च तपशिलांची ही कथा आहे. रानाशी निगडित भरमसाट तपशील कथन या कथाभाषेत आहेत. ‘गोड्या बाभळी’, ‘ऊदईचे वारूळ’, ‘बाजऱ्या सोंगून’, ‘पांढऱ्या दुधाण्या’, ‘ईखडांची टाहाळ’, ‘तिरमीला तोंड लावली’, ‘चारणी’ असे प्रादेशिक अपरिचित शब्द या कथांत भेटतात.

एकंदरीत अनिल साबळे यांची ‘पिवळा पिवळा पाचोळा’ या संग्रहातील कथा वैशिष्ट्यपूर्ण अशी आहे. समकालीन मराठी कथापरंपरेतील तिची ठेवण, संवेदनस्वभाव आणि सामर्थ्य हे वेगळ्या प्रकारचे आहे. अनागर जीवन हा तिचा चित्रणफलक आहे. किशोरवयीन मुलांच्या अनुभवकथनाची ही कथा आहे. तिचे स्वरूप आत्मकथनात्मक आहे. रानशिवारातील अपूर्व असे भावविश्व या कथेने मराठीत आणले आहे. भूतकाळातील स्मृतिसंचिताचा कथेत सर्जनशील वापर केला आहे. किशोरवयीन मुलाच्या सृष्टी आणि समाजाविषयीच्या जिज्ञासा कुतूहलाची ही कथा आहे. हिंस्रता आणि कोवळिकतेची ही कथा आहे. माणूस आणि पशुपक्ष्यांविषयीच्या सद्भावाची दृष्टी त्यात आहे. त्यास मानवी सद्भावाचा संदर्भ आणि करुणादृष्टी आहे. ‘नंतर मी डोळे उघडे ठेवून पाण्यातल्या माशासारखा सावध झोपी गेलो.’ अशा निरागस भावाची कथाचित्रे आहेत. बालस्वप्ने आहेत. मराठी कथासाहित्यातील किशोरवयीन मुलांच्या चित्रणावर नागर आणि रोमँटिक दृष्टीचा मोठा प्रभाव आहे. चौकटबद्ध, मध्यमवर्गीय दृष्टीतील कुतूहल उघड करणारी पौगंडावस्थेतील कथाचित्रे विपुल आहेत. त्या पार्श्वभूमीवर अनिल साबळे यांच्या कथेस अनागर असा विशाल भूमी अवकाशाचा चित्रणफलक लाभल्यामुळे किशोरवयीन मुलांच्या भावविश्वाला आणि रानशिवाराला नवी परिमाणे लाभतात. त्यामुळे अनिल साबळे यांची समकालीन कथा महत्त्वाची ठरते आणि अजूनही अशा प्रकारचे अपरिचित अनुभवविश्वाचा कथनऐवज मराठी वाचनसंस्कृतीच्या कक्षेबाहेर असल्याची प्रचिती येते.

**रणधीर शिंदे**
९८९०९१३०३१

# निवड समिती

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
  (भारतातील)
  श्रीधर नांदेडकर (अध्यक्ष)
  अविनाश सप्रे
  जयश्री हरि जोशी
  सिसिलिया कार्व्हालो
  मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार समिती**
  (भारतातील)
  प्रवीण भोळे (अध्यक्ष)
  दत्ता पाटील
  मुकुंद टाकसाळे (समन्वयक)

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
  (अमेरिकेतील)
  शोभा चित्रे
  सुनील देशमुख
  रजनी शेंदुरे
  विद्युल्लेखा अकलूजकर

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
  (भारतातील)
  देवेंद्र गावंडे
  ज्योती म्हापसेकर
  देविदास वडगावकर
  नीशा शिवूरकर
  विजया चौहान (साधना ट्रस्ट)
  विनोद शिरसाठ (साधना ट्रस्ट)
  रमेश अवस्थी (मासूम)
  मनीषा गुप्ते (मासूम)

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
  (अमेरिकेतील)
  सुनील देशमुख
  राजीव भालेराव
  शोभा चित्रे
  मंजुषा नाईक
  मनीषा केळकर
  सुनीता धुमाळे
  शैला विद्वांस
  अरुंधती विनोद

**महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समन्वय समिती**

मनीषा गुप्ते (मासूम)
रमेश अवस्थी (मासूम)
विनोद शिरसाठ (संपादक, 'साधना' साप्ताहिक)
मुकुंद टाकसाळे

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था

## ▪ जीवनगौरव पुरस्कार ▪

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगावकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७
शांता गोखले २०१८
वसंत आबाजी डहाके २०१९
महेश एलकुंचवार, २०२०
नरेन्द्र चपळगावकर २०२१

## ▪ विशेष पुरस्कार ▪

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा : संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७
सानिया : कथा या वाङ्मयप्रकारासाठी २०१८
राम जगताप : डिजिटल पत्रकारिता 'अक्षरनामा' २०२१
संतोष शिंत्रे : वाङ्मय प्रकार – पर्यावरण २०२१

## प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## नियतकालिके / अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज, मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

## ग्रंथ पुरस्कार : ललित

ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता – दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद – मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा : अनुवाद : जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता : अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३

येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत : श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही २००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर २००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय : अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा : प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन : मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट : आनंद विंगकर २०१२
निरर्थकाचे पक्षी : नीरजा २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७
उजव्या सोंडेच्या बाहुल्या : प्रवीण बांदेकर २०१८
रिंगाण : कृष्णात खोत २०१९
तिसरा डुळा : किरण येले २०२०
दगडी मत्ता : रमेश अंधारे २०२१

## ▪ ग्रंथ पुरस्कार : वैचारिक ▪

आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी : गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद : रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत : गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार : श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना : संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००

मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती : म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट : जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे : म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश : आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर २०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५
'पाण्याशप्पथ' : प्रदीप पुरंदरे २०२०

## ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना : अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : उर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे २००७
तमाशा : एक रांगडी गंमत : संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची : नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर २०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे २०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत् चित्रव्यूह : अरुण खोपकर २०१४
प्रतिमा-प्रचीती : नितीन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७
लीळा पुस्तकांच्या : नीतीन रिंढे २०१८
टिपंवणी : सिसिलिया कार्व्हालो २०२१

## रा. शं. दातार नाट्य पुरस्कार

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याशा सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६

निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिंमाशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७
हंडाभर चांदण्या : दत्ता पाटील २०१९
'विपाशा', 'टिळा', 'ऑस्कर', 'रंग'
एकांकिकांसाठी : मुक्ता बाम २०२१

## ■ नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार ■

## रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३
राजीव नाईक २०१८

## ■ समाजकार्य सन्मान पुरस्कारांचे मानकरी – व्यक्ती व संस्था ■

**१९९६**

- ☐ समाजप्रबोधन (संस्था) :
  महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा
- ☐ समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  विलास वाघ, पुणे
- ☐ पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) :
  वासुदेवराव चित्रे, पालघर
- ☐ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  विजया चौक, धुळे
- ☐ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

**१९९७**

- ☐ स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे
- ☐ समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकविज्ञान संघटना, पुणे
- ☐ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  शुभदा देशमुख, गडचिरोली
- ☐ पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
  विजय नारकर, देवरूख
- ☐ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  लीला पाटील, कोल्हापूर

**१९९८**

- ☐ पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद
- ☐ समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  जयंत गडकरी, मुंबई
- ☐ स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज
- ☐ पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  हुमायून अब्दुलअली, मुंबई
- ☐ वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती)
  सुरेखा दळवी, पेण

**१९९९**

- प्रबोधन (संस्था) :
  समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रेहाना बैलिम, अमरावती
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  कुसुम कर्णिक, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  भरत कावळे, नाशिक

**२०००**

- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मनोहर कदम, मुंबई
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  चिं. धों. आसवले, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  संजय संगवई, पुणे.

**२००१**

- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मु. ब. शहा, धुळे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  कुमुद पावडे, नागपूर
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  काळुराम दोधडे, पालघर
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

**२००२**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  भुरीबाई मानसिंग शेळे, नंदुरबार
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रजिया सुलताना, अमरावती
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  दत्ता इस्वलकर, मुंबई,
  डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई,
  डॉ. राम पुनियानी, मुंबई

**२००३**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना,
  कोरेगाव, सातारा
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रझिया पटेल, पुणे
  शेख वजीर पटेल, अमरावती
  सुरेश शिपूरकर, कोल्हापूर
  आनंद पटवर्धन, मुंबई
  उल्का महाजन, रोहा, रायगड

**२००४**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  समाज विज्ञान अकादमी, पुणे
  मासूम, पुणे
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  तिस्ता सेटलवाड, मुंबई
  रमेश हरळकर, मुंबई
  पोपटराव पवार, अहमदनगर
  डॉ. मोहन देशपांडे, पुणे
  विलास भोंगाडे, नागपूर

**२००५**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर
  श्रमिक महिला विकास संघ, वसई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  श्री. लीलाधर हेगडे, मुंबई
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रा. यशवंत संत, पुणे
  श्री. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा
  श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार
  श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर
  श्रीमती सुषमा शर्मा, वर्धा
  सत्कार : श्री. सुरेश खोपडे, मुंबई

**२००६**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  आंबेडकर अकादमी, सातारा
  पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  पन्नालाल सुराणा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  रूपा कुळकर्णी, नागपूर
  अनंत फडके, पुणे
  वाहरू सोनवणे, नंदुरबार
  सत्कार : मनीषा वर्मा

**२००७**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  हॅलो मेडिकल फाउण्डेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद
  स्त्री मुक्ती संघटना, मुंबई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  प्रा. एन. डी. पाटील, सातारा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रदीप प्रभू, डहाणू
  अन्वर राजन, पुणे
  राजन इंदुलकर, चिपळूण
  सत्कार : प्रकाश विश्वासराव

**२००८**

- समाजकार्य जीवनगौरव (व्यक्ती) :
  डॉ. बाबा आढाव, पुणे
- समाजप्रबोधन (व्यक्ती)
  डॉ. आनंद तेलतुंबडे
- पर्यावरण संरक्षण संवर्धन (व्यक्ती) :
  कुंजबिहारी
- परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य (व्यक्ती) :
  अर्जुन कोकाटे
  दलितांचे प्रश्न : व्यंकप्पा भोसले
  सामाजिक सलोखा : सुरेश खैरनार
- युवा कार्यकर्ता : सिम्प्रित सिंग

**२००९**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  व्यंकटअण्णा रणधीर
- समाजप्रबोधन : सुभाष वारे
- सामाजिक प्रश्न : बंड्या साने
- असंघटित कष्टकरी : श्रीनिवास कुलकर्णी
- युवा कार्यकर्ता : योगिनी खानोलकर

**२०१०**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  नागनाथअण्णा नायकवडी
- विशेष कार्य : चंद्रकांत केळकर
- समाजप्रबोधन : सत्यपाल महाराज
- असंघटित कष्टकरी : बस्तू रेगे
- सामाजिक प्रश्न : हरीष सदानी
- युवा कार्यकर्ता : नीलेश निमकर
- लक्षवेधी प्रशासकीय कार्य :
  लक्ष्मीकांत देशमुख

## २०११

- समाजकार्य जीवनगौरव : जी. जी. परीख
- समाजप्रबोधन : सुनीती सु. र.
- असंघटित कष्टकरी : सुभाष लोटे
- सामाजिक प्रश्न : ब्रायन लोबो
- विशेष कार्य : ज्योती म्हापसेकर
- विशेष कार्य : नीलिमा मिश्रा

## २०१२

- समाजकार्य जीवनगौरव
  ठाकूरदास बंग
- समाजप्रबोधन : माधव बावगे
- सामाजिक प्रश्न : बाळकृष्ण रेणके
- असंघटित कष्टकरी : शिवाजी कागणीकर

## २०१३

- समाजकार्य जीवनगौरव :
  रयत शिक्षण संस्था
- समाजप्रबोधन : गजानन खातू
- असंघटित कष्टकरी : धनाजी गुरव
- सामाजिक प्रश्न : डॉ. अशोक बेलखोडे

## २०१४

- समाजकार्य जीवनगौरव :
  पुष्पा भावे
- समाजप्रबोधन : रमेश गावस
- सामाजिक प्रश्न : बिंदुमाधव खिरे
- असंघटित कष्टकरी : मनीषा तोकले

## २०१५

- समाजकार्य जीवनगौरव :
  विद्या बाळ
- समाजप्रबोधन : भीम रासकर
- असंघटित कष्टकरी : पल्लवी रेणके
- सामाजिक प्रश्न : कृष्णा चांदगुडे

## २०१६

- समाजकार्य जीवनगौरव :
  हमीद दलवाई (मरणोत्तर)
- समाजप्रबोधन : देवजी तोफा
- सामाजिक प्रश्न : विजय दिवाण
- असंघटित कष्टकरी : सुशीला नाईक

## २०१७

- समाजकार्य जीवनगौरव :
  गंगाप्रसाद अग्रवाल
- समाजप्रबोधन : रुबिना पटेल
- असंघटित कष्टकरी : चेतना गाला-सिन्हा
- सामाजिक प्रश्न : अरुण जाधव

## २०१८

- समाजकार्य जीवनगौरव :
  आनंदवन
- समाजप्रबोधन : हरी नरके
- असंघटित कष्टकरी : निशा शिवूरकर
- सामाजिक प्रश्न : मतीन भोसले

## २०२०

- समाजकार्य जीवनगौरव :
  गजानन खातू
- विशेष कृतज्ञता : जतीन देसाई
- कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष) : सुधीर अनवले
- कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन) : अरुणा सबाने
- युवा पुरस्कार : चेतन साळवे

## २०२१

- समाजकार्य जीवनगौरव : प्रेमाताई पुरव
  ('अन्नपुर्णा परिवार' संस्था)
- कार्यकर्ता (प्रबोधन) : सुरेश सावंत
- कार्यकर्ता (संघर्ष) : सुनीता भोसले
- युवा पुरस्कार : युवराज गटकळ

## ■ डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार ■

विवेक सावंत / २०१३
निखिल वागळे / २०१४
उत्तम कांबळे / २०१५
अतुल पेठे / २०१६
अरविंद गुप्ता / २०१७
तर्कशील सोसायटी पंजाब / २०१८
केरळ शास्त्र साहित्य परिषद / २०१९
डॉ. के. वीरमणी, चेन्नई / २०२०
अंशुल छत्रपती, हरयाणा / २०२१

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)

# पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो. अशाच प्रकारे एक वाङ्मयप्रकार पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारांसाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : ललित साहित्याच्या संदर्भात...**

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे,
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचं समर्थ दर्शन घडवलं गेलं आहे,
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे,
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचं साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचं ठरलं आहे.

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यकारांनी नि:स्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचं लेखन महत्त्वाचं ठरलं आहे.

**ग्रंथांसाठी पुरस्कार :**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक मराठी ग्रंथांना पुरस्कार दिला जातो. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षांतील पुस्तकांचा विचार केला जातो.

**रा. शं. दातार नाट्यलेखन पुरस्कार :**

नाट्यलेखन या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी आशयसंपन्न नाट्यसंहिता लिहिणाऱ्या नाटककारास हा पुरस्कार देण्याची योजना आहे. दीर्घकाळ अशी नाटकं रंगभूमीवर सादर करणाऱ्या रंगकर्मीलाही हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

**समाजकार्य पुरस्कार :**

१९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचं मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन व संरक्षण तसंच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय व धार्मिक सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५ पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला वा संस्थेला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. त्याचबरोबर प्रबोधन, रचना व संघर्ष यांपैकी एका प्रकारचं विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारांसाठी व्यक्तींच्या व संस्थांच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

१. ज्या व्यक्ती वा संस्था आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्यं रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचं कार्य करत आहेत,

२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करत आहेत,

३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे,

पुरस्काराची संख्या एखाद्या वर्षी कमी-जास्त होऊ शकते. पुरस्कार समिती (अमेरिका) यांनी तो हक्क राखून ठेवलेला आहे.

**महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.**

# 'महाराष्ट्र फाउंडेशन'विषयी

- 'महाराष्ट्र फाउंडेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचं निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभं करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली ३७ वर्षं करत आहे. आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचं पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचं साहाय्य 'महाराष्ट्र फाउंडेशन' या संस्थेद्वारे होत असतं.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केलं आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावं दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड इथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचं, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचं साहाय्य केलं आहे.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने स्त्रियांचं सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही हाती घेतले. तर 'समाजपरिवर्तनासाठी माहिती-तंत्रज्ञान' हा 'फाउंडेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. 'एक गाव - एक संगणक' हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

- अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउंडेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे :

  १) मानवी अपव्यापाराचं नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्या व्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४० टक्के प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचं आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणं व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली / स्त्रियांचं पुनर्वसन करणं या हेतूने हा प्रकल्प योजला आहे.

  २) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्था'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही सुरू केला आहे.

३) निराधार महिला पुनर्वसन / ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसमवेत राहून त्यांना साथ देणं व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या समाजपरिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने १९९६ साली समाजकार्य पुरस्कार योजना सुरू केली.
- समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचं हे ऋण अल्पाशांने फेडावं, या भावनेने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने १९९४ साली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना'सुरू केली आहे.
- विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउंडेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future of those with no future... So they can reinvest हे 'महाराष्ट्र फाउंडेशन'चं घोषवाक्य आहे.